Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख ७ माहे जन सन १९१५ ई० [ अंक २२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं ३

### केशराचें फूल मुफ्त.

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजित ॥ असली कस्तूरी २४ मशीरातिनती ३ बादाम हींग ।≈ तो० सुंदर कामदार शाल ३ व $3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील साहेबांच्या पाटीस ज्वर व हिवताप यांचे अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागचा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात. किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ६

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा आरंभ माघ शु० ९ तिन्हश वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ८० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

**आचार्य**

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० ख र्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. सर्व शंकेंशीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीं मिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १०१




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ७

### मुद्दाम अनुभवा करित.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णबिंदू— कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेणार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळया" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणें, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रातिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येत असल्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी– १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन छाती साफ होते, भूक लागते किं० १ आणा, तबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.
नो० नं० ९

### नोटीस

नोटीस बेशर्मी किसन वा। तुळशीराम कासार रा० मौजे मुक्तानपूर ता. मेहेकर जि बुलडाणे.

यांसः—

खालीं सही करणार रा० मौजे तांबोळ स्टे० अकोला इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मजला तुमचे घरून माहेरी येण्यास आजमास सरासरी वर्ष दीड वर्ष झाले असेल. एवढ्या अवधींत मी मजला घेऊन जाण्या विषयीं बरेच निरोप पाठविले परंतु तुम्ही मला जनाच्या रिती प्रमाणें घेऊन गेला नाहीं. करून मजला सरकारी रिती प्रमाणें आतां नोटीस देणें भाग पडलें. मजला माहेरी आल्या दिवसापासून आजमिती पावेतो खालिल प्रमाणें खर्च आला आहे तो मी मौजे मजकूर येथील पाटलाचा जावई नामें बाळकृष्ण रा० कसबे अकोला याजपासून घेऊन खर्च भागविला आहे. कारण मी माहेरी आल्या दिवसापासून माझें बाळंतपण व शरीरव्यथा दूर होण्यास व पोटाची गार भरण्यास आज सरासरी नव ९ दहा १० महिने झाले. एवढ्या अवधींत आजपावेतों खर्च रुपये १९० दिडशें झाले आहेत व पुढें मजला कोणी कर्ज देऊ इच्छित नाहीं. आणि निर्वाहास मोठी अडचण येते करितां मुद्दाम तुम्हास रिती प्रमाणें नोटीस देऊन मजला घेऊन जाण्याची व्यवस्था करावी अगर जर करितां अशी व्यवस्था आपले कडून होणार नाहीं तरी वरील कर्जाची फेड करण्या करितां जन रिवाजा प्रमाणें गंधर्वाचा नवरा करून कर्ज भागविणें भाग पडेल. कारण येथे खेडे गांवांत राहून निर्वाहास मोठी दिक्कत येते तरी वरील नोटीसीचे उत्तर नोटीस पावल्यापासून पंधरा १५ दिवसाचे आंत देऊन घेऊन जाण्याची व्यवस्था न झाल्यास तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क मुळींच राहणार नाहीं. व वरील खर्च तुमचे पासून वसूल घेतला जाईल. ही नोटीस मी आपले राजी खुशीनें लिहून दिली सही ता. २९।५।१५ ई॥ द० माधव व्यंकटेश कु० रा० अकोला.

सही.
भागु भ्रर्ता किसन कासार
नि॥० खुद आंगठा.

नो. नं. २२८

## नोटीस

नोटीस देण्यांत येते की मि. अनवरखां हाजी हुसेनखा रा. आकोला यांनीं त्यांचे आकोळे येथील सिव्हील स्टेशन मधील बंगल्याचे समोरील ४०+९० फुट व प. श्चिमेकडील १७९×१०० फुट जागा मिळणें विषयीं अर्ज दिला आहे. त्याची सुनावणी आमचे कोर्टांत ता० २९।६।१९ रोजी दुपारीं १२ वाजतां केली जाईल कळावें ता० १८।५।१९१९ इ.

Sobrabji Shapurji
E. A. C. Akola.

N. N. 227

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं खानसाहेब आमानखान रा. आकोळे यांनीं त्यांचे शेतांतील बंगल्या समोरचा सिव्हिल स्टेशन मधील १८०७८ स्केअर फूट जागा कंपांउड घालून बगीच्या करणें कारितां अर्ज दिला आहे त्याची सुनावणी आमचे कचेरींत ता० २१ जून १९१९ इ रोजीं दुपारी १२ वाजतां केली जाईल कळावें तारीख १३-५-१९१९ इ.

Sobrabji Shapurji
E. A. C. Akola.

N. N. 223

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म दर्ध्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर.

## नोटीस

नोटीस बेसमी पुर्णाबाई मर्द सीताराम चव्हाण रा० मौजे रामतीर्थ हल्लीं मुक्काम पिंपळोद ता० दर्यापूर.

इसका:-

खाली सही करणार यांजकडून नोटीस देतो ऐसाजे तूं ता० १४।४।१९ इ० रोजीं नोटीस दिली. त्या नोटिशीचे उत्तर देतो. ते सीताराम वानका भ्रम नाहीं चांगला आहे. सीताराम तुझा नवरा माझे साक्षांत भावाचा मुलगा आहे मी व सीताराम १० वर्षां पासून वेगळा आहो. भागाबाईची इस्टेट समाइकांत मिळाली वरून त्या इस्टेटींत माझा निम्मे हिस्सा आहे. रामतीर्थ येथील जवारीचे पेव काढून पिंपळोद येथें आणिले नाहीं. व भांडेकुंडे ही आणिले नाहीं व सोन्याचे डागडागिने ही आणिले नाहीं. व रोकड नगदी रुपये ही आणिले नाहीं, गोंदलेले आसामीचे दस्तैवज आणिले नाहीं, पिंपळोद येथील स्थावर जंगम इस्टेटीवर तुझे नवऱ्याचा व तुझे मुलाचा हक्क नाहीं. माझी स्वसंपादित इस्टेट आहे. रामतीर्थ येथील स्थावर जंगम इस्टेटींत माझा हिस्सा आहे याचे उत्तर देणें.

ता० २१।५।१९१९ इ॥

सही

मारुती वा॥ रायसिंग चव्हाण रा० पिंपळोद ता० दर्यापूर नि० खु०

नो० नं० २२९

## वर्गणीदारांस आगत्याची सूचना.

वर्गणीदारांकडे वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पि. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाचा तगा असणें स्वाभाविक आहे हें आम्हीं जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आम्हा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा अव्हेर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.

म्यानेजर.

वऱ्हाडसमाचा

मिती वैशाख व॥ १० शके १८४१

## मराठी भाषेची शब्दसंपत्ति,

मुंबई येथें नुकत्या झालेल्या साहित्यसंमेलनांत एक गोष्ट विशेष झाली. ती ही की यंदाच्या साहित्यसमेलनाच्या स्वागतकमिटींत व संमेलनाच्या कार्यक्रमांत सुशिक्षित स्त्रियांनीं आपला प्रवेश करून घेऊन निबंध वाचणे व भाषणें करणें वगैरे कामें आपल्या बंधुवर्गाच्या बरोबरीनें करून पुरुषाबरोबर आपण स्त्रिया ही साहित्याविषयींच्या आपल्या कर्तव्यास जागृत आहों असें लोकांच्या निदर्शनास आणिलें. या पूर्वी पुण्याच्या व आकोल्याच्या संमेलनांत ही कित्येक स्त्रिया भाषण करण्यास पुढें आल्या होत्या ही गोष्ट खरी असली तरी यंदाची त्याची तयारी व उत्साह ही विशेष अभिनंदनीय होतीं हें प्रत्येकास दिसून आल्याशिवाय राहिलें नाहीं. स्त्रीवक्त्यांपैकीं एकदोघींनीं तर मराठीभाषेवरलें आपलें प्रेम इतकें उत्कट रीतीनें दाखविलें कीं मराठींत बोलतांना किंवा लिहितांना इंग्रजी शब्द पदोपदीं घालण्याची जी संवय कित्येकांना असते तिचा त्यांनीं निषेध केला. हा निषेध कित्येकांना फार झोंबला असें दिसलें. कारण त्यानंतर लवकरच एका कलमबहादरानें ‘इंदुप्रकाश’ पत्रांत शुद्ध मराठींत आपले विचार व्यक्त करता येईनात म्हणुनच कीं काय इंग्रजींत एकपत्र प्रसिद्ध करून सदर निषेध प्रकट करणाऱ्या एका भगिनीचा पथेच्छ समाचार घेतला आहे, आणि मराठी भाषेसंबंधानें बोलण्यास एम. ए. झालेल्या सुशिक्षित स्त्रीला मुद्दां काय अधिकार आहे अशी पृच्छा केली आहे. आम्हांला या लेखकांची व त्याच्या वाङ्मळ लेखाला आपल्या पत्रांत स्थळ देणाऱ्या आमच्या व्यवसाय बंधूची खरोखर कींव येते. कारण या दोघानीं ही स्त्रीवक्त्यांचीं भाषणें किंवा निबंध नीट ऐकून न घेतां किंवा त्यांचा आशय पूर्णपणें लक्षांत न घेतां टीका केल्यामुळें ती फोल झाली आहे. मराठी भाषेतल्या शब्द संपत्तींत इतर भाषांतल्या शब्दांची भर पडल्यामुळेंच आज तिच्याठायीं अर्थवाहकतेचें सामर्थ्य किंवा सौकर्य आलेलें आहे ही गोष्ट या स्त्रीया विसरल्या आणि रेल्वे स्टेशनबद्दल अग्निरथविश्रामस्थान किंवा या सारखे अवजड शब्द घालून मराठीभाषेचें शुद्ध स्वरूप कायम टेवण्याविषयींचा त्यांचा आग्रह आहे अशी त्यांनीं आपल्या मनाची निष्कारण समजूत करून घेतली आहे. खरें पाहतां सदर स्त्रियांचा असा आग्रह मुळींच नव्हता. स्टेशन, तिकीट, टेबल, रिपोर्ट यांसारखे जे कित्येक शब्द मराठींत रूढ झालेले आहेत किंवा जे कित्येक शास्त्रीय पारिभाषिक शब्द परक्या भाषेतून घेणें अपरिहार्य आहे तेवढे वापरण्यास त्यांची मुळींच हरकत नाहीं; पण पुष्कळ वेळां लेखक किंवा वक्ते यांचा मराठी भाषेवर पाहिजे तसा व्यासंग नसल्यामुळें अगदीं साधे मराठी शब्द न सुचल्यामुळे ते त्यांच्या जागीं खुशाल इंग्रजी शब्द दडपून देतात या गोष्टीवर त्यांचा खरोखर कटाक्ष होता; आणि तो गैरवाजवी होता असें कोणी सुज्ञ मनुष्य म्हणेल असें आम्हांस वाटत नाहीं.

कोणत्याही संपन्न भाषेच्या शब्द भांडाराकडे पाहिलें तरी त्या भांडारांत त्या भाषेतल्या अस्सल शब्दाची संख्या अल्पच असते. परकीय भाषांतले शब्दाची भर कालवशात् व व्यवहाराच्या व्याप्तीबरोबर पडत जाऊनच तिला संपन्नता आलेली असते. इंग्रजी भाषेंत तरी पोर्तुगीज, फ्रेंच, स्पानिश फार काय, पण संस्कृत आरबी, फारशी वगैरे शब्दांची पडलेली भर कांहीं लहानसान नाहीं. तीच स्थिति मराठीची आजपर्यंत होत आली आहे व पुढें ही तिला जर उर्जितकाळ येऊं द्यावयाचा असला तर कायम ठेविली पाहिजे. मराठी भाषेंत आरबी, फारशी, पोर्तुगीज, इंग्रजी वगैरे परक्या भाषातून आलेले व रूढ होऊन बसलेले शब्द इतके आहेत व त्यामुळें त्या भाषेचें अर्थवाहकतेचें सामर्थ्य व सौकर्य इतकें वाढलें आहे कीं हे शब्द जर त्या भाषेंतून कोणी काढून टाकील तर त्यानें मराठी भाषेच्या प्रगतीला पांचशें वर्षें मागे खेचल्यासारखें होईल. वक्षीस, खटपट, हापूस, कटकट वगैरे सारखे शब्द शेंकड्यानीं नव्हे तर हजारांनीं मोजण्याइतके आहेत. हे शब्द परक्या भाषांतून मूळ आले आहेत असें ओळखणें देखील पुष्कळ वेळां मुष्किलीचें होईल. उदाहरणार्थ, कुरकुर, कुचराई, टिमकी, अननस वगैरे शब्द परक्या भाषेंतले असावे अशी शंका तरी कोणास येईल काय? पण शेवटला शब्द युरोपियन भाषेंतला असून बाकीचे बहार प्रांतांतल्या भोजपुरी भाषेंतले आहेत. हे शब्द आज त्या भाषा बोलणाराच्या तोंडीं आहेत. पूर्वीच्या काळीं मराठे शिपाई दिग्विजयार्थ ज्या ज्या प्रांतांतून गेले त्या त्या प्रांतांतून त्यांनीं इतर लुटी बरोबर शब्दांची ही लूट आणून मराठी भाषेच्या शब्दसंपत्तींत भर टाकिली ही त्यांची साहित्यसेवा व कळत नकळत झाली म्हणून त्याज्य मानावयाची काय? त्यांनीं आणिलेलीं द्रव्याची लूट जर आम्ही वर्गात ठेविली व त्या लुटींतल्या सोन्यामोत्यांचे अलंकारावर आपले स्वामित्वाचा छाप मारून ते आत्मसात् केले, तर त्यांनीं आणिलेल्या शब्दसंपत्तीवर कटाक्ष धरणें वाजवी झालें असतें काय? आमचे पूर्वज जुन्याला चिटकुन राहण्याचा दुराग्रह धरून बसणारे होते असा त्यांच्यावर एक आरोप आहे. पण शब्दांच्या बाबतींत तरी निदान तो वृथा आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं जी चूक आमच्या वेडगळ व दुराग्रही म्हटले गेलेल्या पूर्वजांनीं केली नाहीं, ती इंग्रजी शब्दासंबंधानें आम्ही करावी, इंग्रजी शब्दांना बहिष्कार घालावा व मराठीची प्रगति खुंटवावी असा आग्रह धरणारे प्राणी या विसाव्या शतकांत दिसत आहेत? या आमच्या विवेचनाचा विपर्यास होऊं नये म्हणून आम्हांस येवढें सांगणे येथें अवश्य दिसतें कीं आपल्या भाषेंतले रूढ शब्द टाकून देऊन परक्या भाषेंतले शब्द घ्या असें आम्ही म्हणत नाहीं. पण ज्या अर्थाचे वाचक शब्द आमच्या भाषेंत नाहींत, त्या अर्थाचे शब्द परक्या भाषेंतून खुशाल घेऊन मराठी भाषेचें अर्थवाहकतेचें सामर्थ्य वाढविणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे असें आम्ही समजतों. कोणती ही भाषा अशाच रीतानें संपन्न होत असते. व त्याच नियमाला अनुसरून मराठी भाषेनें आपला शब्दसंग्रह वाढविला तर तिची प्रगति होईल असे पूर्ण विचाराअंतीं आमचे ठाम मत झालें आहे.

## तटस्थ वृत्तीचा भंग.

हो नाहीं हो नाहीं करतां करतां अखेर ता० २२ मे रोजीं इटली प्रस्तुतच्या युद्धांत संयुक्त राष्ट्रांच्या वतीनें आपल्या तटस्थवृत्तीचा भंग करून मिळाल्याचें जाहिर झालें आहे. इटलीनें आपल्या पूर्वीच्या मित्रत्रयीशीं बेइमानीपणा केला असा आरोप त्याच्यावर कोणाच्यानेंही करवणार नाहीं. बेल्जमचें स्वातंत्र्य नष्ट होत आहे असें पाहून इंग्लंडसारखं त्याचें मन कळवळून त्यानें लढाई पतकरली असाही खराखुरा प्रकार नाहीं. कारण बेल्जमचें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचें आश्वासन इटलीनें कधीं दिलें नव्हतें. इटली या युद्धांत आणि ते ही पूर्वीच्या आपल्या मित्रत्रयीच्या विरुद्ध पक्षास येऊन मिळण्याचे एकच कारण स्वार्थबुद्धि हे आहे. इटलीचे कांहीं प्रांत त्याला आस्ट्रियापासून परत मिळवावयाचे आहेत व ते मिळविण्यासाठीं जर्मनीच्या मार्फत आस्ट्रियाकडे खटपट करून पाहिली पण जुळलें नाहीं. तेव्हां सध्यां लढाईमुळें आस्ट्रियाची दुर्दशा झालेलीच आहे. त्याच तापलेल्या तव्यावर आपलीही पोळी भाजून काढण्यास संयुक्त राष्ट्रांच्या पक्षास मिळणें हा मुख्य उपाय इटलीला दिसल्यावरून त्यानें त्याचा अवलंब केला आहे. इटली संयुक्त राष्ट्रांना मिळाला हा काम तर खराच, पण या कामाची खरी किंमत पुष्कळ लोक वाजवीपेक्षां ज्यास्त समजून गैरसमज करून घेत

आहेत व आतां पुढें लढाई चालवावीच नाहीं असा जर्मनी-आस्ट्रियांना विचार येऊन राहील असें ही कित्येक म्हणूं लागले आहेत. पण वस्तुस्थिति अशी बिलकुल नाहीं. कारण कीं इटली जवळ मोठेंसें सैन्य किंवा आरमार नाहीं, आणि इटालियन लोक लढाईच्या कामांत गुरख्यांच्या सारखे कडवे ही नाहींत. इटलीला लढाईच्या वेळीं बोलावतां येईल असें एकंदर सैन्य सुमारें २० लक्ष आहे. पण यातलें दोन तृतीयांश सैन्य जवळ जवळ निरुपयोगी आहे. तरी पण एका बाजूनें आस्ट्रियाचा शह राशियाकडून मिळतोच आहे, तसा दुसऱ्या बाजूनें देण्यास इटली चांगला उपयोगी पडेल आणि अशा रीतीनें आस्ट्रियाला त्राहि भगवन् करून सोडण्यांस त्याचें साह्य होईल यांत शंका नाहीं.

## ' बंगाली ' जहाजाची हानि.

सांप्रतच्या युद्धांत इंग्लंडाविषयींच्या राजनिष्ठेनें प्रेरित होऊन बंगाली लोकांनीं आपापसांत वर्गण्या गोळा करून युद्धांत जखमी झालेल्या लोकांच्या सुश्रूषेसाठीं सज्ज करून पाठविलेलें ' बंगाली ' नांवाचें इस्पितळी जहाज गेल्या सोमवारीं इराणी आखातांत वादळांत सांपडून बुडाल्याची अत्यंत दुःखद वार्ता आली आहे. या जहाजावर किती माणसें होतीं व त्यांपैकीं किती बचावलीं वगैरे साद्य हकीकत अद्याप आमचे हातीं आली नाहीं. तथापि मनुष्य हानी झालेली असो वा नसो, येवढ्या हौसेनें राजनिष्ठ बंगाली लोकांनीं उभारलेल्या जहाजाचा अशा तऱ्हेनें अंत झाला हीच गोष्ट मनाला धक्का देणारी आहे. या जहाजाप्रीत्यर्थ आतापर्यंत एक लक्ष सत्यायशीं हजार रुपये वर्गणी गोळा झालेली होती व आणखी वर्गण्या मिळविण्याचें काम चाललें होतें. तोंच ही आकाशची कुऱ्हाड येऊन पडली.

## मराठी व हिंदी

नुकत्या झालेल्या महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाच्या ठरावांचा मूळ खर्डा कोणीं तयार केला ते आह्मांस ठाऊक नाहीं, कोणीहि केला असेल तरी हिंदी भाषेचें घोडें निष्कारण संमेलनाच्या कार्यक्रमांत घालून त्यानें संमेलनास आलेल्या रंगाचा बेरंग केल्याचें पाप मात्र माथीं घेतलें आहे. या हिंदी भाषेचे घोडें मराठी वाङ्मयाच्या उन्नतीप्रीत्यर्थ जमा झालेल्या मंडळीपुढें नाचविण्याचें खरोखर कांहीं प्रयोजन नव्हतें. प्रयोजन नव्हते इतकेंच नाहीं. तर साहित्यपरिषदेचें नियमांत त्या परिषदेचे जे उद्देश सर्वमान्य म्हणून घालण्यांत आले आहेत त्या उद्देशाला सोडून हा विषय हातीं घेण्यांत विषयनियामक मंडळीनें मर्यादातिक्रम केला असें ही म्हणण्यास हरकत नाहीं. आह्मी हिंदी भाषेच्या विरुद्ध आहों असें मुळींच नाहीं. अर्धा हिंदुस्थानाला तरी व्यवहारांत सर्व सामान्य अशी रूढ भाषा तीच आहे व नर्मदेच्या दक्षिणेकडे ही निदान महाराष्ट्र, मध्यप्रांत, वऱ्हाड, दक्षिण महाराष्ट्र वगैरे प्रांतातून ती प्रचारांत नसली तरी लोकांना समजते, तेव्हां हिंदी भाषेचा व्यावहारिक राष्ट्रभाषा होण्याचा हक्क आह्मांस कबूल आहे पण हें कबूल असलें तरीं साहित्यसंमेलनाला परिषदेच्या नियमाप्रमाणें हा विषय हातीं घेण्यास कांहीं एक हक्क पोंहचत नव्हता असें आह्मी ठासून म्हणण्यास तयार आहों. या प्रश्नावर बोलतांना ठरावाला बराचसा विरोध आहे असें पाहून तो शांत करण्यासाठीं रा. गोविंद सखाराम सरदेसाई ( बडोदे ) यांनीं सांगितलें कीं हा ठराव अतिशय निरुपद्रवी व राष्ट्रसंघटनोपकारक आहे व पूर्वी बडोद्याच्या साहित्यसंमेलनानें तो पास केला असल्यामुळें आतां आपण माघार घेणें बरोबर नाहीं. रा. सरदेसाई यांनीं दिलेली ही माहितीही साफ चुकीची आहे. बडोद्याच्या साहित्यसंमेलनापुढें हाच काय पण कोणताही ठराव आलेला नव्हता, अर्थात् तो कधीं पासही झाला नाहीं. बडोद्याच्या साहित्यसंमेलनानंतर दुसरे दिवशीं हिंदी भाषेबद्दल एक स्वतंत्र सभा मि. रमेशचंद्र दत्त यांच्या आग्रहावरून भरली होती व त्या सभेंत हा ठराव पास झाला होता. या सभेच्या ठरावानें साहित्यसंमेलनाचे हातपाय बांधण्याचा प्रयत्न करणें चुकीचें होईल. साहित्यसंमेलनांत अग्रेसरत्व घेणाऱ्या गृहस्थांची स्मृति इतकी दुर्बळ कशी झाली याचें आह्मांस आश्चर्य वाटतें.

## हिंदुस्थानचे नवे व्हाइसराय.

हिंदुस्थानचे प्रस्तुतचे लोकप्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दीची मुदत वाढविण्यांत यावी अशा अर्थाचे अर्ज हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या संस्थांकडून गेले आहेत व त्यांना लोकमताचा पूर्ण पाठिंबा आहे, तरी सदर अर्ज मंजूर होण्याची आशा नाहीं, ही विनंति अमान्य करण्यांत आली आहे, अशी तार कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्रांत नुकतीच प्रसिद्ध झाली होती. प्रधानमंडळाच्या पुनर्घटनेसंबंधाच्या गेल्या आठवड्यांत आलेल्या तारेनें या अशुभ वार्तेला पुष्टि मिळत असलेली पाहून हिंदुस्थानांतल्या प्रजेस अत्यंत दुःख होईल. असें म्हणतात कीं या नव्या व्यवस्थेंत मि० हारकोर्ट यांची नेमणूक हिंदुस्थानच्या व्हाइसरायाचे जागीं होण्याचें घाटत आहे. मि० हारकोर्ट हे हुषार मुत्सद्दी असतील, कर्तृत्ववान् असतील. पण लॉर्ड हार्डिंज यांनीं हिंदी प्रजेचीं मनें आपल्या सौजन्यानें सहानुभूतिपर राज्यधोरणानें, आणि प्रेमानें इतकीं आकर्षून घेतलीं आहेत कीं हिंदुस्थानला त्यांना निरोप देतांना अतिशय दुःख वाटेल व सध्याच्या युद्धासारख्या निकराचे प्रसंगीं तरी हिंदी प्रजेला असें दुःखांत टाकण्याचे टाळतां आलें असतें तर त्यात ब्रिटिश प्रधानमंडळाचें दूरदर्शित्व दिसलें असतें

## जपानच्या मागण्या,

चीनच्या कारभारांत नसती ढवळाढवळ करून स्वतःचा फायदा करून घ्यावा अशाविषयीं जपानचे प्रयत्न आज कित्येक वर्षे चालले आहेत. सध्यां युरोपांतलीं राष्ट्रें युद्धांत गुंतलेलीं पाहून आपला डाव साधण्यास जपानला आयतीच संधि प्राप्त झालेली आहे. जपानच्या मागण्या पुढें दिल्याप्रमाणें आहेत— शांटुंग प्रदेशांत आजपर्यंत जर्मनीला जे हक्क होते ते आपणांस मिळावे ही पहिली मागणी आहे. येथें रेल्वेचा फाटा तयार करण्याचा जपानचा विचार आहे. दुसरी मागणी मंचूरियाचे बाबतीत आहे. किरिनचंचम रेल्वे ९९ वर्षांच्या पट्ट्यानें आपले हातांत राहूं द्यावी, पोर्ट आर्थर व दाक्षिण मंचूरिया यांतील रेल्वेच्या पट्ट्याची मुदत वाढवावी, दक्षिण मंचूरिया व मंगोलियाचा पूर्वभाग यांत जपानी लोकांना शेतीसाठीं जमीन विकत घेण्याची परवानगी असावी, या प्रांतांत रेल्वे करण्याची परवानगी देण्यापूर्वी किंवा परराष्ट्रापासून कर्ज काढण्यापूर्वी चीननें जपानला अगोदर विचारावें, कोणाशीं ही युद्ध किंवा मैत्री करणें झाल्यास जपानची सल्ला चीननें घ्यावी. जपानी लोकांना या टापूंत खाणी खोदण्याची व व्यापार व उद्योगधंदा करण्याची मुभा असावी. तिसरी मागणी हानेपिंग कंपनीच्या व्यवस्थेसंबंधाची आहे. हींत आपल्याखेरीज इतर राष्ट्राचा हात नसावा असें जपानचें म्हणणें आहे. चौथ्या मागणीनें आपला तट, किंवा बंदर, किंवा समुद्र किनारा यापैकीं कोणताही भाग चीननें परराष्ट्राला देण्याचे बाबतींत चीनचे हात जखडून टाकले आहेत. पांचव्या मागणीनें तर चीनला सर्वस्वी जपानचें अंकित करून टाकलें आहे. चीनला लागलेल्या शस्त्रास्त्रसामुग्रीचा निदान अर्धा हिस्सा तरी चीननें जपान जवळूनचा विकत घेतला पाहिजे, स्वतःचे कारखाने उघडाव याचे झाले तरी जपानला भागीदार घेऊन उघडावे, पोलिसची व्यवस्था करण्यांत हा जपानचा ' बीचमें मेरा चांदभाई ' ठेवावा; शाळा, इस्पितळें, मंदिरें वगैरे बांधण्यासाठीं जपानी लोकांना जमीनी लागतील त्या चीननें विकत द्याव्यी; चीनला कर्ज लागेल तेव्हां तें जपानजवळ मागवें. अशा कित्येक अटी घालून त्या मान्य असल्याचें ४८ तासांत कळवा, नाहीं तर युद्धास तोंड लागेल अशा प्रकारची धमकी दिल्यामुळें चीननें निरुपाय होऊन वरील अटी कांहीं फेरफारांसह कबूल केल्या. हा प्रकार पाहिला म्हणजे ' मनगटांत जोर तो शिरजोर ' या म्हणीची सार्थता राजकीय व्यवहारांत चांगली पटते.

## युद्धाच्या बातम्या.

गेल्या आठवड्यांत आलेल्या युद्धाच्या बातम्यांवरून युद्ध संपतआलें असें म्हणणारांच्या वचनावर कितीसा विश्वास ठेवावा तें कोणालाही कळून येईल. येवढी गोष्ट खरी कीं जर्मनीनें युद्धांत आरंभीं आरंभीं जे एकामागून एक जय मिळविले व सपाट्यासरशीं बेल्जयम व फ्रान्सचा उत्तर व पूर्वभाग आक्रमण केला ती तडफ आतां त्यात राहिली नाहीं. आतां चुकून माकून एखादे वेळीं जर्मनीच्या जयाची बातमी येत असते. नोव्हेचापेल, आरास, लाब्लेस वगैरे ठिकाणच्या निकराच्या लढायांत त्याला हार खावी लागली. तथापि आरासच्या उत्तरेस अजून निकराची लढाई सुरु आहे. रशिया ग्यालिशियामध्यें स्वतःचा बचाव करण्यांत गुंतला आहे. प्रेमझाक्लि व निस्टरची दलदल यांच्यामध्यें रशियन फौजेची फळी फोडून जाण्यासाठीं जर्मनीनें जोराचे प्रयत्न गेल्या आठवड्यांत चालविले होते, पण ते निष्फळ झाले. डेली टेलीग्राफ पत्राचा बातमीदार लिहितो कीं चांपेन, लारेन आणि व्हासजेस या प्रांतातलें आपलें सैन्य काढून तें लिली आणि यिप्रेसकडे पाठविण्यांत जर्मनी सध्यां गुंतला आहे. या बातमींत तथ्यांश असलातर त्यावरून फ्रान्सच्या मध्यभागीं आपल्या सैन्याचा केंद्र करून त्या केंद्रांत आपलें सगळ बळ एकवटण्याचा आणि रशिया व इटाली यांच्याकडे दुर्लक्ष करून सगळा रोख इंग्लंड व फ्रान्स येथील सैन्यावरच धरण्याचा जर्मनीनें विचार केला असल्याचें दिसतें. गेल्या आठवड्यांतील दुसरी महत्वाची बातमी म्हणजे व्हाइट हाइट नांवाचे आजपर्यंत अभेद्य व अजिंक्य मानलें गेलेलें ठिकाण दोस्तराष्ट्रांनीं मोठ्या शिकस्तीनें तेरा दिवसांच्या निकराच्या लढाई नंतर सर केलें हें होय. या लढाईंत तीन हजार जर्मन कामी आले व एक हजार कैद झाले. हा संयुक्ताच्या फौजेचा मोठाच विजय झटला पाहिजे. या विजयाच्या संपादनार्थ जेतृपक्षाला मोठी हानि सोसावी लागली, तरी पण या विजयानें संयुक्ताच्या फौजेचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

## इटलीला पहिली सलामी.

इटली युद्धांत सामिल झाल्याबरोबर आस्ट्रियानें त्या देशाला पहिली सलामी दिली ती व्हेनिस येथील इटालियनलोकांच्या दारुगोळ्यांच्या कोठारावर व शस्त्रागारावर विमानांतून टाकलेल्या अकरा बांबांची. या बांबपासून विशेषशी हानि न होतां इटालियन वैमानिकांनीं [illegible] पळावयास लाविलें. इटलीनें लागलीच पोर्टोबुसोनोबाच्या बेटावर हल्ला करून तें काबीज केलें व मोटार बोटी बुडवून ४७ लोकांना कैद केल्याची बातमी आली आहे.

## एकतर्फी बातम्या.

रूटरची एजन्सी ही बातम्या देणाऱ्या एजन्सींत अव्वल प्रतीची आहे. तथापी या एजन्सी मार्फत आलेल्या बातम्या एकतर्फी असतात अशी फार ओरड आहे. हिंदुस्थानच्या प्रागतिक पक्षाला या एजन्सीचा पक्षपातीपणाचा अनुभव पूर्वी अनेक वेळां आलेलाच आहे. पण खुद्द इंग्रज लोकांना या गोष्टीचा आलेला ताजा अनुभव सांगण्यासारखा आहे. आज कित्येक दिवसांपासून हार्मसवर्थ कंपनीनें लंडन टाइम्स पत्र आपले हातीं घेतलें आहे. या पत्रानें लॉर्ड किचनेर यांच्यावर आज कित्येक दिवस टीकेचा भडिमार चालविला आहे व हार्मस्वर्थ कंपनीच्याच मालकीची दुसरीं तीन चार पत्रें त्याची री ओढित आलीं आहेत. पण या संबंधानें रूटरनें मुद्दाम स्तब्धता धारण केली, आणि शेवटीं जेव्हां इंग्लंडचे लोक या टीकेनें चिडून त्या पत्राचे अंक भर रस्त्यांत जाळून टाकूं लागले तेव्हां

अंक गाळल्याची बातमी या एजन्सीनें अशा खुबीनें दिली कीं त्यावरून अंक गाळणारे लोक उच्छृंखळ व तामसी असावेत असा लोकांचा ग्रह व्हावा! अशा एकतर्फी बातम्या पुरविणाऱ्या एजन्सीला सरकारकडून द्रव्यसाह्य कां मिळावें हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

## लढाईच्या बातम्यांचा सारांश.

संयुक्त राष्ट्रांना इटलीदेश येऊन मिळाल्यामुळें दोस्तराष्ट्रांच्या त्रिकूटास चौकडीचें स्वरूप आलें आहे. ज्या अटीवर इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांचें त्रिकूट बनलें त्याच अटी इटलीनें ही मान्य केल्या आहेत. इटली येऊन मिळाल्याबद्दल दोस्तराष्ट्रांकडून त्यांचें अभिनंदन होत आहे. पश्चिमच्या रणक्षेत्रांत इंग्रज व फ्रेंच यांची सरशी स्पष्ट दिसत आहे. जर्मन लोकांनीं आज कित्येक दिवस मशीन गनच्या जोरावर रक्षण केलेल्या दोन टेकड्या दोस्त राष्ट्रांनीं काबीज केल्या, व आरासच्या आसपास जर्मनांचे हल्ले परतविले. येथून उत्तरेस घनघोर युद्ध अद्याप चाललेंच आहे. लाबासीच्या नजदीक पुष्कळ ठाणीं इंग्रजांनीं घेतलीं. पूर्वक्षेत्रात ही घनघोर युद्ध चाललें आहे. तिकडे जर्मन प्रेझमिसल व नीव्हर यांच्या मधील दलदलींत शिरण्याचा यत्न करीत होते, पण रशियनांनीं त्यांचा यत्न निष्फळ केल्यावरून तिकडून जर्मनांनीं विमानांतून प्रेझमिसलवर गोळीबार केले व दक्षिण बाजूचे कांहीं खंदकही त्यांचे हातीं लागले. बाल्टिक प्रांतांत जर्मन फार निकरानें लढले. त्यामुळें त्यांची हानिही फार झाली. येथें दीड लक्ष जर्मन फौज गारद झाली. ग्यालीशियाचे आसपास रशिया आपला पक्ष चांगला बसवीत चालला आहे. बाल्टिक प्रदेशांत आपण जय मिळविला असें जर्मन सांगत फिरत आहेत. इटली तर आस्ट्रियाचा एकसारखा समाचार घेत चालला आहे. इटली व आस्ट्रियायांच्या सरहद्दीवर फ्रूली प्रांतांत इटलीनें शत्रूचीं बरीच ठाणीं घेतलीं. इंग्लंडप्रमाणें इटलीचे युवराज देशाभिमानानें प्रेरित होऊन रणांगणावर गेले आहेत. इटलीचे राजेसाहेब बड्याबड्या सरदारासह स्वतःरणभूमीवर गेले आहेत. तुर्कस्थानकडे लढाईची गडबड बरीच होऊन राहिली आहे. सबमरीन ई ११ यानें तुर्कस्थानच्या राजधानींत प्रवेश करून दारू गोळ्यानें भरलेलें एक तुर्की जहाज टॉर्पेडोनें उडविलें.

## जर्मनी व अमेरिका.

लुसिटानिया बोटीचा जर्मनीनें नाश केल्यामुळें तिच्यावरील अमेरिकन प्रवाशाचे संबंधांत जर्मनीनें अत्याचार केला या बद्दलचा उडवाउडवीचा जबाब जर्मनीनें देऊन सदर बोट ही लढाऊ होती कीं नाहीं, व तिच्यावर कॅनेडियन उतारू होतें कीं काय या महत्वाच्या मुद्यांचा अगोदर विचार झाला पाहिजे असें सुचविलें त्यावरून अमेरिकन लोक चिडले आहेत, आणि जर्मनीचा हा जबाब म्हणजे हानि करूनची करून वर आणखी अपमान करण्यासारखा आहे असें अमेरिकन पत्रें म्हणत आहेत. इतके अत्याचार जर्मनी करीत आहे तरी प्रे. विल्सन यांची क्षमावृत्ति उतरत नाहीं असा टपका ही अमेरिकन पत्रें देत आहेत.

## शोचनीय मृत्यु.

आम्हांस कळविण्यास वाईट वाटते कीं नबाब सयद मोहिउद्दिन खान, यू. सी एस्. डेप्युटी कमिशनर आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट द्रुग, यांस गेल्या महिन्याच्या ता० २३ रोजीं दक्षिण हैद्राबाद येथें ते २५ दिवसांच्या हक्काच्या रजेवर असतां वशांतीक विकारानें देवाज्ञा झाली. नबाब साहेब यांचे वडील मुंबई इलाख्यांत विजापूर येथें सेशन्सजज्ज होते. त्यांच्या मरणानंतर मुंबईचें गव्हर्नर साहेब लॉर्ड हॅरिस यांच्या खास शिफारसीनें सन १८९१ सालीं नबाब साहेबांस वऱ्हाड कमिशनमध्यें असिस्टंट कमिशनर नेमण्यांत येऊन त्यांची प्रथम नेमणूक आकोल्यास झाली. यांची बहुतेक अमदानी वऱ्हाडांतच गेली असून गेल्या वर्षींच त्यांची द्रुग येथें बदली झाली. नबाबसाहेब सात वर्षें पर्यंत यवतमाळ येथें आफिशिएटिंग डेप्युटी कमिशनर होते आणि त्यास गतसालींच नेक नामदार चीफ कमिशनर साहेब सर रॉबर्टसन यांनीं कायम केलें होतें. हे जेथें जेथें गेलें तेथें तेथें लोकप्रिय झाले. यांच्या मरणानें सी. पी. आणि वऱ्हाडचा एक चांगला खानदानीतला हिंदी अधिकारी नाहींसा झाला. नबाब साहेबांचे धाकटे बंधू रा. सयद महमद दस्तगीर यांस बॅरिस्टरच्या परिक्षेसाठीं नुकतेच विलायतेस नबाब साहेबांनीं पाठविलें होते त्यांस तसेंच परत बोलवावें लागलें. खुद नबाब साहेबांसही आपल्या वडिलांच्या मृत्यूमुळें विलायतेहून अपुरें शिक्षण ठेवूनच परत यावें लागलें होतें. यांच्या मागे यांच्या पत्नी, दोन मुली व दोन मुलगे असून ज्येष्ठ चिरंजीव अवघे बारा वर्षांचे आहेत. या कुटुंबावर आकाशांतील कुऱ्हाड एकाएकी कोसळली यांत शंका नाहीं नबाब साहेबाचे धाकटे बंधू व दोघे चिरंजीव हेही योग्य शिक्षण संपादून सरकारी मोठमोठ्या अधिकाराच्या जागा पटकावतील व आपल्या घराण्याचा परंपरागत लौकीक कायम राखतील अशी आम्हांस आशा आहे. मरणसमयीं नबाब साहेबांचें वय अवघे ४२ वर्षांचें होतें. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** दुपारीं ऊन कडक पडतें. सायंकाळीं कडत वारे वहातात. रात्रीं व सकाळीं किंचित थंड असतें. हवा स्वच्छ असून रोगराई विशेष नाहीं आणि प्लेगही थंडावलेला आहे.

**अपघातः—** गतवाचे शनिवारीं सायंकाळीं सुमारे पांच वाजतां येथील मोरणा नदींत पुलाखालीं दहीहंडा वेसचे समोर नद्याचे टिप्याजवळ एक आठ दहा वर्षांचा मराठ्याचा मुलगा बुडून मेला.

राजे साहेबांच्या जन्मादिवसाच्या पदवीदानांत आमच्या वऱ्हाड प्रांतांतील रा. रा. माणिकराव बळवंतराव देशमुख बुलढाणा यांचें नांव रावसाहेब या पदवीनें आल्याचें पाहून आम्हांस आनंद वाटतो. या सन्मानाबद्दल रा. माणिकरावांचें आम्ही अभिनंदन करतों.

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोक शेट सावकार व आसामी यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं आमची दुकान फकिरजी भिकाजी या नांवानें असून मालक यशवंत फकिरजी आहे. तर या जिनगीचा मालक मी असून फकिरजी भिकाजी हा फंद फीतुरानें माझे विरुद्ध जी जाहीर नोटीस दिली. ती खोटी असून त्याचे लिहील्याप्रमाणें कोणीही त्याचेशी व्यवहार करू नये. अगर केल्यास त्याची जबाबदारी त्याचे स्वतःवर राहील. त्याची जबाबदारी मी व माझे मालकीचे असलेली दुकान वगैरे इस्टेट यावर कोणतीच जबाबदारी नाही. करितां या जाहीर नोटिशीनें आपणास कळविलें असून या सर्व जिनगीचा मालक मी असून माझा हक आहे. कळावें. ता० २।६।१९

सही

यशवंत फकिरजी रा० आलेगांव द० खु०

नो० नं २१०

## नोटीस

रा० रा० हरी फकिरजी शींपी दुकान आलेगांव ता० बाळापूर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे हकडे आमचे दुकानचे रुपये अंदाजा तीन साडेतीन हजार निघतात. व त्याची मागणी दोन चार वेळां केली. तरी आपण दोन चार वेळां करार सांगून रुपयाची अदाई केली नाहीं. सबब या नोटिशीनें कळवितो कीं, तुम्ही ८ दिवसाचे आंत आमचे रुपये देऊन आमचे सहीची पावती घ्यावी. तसें न केल्यास कोर्ट मार्फत दावा करून रुपये वसूल केले जातील. व कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्चही तुम्हास द्यावा लागेल. कळावें. ता० २।६।१९ सही

यशवंत फकिरजी शींपी आलेगांव

नो० नं० २११ द० खु०

## नोटीस

नोटीस येशमी फकिरजी भिकाजी शिंपी रा० आलेगांव ता० बाळापूर जि. आकोला.

यांसः—

चिरंजीव येशवंत फकिरजी याचा साष्टांग नमस्कार आपणास कष्टी देऊन खालील गोष्टी लिहाव्या लागत आहे. आपण लोकाचे सल्लेने वऱ्हाडसमाचारांतून मला नोटीस व जाहीरनोटीस दिली त्या दोन्ही नोटीसा बमीनस खोट्या आहेत. माझे दुकानशीं तुमचा कांहीएक संबंध नसून जर तुम्ही फंद फितुरी करण्याचा प्रयत्न कराल अगर मला माझे ईस्टेटीचे वहिवाटीस कोणत्याही तऱ्हेचा अडथळा करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा परिणाम तुम्हास बरा होणार नाहीं सबब नोटीसीने कळविण्यांत येते कीं तुम्ही आमचे बाप असून फन्दपूर्वक सरकार दरबारांत सुद्धां आम्ही निराळे आहोत. असें असतांना तुम्ही विनाकारण आपले दमेद पायावर पाडून घेता हे बरें नाहीं. आसामी वसूल करण्याचा किंवा सेतीचे जमवण करण्यास धाक दडप देण्याची बिलकुल आपणास अधीकारी नाही. व असामीही तुम्हास कबूल करणार नाहींत आपल्या अन्याय कृतीमुळें फौजदारी वगैरे झाल्यास माझेवर दोष नाहीं कळावें ता. २।६।१९ इ.

सही.

येशवंत फकिरजी शिंपी

आलेगांव द: खु.

नो० नं. २१२

## जाहिरनोटीस

खालीं सही करणार यांजकडून या या जाहीर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, आमचे दस्तऐवज ता० २१।५।१९१९ इसवी रोजीं आम्ही मौजे खोडद ता० मुर्तिजापूर या गांवावरून राहटीस जात असतां वाटेमध्यें आमचे दोन दस्तऐवज गहाळ झाले त्यांचे वर्णन खालील प्रमाणें:—

रा० रा० लखाजी करकाजी देशमुख रा० राहटी ता० मुर्तिजापूर या इसमाचे नांवचे कर्जरोखा रुपये पन्नासचा व कबुलायत रुपये एकशें पस्तीसची असे दोन्ही दस्तऐवज गहाळ झाले हे वर लिहिलेले दस्तऐवज जो कोणी आणून देईल त्यास रुपये १५ पंधरा इनाम देऊं कळावें ही विनंती ता० २।६।१९१९ इ.

सही.

गणाजी वा। विठोबा पाटील गांवडे रा० राहटी ता. मुर्तिजापूर जि. आकोला पो. धनज नि॥ खु. आंगठा

नो० नं० २१३

## नोटीस

सर्वत्र लोकांस माहीत होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं, आकोलें बोट क्लबचे मेंबर लोकांनीं मोरणा नदीचे पूर्व कांठची वरील बंधाऱ्या जवळील १०० x १०० फुट जागा बोट क्लब बांधणे करितां मिळावी म्हणून अर्ज दिला आहे. आणि ती जागा तारीख १० जून १९१९ रोजीं सकाळीं ७ वाजतां ठिकाणावर हरास केली जाईल. लोकपट्टा १० वर्षांकरितां घेतला जाईल. पट्टेदारांस सदरहु जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेल्या कामाशिवाय इतर कामाकडे डेप्युटी कमिशनर सा० ब० यांचे लेखी परवानगी शिवाय करतां येणार नाहीं पट्टेदारांस लोकपट्याच्या ठरलेल्या नमुन्यांतील शर्ती कबूल असाव्या पाहिजेत. कळावें. ता० २९।५।१९१९ सही

JayNarain
E. A. C.
Akola N. N. 234

हे पत्र आकोला येथें केशवसुत खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N.: 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख १४ माहे जून सन १९१५ ई० [ अंक २३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त.

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खांलिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी**
नो. न. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यात **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** व **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १८६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**
**पत्ता—वैंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं ७

### मुद्दाम अनुभवाकरि .

दिव्यक्षुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णबिंदु— कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रतिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिव्यबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही. पी. नें पाठवूं.

**मुळे एन्ड सन्स नांदुरा.**
नो० नं० ९

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वर्क पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापुन तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

### नोटीस

नोटीस देशमी अमृता वा। रामजी जात कुणबी काठोडे रा० आकोट ता० आकोट जि० आकोला

यांसः—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुम्हाला ता० १२।९।१४ इसवी रोजीं अंदाज तारीख बरोबर माहित नाहीं. कुलमुखत्यार नेमले व पांच रुपयाचे स्टॅंपवर कुलमुखत्यारपत्र नोंदुनही दिले. त्याप्रमाणें आपण महिना दोन महिनें काम केलें आतांशी कांहीं वाईट लोकांचे नादीं लागून कचेरीचे वगैरे कामे आपण बरोबर करीत नाहीं. करितां या नोटिशीनें आपणांस कळविण्यांत येते कीं, मी तुम्हास [illegible] मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद केले असे आपण माझे संबंधानें आतां कोणाशीं देवघेव करूं नये केल्यास तुम्ही तुमचे जबाबदार राहाल मी अगर माझी इस्टेट जबाबदार राहणार नाही कळावे ता. ९।६।१९१५ इ.

सही
गुजाई मर्द बाळाजी कुणबी
रा. हईखेड पो. आकोली
ता. आकोट जि०
बु० आंगठा

नो. नं २३९

### जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, अमृता वा। रामजी जात कुणबी काठोडे रा० आकोट ता० आकोट जि० आकोला यांस मी ता० १२-९-१९१४ इसवी रोजीं अंदाजन याना कुलमुखत्यारपत्र रुपये पांचचा स्टांपवर लिहून दिले. त्याप्रमाणे यानीं महिना दोन महिने काम केले. आतांशी हा कांहीं वाईट लोकांचे नादीं लागून माझे काम बरोबर करीत नाही. करितां या जाहिर नोटिशीनें कळविण्यात येते कीं, या वरील इसमाशी माझे संबंधीं कोणीही घेणें देणें करूं नये केल्यास त्याचा तो

जबाबदार राहील. मी अगर माझी स्थावर इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. कळावें वरील इसमाचे मुकत्यारपत्र आज तारखे-पासून रद्द केले असें वरील मुकत्यारपत्र नोंदून दिले त्याची तारीख माहीत नसल्या [illegible] अंदाजन तारीख ९६-१९१९ ही [illegible] कळावें

सही
गुणाई मर्द बालाजी कुणबी
रा० रुईखेड पो० आकोली
ता० आकोट जि० खु०
आंगठा असे

नो० नं० २३६

## नोटिसीचे उत्तर.

नोटीस बेशर्मी तानी मर्द बळीराम शींपी हल्ली मु. तेल्हारा ता० आकोट जि० आकोला.

बळीराम व मनाजी शींपी रा० पातुर्डा बु० ता० जळगांव जि० बुलढाणा. कळ-विती कीं तूं मला वऱ्हाडसमाचार पत्रांतून ता० ३१-९ १९ इ. रोजीं नोटीस दिली ती पावली नोटिशींतील मजकूर अगदीं खोटा आहे. तू दिलेली नोटीस तुझे स्वतः चे बुद्धीनें नसून तुझा बाप अगर दुसरे लोकी आसजन यांचे मतानें दिसून येते तरी मी तुला अद्यापी नांदविण्यास तयार असून तुझे बरोबर संसार सुखानें करावा. असे आहे. वरून मी तुला येण्याकरितां माझे वडील माऊ विठोबा व हरी हे दोन वेळ आले असतां तुझे बापानीं त्यांचे बरोबर तुला पाठविलें नाहीं. नंतर मीही स्वतः आलो होतो. परंतु तुझे आई-बाप यांनी माझेशी मोकळेपणानें न वागतां [illegible] उद्धटपणानें वर्तन करूं लागलें मी एकटा व ती बरीच मंडळी असल्याका-रणानें मला त्यांच्याशीं बोलवलें नाहीं. तरी दोन प्रसंगीं मी उत्तर [illegible] देईल तुझे आई बाप [illegible] ला अगदीं नीर्लज्ज व उद्धटपणा इतका कीं खावटीचा खर्च व फारकती वर्तमानपत्रद्वारे मागतात ? हे आश्चर्य कारावाचें आहे. तुला मुखानें माझे बरोबर संसार करणें असल्यास माझे वरी नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत चालून यावें. न आल्यास कायदा-प्रमाणे मला व्यवस्था करावी लागेल कळावें तारीख ७-६-१९१९ इ.

सही
बळीराम मनाजी शींपी रा०
पातुर्डा द० खु०

नो. नं. २३७

## नोटीस

नोटीस बेशर्मी रा. रा. गिरधारीलाल देवलाल आवगी राहणार पो. नांदूरा ता. मलकापूर जि. बुलढाणा

यांस

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुम्हाला ता० १८-२-१९१९ इसवी रोजीं कर्ज रोखा रुपये १२९ सव्वाशे पाचा पुर्जा लिहून दिला. त्यामध्ये आपण मला वसूल रुपये ६० दिले. व पुन्या रुपयाचा कर्ज रोखा लिहून घेतला. मी तुम्हाला बाकीचे रुपये ६९ पासष्ट मागीतले तेव्हां तुम्ही म्हणाला कीं, हे रुपये महिना पंधरा दिव-सानी देतो करितां मी तुम्हाला कर्जरोखा लिहून दिला. त्याला महिना झाल्यावर मी तुम्हाला मागणी केली तेव्हां आपण म्हणाला कीं सध्या मजजवळ रुपये नाहींत. आठ दिवसानी ये नंतर मी तुमचेकडे आलो तेव्हां आपण म्हणाले कीं, मी कर्जरोख्यावर इतके रुपये ठेवित नाहीं. कांहीं तरी गहाण करून दे तेव्हां मी तुमचे म्हणण्याप्रमाणें गहाण रुपये १५० दिडशाचे ता० ३०.४-१९ इ. रोजीं करून दिले. त्यावेळीं मी तुम्हाला वरील १२९ सव्वाशे रुपयाचा दस्तऐवज परत मागितला तेव्हां आपण म्हणाला कीं, प्लेगचे दिवस आहेत. दस्तऐवज खोरडीवर आहे. असा आपण माझेशी करार केला व रुपये ही पुरे दिले नाहींत. करितां या नोटिशीनें कळविले जाते कीं, तुम्ही मला फक्त रुपये ६० साठ दिले ते रुपये मी व्याजामुद्धां देण्यास तयार आहे हे रुपये घेऊन माझे दोन्ही दस्तऐवज नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत परत करावे न केल्यास फसवणूकीबद्दल तुमचेवर का-यद्याप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें ता० ६६-१९ इ.

सही
रुपचंद सखदेव रंगारी राहणार
नांदुरा दस्तुर खु०

नो नं. २३८

## नोटीसीचे उत्तर

रा. रा. परशराम वा॥ जानजी काकणे जात गवळी पाटील रा. पास्टी ता० बाळापुर जि. आकोला पो. पातूर.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही ता. १९।४।१९ इसवी रोजीं (वऱ्हाडसमाचार पत्रांतून) नोटीस दिली. ती मिळाली त्यांत तुम्ही लिहीलेला मजकूर अजिबात खोटा आहे. तुम्ही आमचे येथून आमची बायको नामें अनु इला दिवाळी करितां तुम्ही नेले. त्यास आज सरासरी १॥ २ वर्षे झाली मी तुमचे येथें दोन चारवेळां नेण्याकरितां आलो होतो परंतु तुम्ही माझेशी विना-कारण तंटा करूं पाहतां करितां मला तुमचे येथें येण्याची भिती वाटते. करितां आपण माझी बायको अनु इला माझे घरचे सर्व डागडागीनें यासुद्धां माझे येथें आणून घालावे. मी तीला वागविण्यांस तयार आहे. तुम्ही विनाकारण नोटीस देऊन माझी बेआदबी केली तरी मी तुम्हास कोणत्याच तऱ्हेनें फारकती देणार नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून ८।१९ दिवसाचे आंत आणून घालावे आणून न घातल्यास तुमचेवर मुकदमा केला जाईल. मग त्याचा खर्च व नोटिशीचा खर्च तुमचे जवळून घेतला जाईल. कळावें ता० १-६-१९१९ ई०

सही.
भगु वा॥ श्रावण जात गवळी रा०
शेलगांव पो० बार्शिटाकळी ता०
आकोला जि. खुद. आंगठा

ना० नं० २३९

## नोटीस

नोटीस बेशर्मी भिकूबाई जवजे देवराव देशमुख रा० भांबेरी ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं आम्ही तुमचे विटाचे बांध-काम प्रत्येक हजारी विट आटविण्यास १॥= प्रमाणें काम आम्हास तुम्ही उघडे दिले ते काम आम्ही तारीख २१।४।१९ पासून तारीख २९।५।१९ पर्यंत आम्ही तुमचे काम केले आम्ही तुमची विट एक लक्ष तेहतीस हजार पाचशे १३३५०० विट नवीन विट व जुनी ४५०० च्यार हजार पाचशें जुनी मिळून १३८००० आम्ही तुमचे कामास आटविली असे त्या एकंदर विटाची आटविण्याची मजुरी २२४ दोनशे चोवीस रुपये च्यार आणे झाली. त्यांत तुम्ही आम्हास ७४। चवऱ्यात्तर रुपये च्यार आणे तेथील मजुरीबद्दल व पोटखर्चाबद्दल मिळून दिले बाकी तुमचे कडून १५० अक्षरी दिडशें रुपये राहिलेले आम्ही तुम्हास गांवाकडे जातेवेळेस मागितले परतु तुम्ही आम्हास म्हटले कीं आम्ही तुमचे हे राहिलेले रुपये व आणखीन तुम्ही माझे काम पुरे होईपर्यंत जि विट आटविसाल त्याची रकम व हे राहीलेले पैसे आम्ही सर्व काम झाल्यावर देऊं मग आम्ही गांवाकडे गेलो व तारीख २।६।१९ ई॥ रोजी पातु-र्ड्याहून भिकूसा जुनगडे व गणपत सावडे यांना तुमचे कामावर पाठविले होतें. त्यांत तुम्ही तारीख १।६।१९ रोजीं तुमचे गांवां-तील राजास कामावर लावून घेतले होते. व आमचे राजानीं तुम्हास कामाबद्दल विचारिले असतां तुम्ही म्हटले कीं आम्ही आमचे गांवचें राजास हजार १॥। प्रमाणें उघडे दिले आतां तुम्हास काम नाहीं घराकडे परत जा मग आमचे राजानी तुम्हास पैसे मागितले असतां तुम्ही म्हटले कीं देत नाहीं असे आमचे गडी ऐकून गांवाकडे परत आले यावरून तुम्हास नोटीस देण्यांत येत आहे कीं तुम्हास नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत पैसे आणून द्यावे व माझी स्वतःची हातची पावती घेऊन जावे नाहीतर नोटी-सीच्या खर्चासह दिवाणीत दावा घातला जाईल.

सही
नागोसा वा॥ संतुसा द. खु.
नो. नं. २४०

## नोटीस

भगवान रावोजी माळी रा० मौजे चांदुर ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इंजकडून नोटीस देण्यांत येते कीं. तुम्ही माझे मालकीचे शेत सर्वे नं ११ एकर ८ गुंठे १८ आकार रु० १८ हे शेत पांचवर्षाकरितां दरसाल स्वामित्वाबद्दल रुपये ८० अगाऊ देण्याचें कबूल करून मजला कबुलायत ता० १२-९-१९ इ० रोजीं लिहून रजि-स्टर करून दिली त्याप्रमाणें आज पावेतो मी तुम्हास अगाऊ स्वामीत्वाची रकम मागीत-ली असतां तुम्ही देत गेले. नंतर शेतात बाही वर्तन करित गेले तसेच मी या वर्षी तुम्हास स्वामित्वाबद्दल रकम मागी-तली असतां देत नाहीं. म्हणून म्हणाले तरी या नोटीशीने कळविण्यांत येते कीं कबुलायत शर्थीप्रमाणें रकम रु० ८० व या नोटीशीचा लागणारा खर्च मनला ८ दिवसाचे आंत आणून देऊन माझे पासून भरपाईची पावती घेऊन जावी व माझे परवानगीवाचून शेतात कोणतेही प्रकारचे काम करूं नये कळावें ही नोटीस दिली ता० ८।६।१९१९ इ.

सही
अंबाई मर्द संभाजी डोंगे माळी
रा० चांदुर जि० हा० बांगडा

नो० नं० २४१

---

वऱ्हाडसमाचा

मित्ती ज्येष्ठ शु॥ २ शके १८१७

## चंद्रावरले डाग आणि कविकल्पना.

कवीचें सामर्थ्य विधात्याच्या सामर्थ्याहून रतिमात्र कमी नाहीं, किंबहुना ज्यास्तच आहे हें रसिक वाचकांस सांगावयास नको. यः- काश्चित् वस्तूला आपल्या कल्पनेच्या जोरावर महत्पदावर नेऊन बसविण्याचे सामर्थ्य एकट्या कवीचेच ठायीं आहे. तो अशा खुबीनें त्या वस्तूचे वर्णन करतो कीं तें वाचून आपली दृष्टि आपणास चकवीत तर नाहींना? असा विकल्प वाचकाच्या मनांत उभा राहतो. संस्कृत साहित्यशा-स्त्रकारांनीं चमत्कृतित्व हें काव्याचें एक प्रधान लक्षण सांगितलें आहे तें येवढ्याच साठीं कवीच्या आंगच्या या अचाट शक्तीच्या निदर्शनार्थ चंद्रावरच्या डागासंबंधानें निर-निराळ्या कवींनीं बसविलेल्या निरनिराळ्या कल्पनांचें थोडेंसें विवेचन येथें करूं. चंद्रा-वरच्या डागांसंबंधानें शास्त्रज्ञाचें मत काय आहे ते आपण प्रथम पाहूं. म्हणजे त्याव-रून त्या वस्तूचें मूळ सत्यस्वरूप काय आहे तें आपणांस कळेल. शास्त्रज्ञ असें म्हणतात कीं चंद्रमंडळावर जे डाग दिसतात ती पृथ्वीची छाया आहे आणि चंद्राची धवलता ही पृथ्वीवरच्या जलाचें प्रतिबिंब आहे. या साध्या गोष्टीला कवींनीं आपल्या कल्पनांनीं किती विचित्र प्रकारांनीं रंगविलें आहे पहा! कवीच्या कल्पना म्हणजे निवळ कल्पनाच! त्यांत शास्त्रीयतत्व शोधूं जाणें हा मूर्खपणा आहे. कल्पना खऱ्या, पण त्या इतक्या अद्भुत आहेत कीं सत्यज्ञानापासून आनंद होत नाहीं त्याच्या कक्षावधि पटींनीं रसिक वाचकांना त्यावाचून आनंद होतो. या आनंदाचा थोडासा लाभ आमच्या वाचकांना व्हावा म्हणून या कविकल्पनां पैकीं कांहीं थोड्याशा पुढें देत आहों.

१ आकाश हाच कोणी समुद्र; त्यांतल्या तारका हे समुद्राच्या पोटांतले जीवनं

आणि चंद्र हा शेष. अर्थात् त्याच्यावरले डाग हे त्या शेषाच्या डोक्यावरच्या पाप नाराच्या मुळें त्याच्या डोळ्यांतून टपटप गळणारे व त्याच्या मुखास मालिनता आणणारे अश्रुबिंदु होत.

२ शंकरानीं कामदेवाला आपल्या क्रोधाग्नीनें जाळून भस्म केलें, तेव्हां त्या अग्नीपासून निघालेला धुराचा लोट वर आकाशांत चंद्रापर्यंत गेला, त्यामुळें त्याच्या तेजस्वी मुखाला आलेली मलिनता ते हे डाग होत.

३ चंद्र हा रजनीरूपिणी श्यामवर्ण कामिनीच्या हातांतला आरसा आहे. ती त्या आरशांत आपलें मुख पाहत असतां त्या मुखावरच्या काळ्याभोर डोळ्यांचें व एकंदर श्यामवर्णाचें जे प्रतिबिंब त्या आरशांत पडलें तेच हे डाग होत.

४ कुमुदिनीनें आपल्या वल्लभाला म्हणजे चंद्राला बोलावण्यासाठीं भ्रमररूपी दूत पाठविला होता. चंद्रानें आपल्या प्रियकरणीकडून आलेला हा दूत म्हणून प्रेमानें त्याला उचलून घेऊन आपल्या हृदयापाशीं नेला. तो अद्याप तेथेंच आहे.

५ सूर्यानें आपली प्राणेश्वरी जी कुमुदिनी तिला आपल्या प्रखर किरणांनीं दग्ध केलेली पाहून चंद्र अतिशय शोकाकुल झाला, आणि त्यानें आत्महत्या करण्याचा निश्चय करून विष प्राशन केलें, त्या विषाचे हे डाग होत.

६ चंद्रानें आपल्या मुखकांतीला कोणाची दृष्ट लागूं नये म्हणून केलेला कज्जलतिलक ता त्यावरला डाग होय.

७ शुभ्रकांति चंद्र आपली श्यामवर्ण कामिनी रजनी हिला अंगावर घेऊन बसला आहे. तेव्हां चंद्रावरले डाग म्हणजे त्या रजनीचे श्यामवर्ण अंग होय.

८ ब्रह्मदेवानें कृष्णप्रिया राधा हिला सौंदर्याची पुतळी घडवावी म्हणून चंद्राच्या अंगांतले मांस काढून त्याची प्रतिमा केली. त्यामुळें चंद्राच्या छातीला झालेली जखम दुरून काळी डागासारखी दिसते

९ चंद्र ही आकाशरूपी महासागरांत संचार करणारी नौका आहे. आणि त्या नौकेचा लोहमय भाग तो चंद्रवरील डाग आहे.

१० चंद्राला हरीण प्रिय आहे. म्हणून तो त्याला आपल्या उराशीं धरून बसला आहे. या हरणाच्या अंगावरले काळे डाग चंद्रावर आहेतसे दिसतात.

११ इंद्रानें गौतमऋषीची भार्या अहिल्या हिच्या सतीत्वाचा भ्रंश केला व त्याकामीं चंद्रानें त्याला मदत केली. यावरून गौतमऋषीनें हातांतल्या मृगचर्मानें चंद्रावर प्रहार केला. त्याची खूण डागाच्या रूपानें चंद्रावर राहिली आहे.

१२ समुद्रमंथनाचे वेळीं चंद्र समुद्रांतून वर आला, तेवेळीं त्याच्या अंगाला लागलेल्या चिखलाचे ते डाग आहेत.

१३ सीताविरहामुळें रामचंद्राचें हृदय दग्ध झालें. त्या शोकाग्नीपासून निघालेला धूर लागून चंद्रावर डाग पडले.

१४ राधे इतकी सुंदर अशी दुसरी स्त्री निर्माण करण्याची ब्रह्मदेवानें खटपट करून पाहिली, पण जमेना. तेव्हां त्यानें अर्धवट केलेला मुखवटा कंटाळून थाई टाकून फेकून दिला तोच चंद्र होय.

१५ चंद्र हा महान् विष्णुभक्त असल्यामुळें त्यानें विष्णूची श्यामल मूर्ति आपल्या हृदयमंदिरांत साठवून ठेवेली. तिचें पुसट प्रतिबिंब बाहेर डागाच्या रूपानें दृग्गोचर होतें.

१६ समुद्रमंथनाचे वेळीं अगोदर चंद्र व मागाहून हालाहल विष निघालें. तेव्हां चंद्रानें त्याला आपलें धाकटें भावंड समजून बंधुप्रेमानें उचलून घेतलें. डाग हे त्या विषाचे परिणाम होत.

१७ चंद्र राहूला हंसला, तेव्हां राहूनें जातां जातां चंद्राच्या मुखश्रींत भडकाविली. तिची खूण अद्याप चंद्रावर दिसत आहे.

१८ चंद्रानें आतांपर्यंत अनेक विरहीविरहिणींचे श्राप घेतले आहेत. ते श्राप डागाच्या रूपानें चिरकाल राहिले आहेत. याप्रमाणें अनेक संस्कृत व प्राकृत कवींनीं चंद्रावरच्या डागासंबंधानें निरनिराळ्या अद्भुत कल्पना बसवून आपल्या काव्यांना चमत्कृतित्व आणिलें आहे. पूर्वीच्या कवींना नांवें ठेवणारांपैकीं एका तरी कवीनें इतकी आल्हाददायक आणि अभिनव कल्पना आपल्या कवितेंत घालून काव्याला चमत्कृतित्व आणिलें आहे काय? जुन्या कवींच्या कृतींत प्रतिभा व कल्पनेचें कौतुकत्व जसें स्पष्टपणें दिसतें, तसें आधुनिक कवितेंत दिसत नाहीं. यावरून आधुनिक कविता टाकाऊ किंवा कमी योग्यतेची आहे असें आह्मांस सूचित करावयाचें नाहीं पण काव्याविषयींच्या जुन्या कल्पनेप्रमाणें पूर्वीच्या कवींनीं आपलीं काव्यें रचतांना अगाध कल्पकता व रचना कुतूहल दाखविलें व त्याबद्दल त्यांना योग्य श्रेय दिलें पाहिजे येवढेंच आमचें म्हणणें आहे.

---

## युद्धाच्या बातम्या.

शत्रूनें प्रेझमिझल घेतल्यानंतर कांहीं दिवस रशियाची पीछेहाट होते कीं काय अशी भीती वाटत होती. पण तसा कांहीं प्रकार घडून आला नाहीं. जर्मन लोक विषारी वायूचा उपयोग युद्धांत करीतच आहेत. पोलंडमध्यें जर्मन लोकांनीं खाई तोडून आणून त्यांच्या मोठाल्या होळ्या करावयाच्या व त्यांत बेतानें विषारी द्रव्यें ओतून विषारी वायु उत्पन्न करण्याचा नवीनच उपक्रम केला आहे. तथापि अशा अडचणींतून सुद्धां रशियन लोक मागें पाऊल न घेतां धैर्यानें लढत आहेत. ता. ९ रोजीं त्यांनीं १ हजार जर्मन कैद केले. सान नदीच्या दक्षिण भागाकडे तुमुळ युद्ध चाललें आहे. त्यांत रशियाचाच जय होत आहे. फ्रांसात आरासच्या उत्तरेला जर्मन लोक चक्रव्यूहासारखा व्यूह रचून लढत होते. या व्यूहाचा तीन चतुर्थांश भाग फ्रेंचानीं काबीज केला आहे. एनेच्या उत्तरेस ब्रिटिश फौजेनें शत्रूचे कित्येक खंदक हस्तगत केले. बाल्टिक समुद्रांत जर्मन आरमारानें बाहेर पडून रशियन आरमाराशीं कागाळी सुरू केली. पण रशियानें त्याचा चांगला समाचार घेऊन शत्रूचीं तीन लढाऊ जहाजें नष्ट केल्याची बातमी आली आहे. इटलीकडची ही बातमी अत्यंत आल्हाददायक आहे. आस्ट्रियाचे किल्ले घेऊन ते जमीनदोस्त करण्याचा इटलीनें सपाटा चालविला आहे. इटलीची फौज थोडीच पण तयार आहे. त्याच्या पाशीं द्रव्यें भरपूर नाहीं येवढीच अडचण आहे. पण त्याचा पुरवठा इंग्लंड व फ्रांस यानीं करण्यासाठीं तिन्ही राष्ट्रांच्या प्रधानांचें एक संयुक्त कान्फरन्स लवकरच भरावयाचें आहे. अमेरिकन लोकांचा उपमर्द जर्मन ठिकठिकाणीं करीत आहेत. त्यामुळ प्रसिडेंट विल्सन यांनीं आपली शांतवृत्ति सोडून एक सणसणीत खलिता तयार केला आहे. पण तो पाठविण्याचपूर्वींच ते आजारी पडल्यामुळें तर्त तें काम लांबणावर पडलें आहे.

---

## सन्माननीयांचा सन्मान.

बादशहाच्या वाढदिवसा निमित्तानें पदवादानांची प्रसिद्ध झालेली यादी एकंदरींत समाधान कारक होती. तींत लढाईवर गेलेल्या शूर शिपायांबद्दल काळजी वाहणाऱ्या व अविश्रांत श्रम करणाऱ्या स्त्रिया व पुरुष विद्यादानार्थ आपली संपत्ति अर्पण करणारे दानशूर, वाङ्मयाची एकनिष्ठ सेवा करणारे, साहित्यभक्त, राजकार्यधुरंधर मुत्सद्दी, राजसेवातत्पर अधिकारी, अत्यंत शारीरिक व मानसिक कष्ट सोसून देशसेवेचें व्रत चालविणारे महात्मे, उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्यासाठीं थोडा बहुत स्वार्थत्याग करणारे वगैरे सर्व प्रकारच्या लोकांचा यथायोग्य समावेश झाला आहे. शूर शिपायांच्या सेवेंत तत्पर राहिल्याबद्दल लेडी विलिंग्डन, व लेडी कार्माईकल, लेडी मेटीट यांना केसर–इ–हिंदचीं स्वर्णपदकें, दानशूरतेसाठीं डॉ० रास बिहारी घोष यांना व वाङ्मयसेवेबद्दल डॉ० रवींद्रनाथ टागोर यांना व राजकार्यधुरंधरते बद्दल ना० पट्टणी व म्हैसूरचे दिवाण मि० विश्वेश्वरअय्या यांना 'सर' हा मिळालेला किताब, व अमूल्य देशसेवेबद्दल मि० गांधी यांना मिळालेले केसर–इ–हिंदचें पदक हे सन्मान यथास्थानीं आहेत असें कोण म्हणणार नाहीं? मि० गांधी हे अधिक मोठ्या मानास खात्रीनें पात्र होते व लार्ड हार्डिंज यांनीं त्यांच्यासंबंधानें काढलेल्या उद्गारांवरून त्यांनीं याहून मोठ्या सन्मानासाठीं त्यांची शिफारस ही केली असल अशी आह्मांस खात्री वाटते. पण मि० गांधी यांचा विनय सर्वश्रुतच आहे तोच नडला असावा. ज्यांना दक्षिण आफ्रिकेंतल्या सरकारानें दोन तीन वेळां अपराधी ठरवून कैदेंत टाकिलें त्यांच्या उच्च प्रतीच्या देशसेवेचें मोल हिंदुस्थानसरकार पूर्णपणें ओळखत आहे येवढी गोष्ट तरी या पदकाच्या दानानें सिद्ध झाली हा कांहीं सामान्य लाभ नाहीं. आलीबागचे सरदार बिबलकर यानीं शेतकरी वर्गाच्या मुलांच्या शेतकी शिक्षणाची जी सोय नुकतीच केली आहे तिच्याबद्दलचें पारितोषिक 'तुरतदान महापुण्य' या न्यायानें सरकारानें ताबडतोब दिलें, यावरून अशा प्रकारच्या देशसेवेचें गुणग्राहक सरकार आहे हें निदर्शनास आलें.

---

## देशी कारखाने व रेलवे कंपन्या

देशी कारखान्यांच्या भरभराटीच्या मार्गांत ज्या अनेक अडचणी आहेत, त्यात या कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाची ने आण करण्याबद्दल रेलवे कंपन्याकडून जें जबर भाडें घेण्यांत येतें ती अडचण मोठी आहे. वर्तमान पत्रांनीं या बाबतींत केलेल्या ओरडीचा आतांपर्यंत कांहीं उपयोग झाला नाहीं, हें पाहून रेलवे बोर्डानें हा प्रश्न हातीं घेतला आहे, व सध्याच्या काळीं देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचे बाबतींत रेलवे कंपन्या सरकारला साह्य करतील अशी सूचना केली आहे. या सूचना कंपन्यांनीं मान्य केल्या तर उत्तमच आहे. पण समजा, त्यांनीं त्या अमान्य केल्या, तर रेलवे बोर्ड स्वस्थ बसणार काय! कां त्या सूचनाप्रमाणें कंपन्यांना वागण्यास भाग पडेल अशी कांहीं तजवीज करण्याइतकी रेलवे बोर्डाची तयारी आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. सरकारच्या स्तुत्य प्रयत्नांत सहकारिता ठेवणें हे जसें प्रजेचें कर्तव्य आहे, तसेंच रेलवे कंपन्याचें ही आहे हें हट्टी कंपन्यांच्या डोळ्यात अंजन घालून त्यांना शिकविण्यात येईल तर या प्रश्नाचा ताबडतोब निकाल लागेल.

---

## गुजराथी साहित्यसंमेलन

मुंबईंत भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाच्या पाठोपाठ सुरत येथे रा. नरसिंह राव भोलानाथ यांच्या अध्यक्षत्वाखालीं गुजराथी साहित्यसंमेलनाची बैठक झाली. मराठी प्रमाणें गुजराथी वाङ्मयाची हल्लींची शोचनीय स्थिति सुधारण्यासाठीं तींत सूचना करण्यांत आल्या. मराठी साहित्यपरिषदेनें पुस्तकाचें परिक्षण करण्यासाठीं परीक्षकमंडळ नेमण्याचा ठराव केला, तर गुजराथी संमेलनांत गुजराथी लेखकमंडळ व संपादक मंडळ नेमून ग्रंथकार व संपादक यांच्या हक्काला जपण्याविषयींचें आपलें कर्तव्य बजाविलें. देशी भाषेच्या द्वारें शिक्षण व हिंदी भाषेचा प्रचार करण्याविषयीचें ही ठराव झाले. मात्र गुजराथी लोक अविक स्थितीचे म्हणून दुसरा ठराव वादळ न उठतां मुकाट्यानें पास झाला. गुजराथी साहित्यपरिषद पत्रिका काढण्याचें ही ठरलें.

---

## दारूगोळ्याचा तुटवडा

बेलजम सारख्या लहानशा राज्याच्या संरक्षणार्थ व एकंदर न्यायदेवतेच्या प्रीत्यर्थ इंग्लंडानें एकाएकीं सांप्रतच्या युद्धाला प्रारंभ केला, त्याला आतां दहा महिने होऊन गेले; अजून या युद्धाचा शेवट पुसट रीतीनें सुद्धां दिसूं लागला नाहीं. एकाएकीं युद्धांत पडावें लागल्यामुळें दारूगोळ्यासारख्या युद्धोपयोगी सामानाचा भपंडार साठा जर्मनीसारखा इंग्लंडला करून ठेवतां आला नाहीं. त्यामुळे सध्याची ब्रिटीश सैन्याची मोठी अडचण दारूगोळा ही आहे असें जनरल फ्रेंच यानीं वारंवार आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे. ब्रिटिश मुत्सद्यांना ही ती गोष्ट पटली आहे. मि. लॉइड जॉर्ज यानीं नुकतेच म्यांचेस्टर व लिव्हर्पूल येथील आपल्या भाषणात हेंच सांगितलें व येथील लोकांत दारूगोळा तयार करण्याचे कामीं आपल्या कारखान्याचा उपयोग करण्य विषयीं लोकांस अत्यंत कळकळीची

विनंति केली. इंग्लंड सारख्या सरकारी व खाजगी कारखान्यांनीं गजबजलेल्या देशावर अशा कळकळीच्या विनंतीचा उत्कृष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे. ज्या देशानें आपते वेळीं देशासाठीं देहपात करण्यास उत्सुक असे तरुण माणसें पुरविलीं त्या देशाकडून युद्धोपयोगी सामुग्रीचा पुरवठा करणार नाहीं ही गोष्ट असंभवनीय आहे. लोकांनीं खुषीनें या बाबतींत मदत न केल्यास त्यांच्यावर सक्ती करण्याचा अधिकार सरकाराला रेग्यूल् आक्टानें मिळालेला आहे. पण या अधिकाराचा उपयोगच करण्याची वेळ इंग्लंडचे स्वदेशाभिमानी कारखानदार येऊं देणार नाहींत. इंग्लंडच्या बाहेर कानडा सारख्या वसाहतीवर मुद्दां या कळकळीच्या विनंतीचा परिणाम झालेला आहे व कानडांतल्या आठशें यांत्रिकांनीं मदती विषयींची आपली उत्सुकता व्यक्त केली आहे ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. या यंत्राच्या व कारखान्यांच्या बाबतींत हिंदुस्थानदेशाची बाजू लंगडी नसती तर हिंदुस्थानहीं अशा वेळीं आपल्या कर्तव्यास कधीं चुकला नसता. पण हिंदुस्थानांत कारखानेच माहींत या गोष्टीला त्याचा नाइलाज आहे.

## इंग्लंडचा इतिहास.

सन १९१७ सालासाठीं अलाहाबाद युनिव्हर्सिटी कडून म्याट्रिक परिक्षेचा अभ्यासक्रम नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत इंग्लंडच्या इतिहासाला फाटा दिलेला आढळण्यांत येत आहे. आतांपर्यंतच्या अभ्यासक्रमांतून या विषयाला गाळण्यांत युनिव्हर्सिटीचा काय उद्देश असेल तो असो, पण इंग्लंडच्या इतिहासासारख्या महत्वाच्या विषयाला म्याट्रिकच्या अभ्यासक्रमात मुळींच जागा नसावी हें आश्चर्य आहे. कारण, सध्याच्या काळीं आमच्या समाजाला जर एखाद्या विषयाच्या ज्ञानाची विशेष जरुरी असेल तर ती इंग्लंडच्या इतिहासाच्या ज्ञानाची होय. आमच्या सामाजिक, औद्योगिक व राजकीय संस्था या लोकांच्या मुळाशीं पाश्चात्यांचें अनुकरण असल्यामुळें इंग्लंड सारख्या देशांत या संस्था कशा प्रादुर्भूत झाल्या, व त्यांच्यांत पुढें कोणकोणत्या कारणामुळें कसकशीं स्थित्यंतरें होत गेलीं हें इंग्लंडच्या इतिहासावरूनच कळावयाचें. पण या ज्ञानाच्या मुळाशींच युनिव्हर्सिटीनें कुऱ्हाडीचा घाव घातल्यावर आमच्या या संस्था पुढें निःसत्व व निर्जीव होण्याची भीती आहे, थोड्या वर्षांपूर्वी मुंबई युनिव्हर्सिटीनें बी. ए. च्या परीक्षेतून इंग्लंडचा इतिहास काढून टाकिला. अलाहाबाद युनिव्हर्सिटीनें एक पाऊल पुढें जाऊन म्याट्रिक परिक्षेंतच या विषयाला फाटा दिला. इंग्लंडच्या इतिहासाविषयींची हिंदी तरुणांची जिज्ञासा प्रारंभींच खुडून टाकल्यानंतर पुढें कॉलेजच्या अभ्यासक्रमांत तरी या विषयाचें अध्ययन कोणता तरुण हौसेनें हातीं घेणार आहे? सारांश, अलाहाबाद युनिव्हर्सिटीचें हे कृत्य दिसण्यांत क्षुद्र दिसतें, पण त्याचे परिणाम फार दूरगामी व आमच्या सार्वजनिक प्रगतिपर संस्थांना अपायकारक होतील अशी भीती वाटते. या गोष्टीचा आमच्या समाजांतील राजकीय संस्थांच्या चालकांनीं वेळींच विचार करणें अवश्य आहे.

## आमची विवाहसंस्था.

मासिक मनोरंजनाच्या मे महिन्याच्या अंकांत प्रस्तुतच्या युद्धाचे समाजावर घडणारे भावी परिणाम सांगतांना या युद्धापासून स्त्रिया अधिक स्वावलंबी होतील असें सांगून विवाह म्हणजे स्त्रीपुरुषांच्या सोयी साठीं केलेले तात्पुरते करार असावे या गोष्टीला लेखकानें पसंती दाखविली आहे. मासिक मनोरंजनाच्या या लेखकानें विवाह संस्थेला हीनता आणणारे अशा प्रकारचे विचार प्रकट करावे यांत आश्चर्य नाहीं, पण असल्या प्रकारचे लेख आपल्या समाजांतल्या तरुण स्त्रीपुरुषांच्या हातीं जाऊं देण्यापासून कांहीं अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव आहे कीं काय या गोष्टीचा विचार प्रत्येक कुटुंबांतल्या कर्त्या माणसानें करणें आमच्या मतें फार अवश्य आहे. पाश्चात्य देशांत विवाहसंस्था ही स्त्रीपुरुषांच्या सोयीचा तात्पुरता करार अशा स्वरूपाची असल्यामुळें पाश्चात्य समाजावर अत्यंत अनिष्ट परिणाम घडले आहेत. काडी मोडून मागण्याबद्दलचे अर्ज, व त्यामुळें होणारा गृहशांति व सौख्य यांचा वारंवार होणारा भंग, स्त्री व पुरुष यांच्यांतल्या प्रेमाची चंचलता इ. अनेक अनर्थांच्या मुळाशीं विवाहसंस्थेचें हें करारांचें स्वरूप आहे असें विचारी पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ कबूल करीत आहेत. व हिंदु लोकांत विवाहाला पवित्र धर्मसंस्कार मानण्यांत येतें यामुळेंच हिंदुसमाजाला चिवटपणा आलेला आहे. असें निरभिमानानें म्हणत आहेत. आणि इकडे पहावें तर आमच्यांतले लेखक विवाहविधीच्या पवित्र संस्कारस्वरूपाला कंटाळून त्याला करारांचें स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून अट्टाहास चालवूं लागले आहेत हें पाहून हंसावें कीं रडावें तें कळत नाहीं. आमच्या विवाहपद्धतींत अनेक व्यंगें आहेत, तीं आम्हांला दिसत नाहींत, किंवा ती सुधारण्याचा आपण प्रयत्न करूंनये असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. पण हिंदुसमाजाला स्थैर्य देऊन त्याला काळाच्या तीव्र प्रहारांतून ज्यानें आज सहस्त्रावधि वर्षें मोठ्या शिताफीनें वांचविलें त्या स्वरूपाला त्या पवित्र संस्कारस्वरूपाला तिलांजलि देण्याविषयींचा उपदेश करणें म्हणजे समाजरूपी देहावर विषप्रयोग करण्याइतकें निंद्य आणि आत्मघातकी कृत्य आहे, आणि असें कृत्य करूं पाहणाराचा निषेध प्रत्येक कुटुंबवत्सल हिंदुगृहस्थानें करणें हें त्याचें अवश्य कर्तव्य होय असें आम्हांला वाटतें.

## अत्यंत शोचनीय मृत्यु.

हिंदुस्थानाला सध्याच्या प्रसंगीं असाधारण बुद्धिमत्ता, अविरत व्यासंग, निर्दोष शील आणि उच्च प्रतीची महत्वाकांक्षा इत्यादि गुणांनीं युक्त अशा कार्यां माणसांची अत्यंत जरुरी आहे, आणि अशाच वेळीं मुंबईचे विल्सन कॉलेजांतील संस्कृतचे प्रोफेसर रा. भडकमकर व अलाहाबादचे डा. सतीशचंद्र ब्यानर्जी यांना मृत्यूनें ग्रासिल्याची अत्यंत शोचनीय बातमी येऊन थडकत आहे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. प्रो. भडकमकर हे अत्यंत साल्स व धार्मिक वृत्तीचे, तथापि सत्यनिष्ठ आणि सतत व्यासंगी विद्वान् होते. कर्तव्याकडे त्यांची दृष्टि होती. टिमकी वाजविण्याकडे नव्हती. म्हणून त्यांच्या नांवाचो जरी विशेषशी प्रसिद्धी झाली नाहीं तरी मुंबईतले लोक त्यांची खरी योग्यता जाणून होते. डा. ब्यानर्जी यांची बुद्धिमत्ता अलौकिक होती. ते अलाहाबाद व कलकत्ता या दोन्ही युनिव्हर्सिट्यांच्या एम. ए. परीक्षांत पहिले आले होते. प्रेमचंद रायचंद स्कॉलर होते, व अलाहाबाद हायकोर्टाचे ॲडव्होकेट युनिव्हर्सिटीचे फेलो आणि कायदेकौन्सिलचे सभासद होते. संयुक्त प्रांताला कार्यकारी कौन्सिल मिळण्याचे संबंधांत नुकतीच जी प्रचंड सभा अलाहाबादला झाली होती तींत त्यांनीं फार मुद्देसूद आणि जोरदार भाषण केलें होतें. याचे भारदस्त लेख हिंदुस्थान रिव्ह्यू व प्रवासी या मासिकांतून येत असत. याचें वर्तन अतिशय सरळ, व आचरण तरुणांनीं कित्ता घेण्यासारखें होतें. असे नररत्न वयाच्या ४० व्या वर्षीं हरपावें ही अत्यंत दुर्भाग्याची गोष्ट आहे, पण ईश्वरी सत्तेपुढें मान वाकविली पाहिजे. त्याला उपाय नाहीं, म्हणून दुःख गिळावें का. तें.

## वर्षाकाल

मृग नक्षत्राला प्रारंभ होऊन आकाशाचे देखावे पाहूं लागण्यास उशीर झाला आहे तथापि सरकारी तज्ज्ञ शास्त्री कळवितात कीं पर्जन्य थोडाबहुत ठिकठिकाणीं पण सार्वत्रिक होऊन एकंदर पाऊस गेल्या सालापेक्षां कमी होण्याचा रंग नाहीं. अरबी समुद्रापेक्षां बंगालच्या उपसागराच्या भागाला पर्जन्याचा जोर अधिक आहे. वादळें, तुफान व इतर चिन्हें भावी पर्जन्याच्या ध्वजा फडकावीत आहेत.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—मृग लागून एक सप्तक लोटलें व आतांशा कोठें पर्जन्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. दुपारीं कडक ऊन पडतें व क्वचित् आकाश साभ्र होऊन मनस्वी उकडतें. संध्याकाळींचे कढत वारे कमी होत आहेत. रात्रीं व सकाळीं पर्जन्याच्या वाऱ्याच्या सुखसेव्य झुळुका अनुभवण्यास मिळतात. एकंदरीने हवा स्वच्छ व निरोगी असून शहरांत रोगराई नाहीं.

**साभार स्वीकारः**—रा. रा. पाडुरंग नारायण मिराळ यांचे कडून 'बालसन्मित्र मालेचे' "नीति माधुर्य" नांवाचें आठवें पुष्प आमचेकडे आलें आहे त्याचा आम्ही साभार स्वीकार करितों. या मालेच्या पूर्वीच्या पुष्पास सध्याच ही पुष्प सर्वतोपरी साजेल असेंच असून आपल्या सुवास माधुर्यानें त्यास दिलेलें नांव सार्थ करीत आहे.

रा० रा० वेंडू हरी काळेगांकर, तहशीलदार, मंगरूळपीर, यांस तीन महिन्यांची हक्काची व एक वर्षाची फर्लो रजा मिळाली आहे.

रा० रा० पांडुरंग वासुदेव भगत यांस रजेवरून परत आल्यावर मंगरूळपीर येथें तहशीलदार नेमण्यांत आलें.

रा० रा० रामचंद्र नारायण साठे यांस रजेवरून परत आल्यावर इलिचपूर येथें तहसिलदार नेमिलें. व यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर इलिचपूरचे हल्लींचे ऑफिशिएटिंग तहसिलदार रा. रा. महम्मद जैनु-उल-अबिदीन यांस त्यांच कामावर बाळापूर येथें बदलण्यांत आलें.

बाळापूरचे सध्यांचे ऑफिशिएटिंग तहसिलदार रा० रा० वामन कृष्ण यांस-रा० रा० महम्मद जैनु-उल-आबिदीन यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर वाशीम येथें आपल्या पूर्वीच्या नायब तहसिलदारच्या जागीं परत करण्यांत आलें.

**अभिनंदनः**— आपल्या प्रांताचे चांगलेच परिचित रा० रा० माधव काशीनाथ ओक हल्लीं चांदास हेड मास्तर आहेत. उशीरानें कां होईना पण रा० स्लाय साहेबांच्या कक्षेबाहेर रा० ओक गेले असून ही आज सहा वर्षांनंतर सरकारास त्यांची आठवण होऊन सरकाराने त्यांच्या हुषारी बद्दल त्यांस रावसाहेब ही मानाची पहिली पदवी दिली आहे यावरून त्यांच्या मित्र मंडळीस आनंद होईल.

## नोटीस

सर्वत्र लोकांस माहीत होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं, आकोलें बोट क्लबचे मेंबर लोकांनीं मोरणा नदीचे पूर्व कांठची वरील बंधाऱ्या जवळील १००+१०० फुट जागा बोट क्लब बांधणे करितां मिळावी म्हणून अर्ज दिला आहे. आणि ती जागा तारीख ३० जून १९१९ रोजीं सकाळीं ७ वाजतां ठिकाणावर हराश केली जाईल. कौलपट्टा ३० वर्षांकरितां देतां जाईल. पट्टेदारांस सदरहू जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेल्या कामाशिवाय इतर कामाकडे डेप्युटी कमिशनर सा० व० यांचे लेखी परवानगी शिवाय करतां येणार नाहीं पट्टेदारांस कौलपट्ट्याच्या ठरलेल्या नमुन्यांतील शर्ती कबूल असल्या पाहिजेत. कळावें. ता० २१।५।१९१५

सही
Jay Narain
E. A. C.
Akola

N. N. 234

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २१ माहे जून सन १९१९ ई० [ अंक २४


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.



## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २



### केशराचें फूल मुफ्त.

पवित्र केशर ॥।=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरा तिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ ॥

$3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८


### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala.
Dadar Bombay.

N. N. 5


## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी
नो. नं. ४


### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिथिच्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व०-ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १ रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची सप्रमाण उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३


### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेपनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—चैंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं ७



### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रतिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेथार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रतिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी- १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल ... व्ही. पी. नें पाठवूं.

मूळे एन्ड ...



### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तींचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापुन तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर


### नोटीस

नोटीस बेशमी छाबिल्या उर्फ हिरालाल व॥ जगन्नाथ जात कलाल राहणार बेलोरा ता० मोर्शी जि० उमरावती.

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझे जवळून आपले गरजेस्तव रुपये १५८ अक्षरी पंधरा रुपये आठ आणे ता. २१-९ १९०९ इ० रोजीं नेले व त्या रुपयास प्रत्येकीं दरमहा १ आणा देण्याचें कबूल करून वरील रुपयांत तुम्ही आपला माल मजजवळ गहाण ठेविला. तो येणें प्रमाणें गुंडतोन्याचा १ भरणें तांम्याचें १ चाटी तांम्याची १ झारी तांब्याची १ चरवी पितळेची १ ताट पितळेचे १ समई पितळेची १ (पेचाची) समई पितळेची १ [ झेला ] भरत्या पितळेचा १ पळी पितळेची १ गुडगुडी पितळेची १ तावे २ पितळेचे, दोन सतार्के तांम्याचे, (दारु मोजण्याचीं मापें) शेर, १ अच्छेर, १ पावशेर १ छटाक, १ हा सर्व माल जुनाट व फुटका असून तुम्ही वरील रुपयांत व वरील व्याज देण्याचे शर्तीवर गहाण ठेविला आहे. या गहाणास सरासरी ५ वर्षे ८ महिने झाले असून अजून पावेतों तुमचा मजजवळ असलेला गहाण माल तुम्ही सोडून नेला नाहीं. तरी नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आमचे पैसे व्याजा सुद्धां देऊन तुमचा मजजवळ असलेला गहाण माल सोडून न्यावा. न नेल्यास हाच रसीद समजावी. मी त्या मालाची विक्री करून आपले पैसे वसूल करीन कळावें. ही नोटीस लिहून दिली ता. २१।५।१९१९ इसवी.

सही.

शिवराम जाणुजी ववरे राहणार बेलुरा तालुका मोर्शी जिल्हा उमरावती दस्तुर खुद.

नो० नं० २४२

## नोटीस

नोटीस बेशमी किसनलाल वा। मोधराज मारवाडी रा० काट ता० वाशीम यांसः—

खालीं सही करणार हे तुमच्या नोटीशीचे उत्तर देतो कीं, आह्मास तुमचे कांहीं देणें नाहीं असे बद्दल जाण्या वा। चाहद्या यानीं ता० २४-४-१९१९ रोजीं अंक २० चीं प्रसिद्ध नोटीस केली आहे त्या अदावती वरून तुह्मी ता० २-६-१९ ची लबाडीची नोटीस केली ती अशी कीं मौजे गीह येथील स. नं. ३७ साळीम व स० नं० ३३ नीम्मे सन १३२३-२४ फसली या दोन साळाकरितां दरसाल रुपये १३९ (एकशे पसतीस) स्वामित्वानें वहीतीस घेतले ही सर्व तुमची लबाडी आहे. कारण कीं मी खालीं सही करणार जाण्या वा। चाहद्या यानीं सदर्हू शेतें मुळींच वहीत केले नाहींत व त्या शेताचे स्वामीत्वाबद्दल मला कांहीं पैसे देणे नाहींत परंतु मी खालीं सही करणार सुर्या वा। रायभान महार यानीं वरील दोन साळाकरितां सदर्हू शेत स० नं० ३७ यातील वहीत असलेली दोन तीफनींची जमीन दरसाल रुपये १९ व स० नं० ३३ हे निम्मे दरसाल रुपये ३९ असे दोन्ही साळचे दरसाल रुपये ५० यात वहीतीस घेतले होते ते दोन साळचे रुपये १०० यांत मी तुह्मास दोन्ही साळाचे पीक कापुन ज्वारी मिळून रुपये २९९ चा माल मी तुह्मास दिले त्यात तुमचे दोन साळाचे स्वामित्वाचें रुपये १०० व मजला तुमचे घेण्यावरून देणें रुपये ८० ते रुपये सवाई सुद्धां रुपये १०० एकूण रुपये २०० तुमचे वजा होऊन बाकी रुपये ९९ सही करणार सुर्या यांस तुमचे कडून घेणे आहे व तुह्मी केलेली नोटीस यातील सर्व मजकूर खोटा आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत वरील मालाचा हिसाब देऊन माझे जास्त पडलेले रुपये ९९ व्याजासुद्धां तुह्मी द्यावेत नाहीं पेक्षां तुमच्यावर दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां रकम वसुल केली जाईल. कळावें ता० ७।६।१९

सह्या

१ जाण्या वा। चाहद्या महार रा० गीह ता० वाशीम

२ सुर्या वा। रायभान महार रा० गीह ता० वाशीम

नो. नं. २४८

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं चिरं. रा. रा. गंगाधर हा वेडा झालेला आहे तेव्हां त्याच्या बरोबर कोणीही देवघेव किंवा व्यवहार करूं नये. त्या देवघेवीची जबाबदारी आह्मावर किंवा आमच्या इस्टेटीवर येणार नाहीं. लोकांस सावध करण्यासाठीं ह्मणून मुद्दाम ही जाहिर सूचना दिलेली आहे.

आकोला १६-६-१९ नो. नं. २४९ } गणेश विष्णु खरे पेनशनर, आकोला.

## जाहिरनोटीस

सर्वत्र लोकांस आणि शेवंती मर्द तुकाराम जात कुणबी राहणार कंडारीबु॥ ता० मलकापूर जि० बुलडाणा.

ईसः—

खालीं सही करणार जाहिर नोटिशीनें कळविते कीं, तूं माझा मुलगा नामें तुकाराम याची मुहुर्ताची बायको आहेस. माझा मुलगा मरून आज सरासरी १९ दिवस झाले आहेत. करितां तूं गावांतील लोकांच्या मसलतीनें माझे इस्टेटीची अफरातफर करूं पाहात आहेस. माझ्या असे ही ऐकण्यांत आले आहे कीं, तूं कोणांस शेतें खरेदी, गहाण, देऊन पैसे घेऊन पळून जाण्याच्या बेतात आहेस. तरी इस्टेटीवर मी हयात अहे तो पर्यंत तुझा कोणत्याच प्रकारचा हक्क चालत नाहीं. कारण सर्व इस्टेट वडिलोपार्जित असून कांहीं माझा नवरा मयत नामें खुशाल वा। हसाजी पाटील यानें स्वतः कमाविली आहे. यामुळें तूं गंधर्वाचा नवरा न करितां हयात आहे तो पर्यंत अन्नवस्त्राची मालकीण आहेस. गंधर्व केल्यास कांहीं एक हक्क नाहीं. करितां माझी इस्टेट माझे परवानगी शिवाय कोणास गहाण खरेदी अगर कोणत्याही प्रकारें दिल्यास अगर कोणी घेतल्यास रद्द असे.

सही

तुळसाई मर्द खुशाल पाटील रा० कंडारीबु॥ ता० मलकापूर तर्फे रामचंद्र तानकु पाटील द० खुद्द ता० १०।६।१९

नो० नं० २४३

## नोटीस

नोटीस बेशमी विठोबा वा। भोनाजी पाटील आडनांव कान किरड रा० कसबे वडनेर गंगाई ता० दर्यापूर

यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी बायको नामें तुळशी ही तुझी साळी असून इचें व माझें गंधर्व होण्यास सरासरी दीड वर्ष झालें. व ती माझे घरांत सहा महिने राहिली. पुढें मी तिला घेऊन गाडी बैल सहीत तुझे घरीं पाहुणा ह्मणून आलों. त्यास सरासरी बारा महिने होत आले त्या वेळीं तूं माझे बायकोचे आंगावरील दागदागिनें काढून माझे मालाची अफरातफर करून व तिला अटकावून ठेविले होते. ह्मणून मी ता० ३।८।१४ इ० रोजीं अर्ज केला. तें प्रकर्ण राहिमापूर पोलीस स्टेशनांत चौकशीस येऊन चौकशी झाली. पुढें सदर्हु प्रकर्णाचे काय झालें हें मला समजलें नाहीं. नंतर कांहीं दिवसांनीं तूं माझे बायको कडून अर्ज करविला. तो अर्ज रद्द झाला. पुढें माझे बायकोस मी घेऊन जात असतां मार्गांत कुटासे येथील पाटलानीं अटकाव करून रिपोर्ट केला. त्याची चौकशी दाहिहांडा येथ स्टेशनांत होऊन पोलीस अमलदार यांनीं माझी बायको मला समागमे नेण्यास हुकूम दिला. व मी आपले घरीं तिला नेऊन तेथें बरेंच दिवस राहिलो. नंतर तूं मला असा निरोप पाठविला कीं, गी फार आजारी आहे. करितां माझे भेटीस येऊन आपलें सामान [illegible] घेऊन जावें. वरून मी अंदाज चार महिने झाले. माझे बायको समेत तुझे घरीं आलों. तेव्हां तूं मला असे ह्मणाला कीं, माझी मानगी दुरुस्त होई पर्यंत रहा, माझी मानगी दुरुस्त झाल्यावर मी तुझें सामान देतों, असें सांगितल्या वरून मी बायको समेत तुझे घरीं राहिलो. मानगी दुरुस्त झाल्यावर मी माझे सामान मागूं लागलो. तेव्हां तू ह्मणाला कीं, माल पावला व पुढें तंटा राहिला नाहीं ह्मणून करारनामा लिहून दे, वरून मी ता० २६।३।१९ इ० रोजीं कागद आणून तुझे घरांत रात्रीचे ८ वाजण्याचे सुमारास लेख लिहून मला सही करण्यास सांगितलें. परंतु मी ह्मणालो कीं, मला लिहिता वाचतां येत नहीं मी कोणाकडून वाचून घेऊन नंतर मी सही करून देतो परंतु तुह्मी मला बाहेर जाऊं न देतां करारनाम्याचा मजकूर वाचून दाखविला. व कांहीं सामान ही दिलें. व बाकीच सामान आणि बायको उद्या पाठवितो, असे बोलल्यावरून मी करारनाम्यावर सहीची नि॥ आंगठा केला. दुसरे दिवशीं मी सामान व बायको पाठवा ह्मणून ह्मणालो असतां तूं ठगबाजीच्या गोष्टी करूं लागला. व ह्मणालास कीं, तूं फारकतीवर सही केली आतां तुझा बायकोवर हक्क राहिला नाहीं. वरून मी तपास केला असतां तूं मला फसवून करारनामा ह्मणून फारकतीवर सही करून घेतली. परंतु तूं हें केलेलें कृत्य सर्वस्वी खोटें असून केलेली सहिची नि॥ मला कबूल नाहीं करिता या नोटिशीद्वारें कळविण्यांत येते कीं, तूं ही नोटीस पावल्या तारखे पासून ८ दिवसाचे आत माझी बायको राहिलेल्या सामाना सहीत आणून घालावी. व नोटिशीचा जबाब द्यावा, तसें तूं न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाऊन त्यास जो कोर्ट खर्च पडेल तो द्यावा लागेल. ही नोटीस तारीख ८।६।१९ इ० दस्तुर परशराम रावजी घोरड वडनेरगंगाई

सही

नि॥ तुकाराम वा॥ रावजी कांगटे रा० वडनेरगंगाई याचा आंगठा असे दस्तुर बर प्रमाणें

नो० नं० २४४

## नोटीस

नोटीस बेशमी सटवा वा॥ भवानजी आंध हल्लीं राहणार बिजोर तो. पुसद जिल्हा यवतमाळ.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुमशी लग्न होऊन ९ वर्षें झालीं. व मजला शाहाणी होऊन मु॥ आज ४ वर्षे होत आलीं आहेत. परंतु मी शहाणी झाले पासून तुह्मी माझेशी संसार केला नाहीं. आजपर्यंत मी आपले भावाचे घरीं आहे. तुह्मी मजला आपले घरीं नेत नाहीं. मजला भावाचे घरीं राहून ४ चार वर्षांत सावकार देणें ८०–९० रुपये झाले आहे. ते लोक मजला पैसे मागत आहेत. आपण मजला आपले घरीं नांदवितही नाहीं. व दुसरा [illegible] करण्यास परवानगीही देत नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून १० दिवसांत आपण येऊन माझे देणेदारीचा निकाल करावा व मजला घेऊन जावे. न नेल्यास मी दुसरा घरोबा करण्यास मोकळी होईन. पुढे तुमची माझेवर कांहीं सत्ता राहणार नाहीं. कळावें ता. ११।६-१९ इ० द० व्यंकटेश धुंडीराज अर्जनवीस पुसद.

सही.

नि॥ जनी मर्द सटवा आंध राहणार करोळ पोष्ट तो. पुसद जिल्हा यवतमाळ.

नो० नं० २४५

## नोटीस

नोटीस बेशमी पांडुरंग वा॥ गोविंदा जात मराठे आडनांव खडसे राहणार मौजे नेतन्स तो. वाशीम जिल्हा आकोला.

यांसः—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे भाये असून नातेवाईक असल्यावरून तुह्मास मी रजिस्टर कुलमुकत्यारपत्र करून देऊन मुकत्यार माझे वतीने काम करण्यास नेमिले होते. परंतु हल्लीं तुमचा आमचा बेबनाव झाल्यामुळें आह्मी या नोटीसीनें तुमचे कुलमुकत्यारपत्र रद्द केलें आहे. तुह्मी आज पासून आमचे नांवानें स्थावर, जंगम ईस्टेटी वा॥ व कोर्टांत वगैरे कोणतेच प्रकारे कागद पत्राचा लिखावट करूनये. कांहीं आमचे नांवानं कागद पत्राचा लिखावट लेख करून दिल्यास तो रद्द असे. तुह्मी यापूर्वी जीं जीं कामें केलीं असतील त्या संबंधीं तुमचे जवळ आमचे नांवचे असलेले कागद पत्र व आमचे नांवचे कुलमुकत्यारपत्राचा नोंदलेला दस्तऐवज असे सर्व कागद आह्मास देऊन त्यासंबंधीं हिशोब समजून देऊन आमची पावती घ्यावी. तसें न केल्यास रिती प्रमाणें कायदेशीर रितीनें तुमचेवर तुह्मी विश्वासानें आमचे कागद पत्र दाबून बसले ह्मणून फौजदारी कोर्टांत दावा करण्यांत येईल. व हिशोबाबा॥ दिवाणी कोर्टांत दावा करण्यांत येईल. पांडुरंग गोविंद यांचे कुलमुकत्यारपत्र रद्द केले आहे त्यांचे पासून माझे नांवानें कोणी कांहीं लेख घेतल्यास तो रद्द असे. हो नोटीस लिहून दिली सही ता. ११ जून सन १९१९ इसवी द० त्रिंबक बाळाजी पांडे सिरपूर.

सही.

सारजाबाई भ्रतार कोंडजी रा. सेलू खडस्याची पोष्ट रिसवड तो. वाशीम जि. आकोला नि. आंगठा.

नो० नं० २४६

## नोटीस

नोटीस बेशमी बाळाजी परशराम व यादव परशराम वाढी रा० मुंगळ ता० वाशीम जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मुंगळे येथील सखाराम

देविदास या नांवचें मिनिंग कटरी म असलेल्या तुह्मा उभयतां बंधूचा दोन आण्याचा हिस्सा तुह्मी उभयतांनीं तारीख १४।६।१४ इसवी रोजी नगदी रोख रुपये १२०० घेऊन मजला विकत दिला. व रुपये १२०० पावल्याची पावती लिहुन देऊन आह्मी मागू त्यावेळेस सदर्हु दोन आण्याचे हिश्या बद्दल खरेदीखत करून देण्याचा करार केला. त्या प्रमाणें आह्मी खरेदीखत करून मागितलें असतां आपण उडवा उडविची उत्तरें दिलीं. करितां या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येते कीं, नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आपण आह्मास सदर्हु दोन आण्याचे हिश्या बद्दल खरेदीखत करून द्यावें. नाहीं तर आह्मी कायदेशीर रितीनें कोर्टे मार्फत सदर्हु खरेदीखत करून घेऊं, व आपणास व्यर्थ कोर्ट खर्च द्यावा लागेल. त्याबद्दलची जबाबदारी आपणावर राहील. ही नोटीस ता० १६ ६-१५

सही

सखाराम देविदास नाइक मुंगळेकर

नो० नं० २४४

---

## आमचे छापखान्यांत—

मराठी आणि इंग्रजी हरएक प्रकारचे लहानमोठें काम अत्यंत सुबक, सुंदर मुदतशीर व माफक दरानें करण्यांत येतें. हँडबिलें— लग्नचिठ्या, आमंत्रणपत्रिका वगैरेचें काम मनाप्रमाणें करून दिलें जातें एकवार अनुभव घ्या.

मॅनेजर.

---

## नोटीस.

नोटीस बेसमी तुळशी मर्द देवाजी माळी कलौर राहणार कान्हेरी तालुके बाळापूर जिल्हा आकोला.

बाई:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सख्खी वहीन भावजई असून तू गंधर्वाची आहे. माझा भाऊ नामे देवाजी याजला तीन महिने मयत झाला आहे. करितां इने जमनीचा अ[illegible] गतफरा करून नये शेत सर्वे नंबर १६६ पोट हिस्सा नंबर ३ एकर ९ गुंठे ३४ अकार रुपये १० व डागीने गुडवाळ्याचा जोड ४० व सरी २० भास तोळे साकळी २० बारा तोळे पाटल्या १२ बारा तोळे कडे कोपरबाळ्याचा जोड पसतीस तोळे कंठी १० दहा तोळे अरसी ४ चार तोळे चांदी व सोने तोळ्याची १ नथ व बाळ्या दीड तोळ्याच्या जीनगी आफरातफरा करू लागली सबब मी तिला [illegible] देण्याला तयार आहे. ता. १८-६-१९१५ इ.

वरील शेत व डागडागीने कोणास अर्जांस वगैरे देऊ नये दिल्यास तुझेवर कायद्या प्रमाणें तजवीज [illegible] जाईल.

सही.

गणपती वा॥ भवानजी माळी राहणार कान्हेरी द. बु.

नो० नं० २९१

---

## वर्गणीदारांस आगत्त्याची सूचना.

वर्गणीदारांकडे वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पी. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाची तंगी असणें स्वाभाविक आहे हें आम्हीं जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आह्मा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा आव्हेर होणार नाहीं अशी बळ[illegible]ट आशा आहे.

म्यानेजर.

---

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शु॥ ९ शके १८३७

---

## दि बनारस हिंदु युनिव्हर्सिटी.

आज कित्येक दिवस गाजत असलेल्या हिंदु युनिव्हर्सिटीचें बिल वरिष्ठ कायदे कौंसिलच्या गेल्या बैठकींत ना. सर हायकोर्ट बटलर यांनीं कौंसिल पुढें मांडलें ही गोष्ट हिंदुच्या शिक्षणाच्या इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखी आहे यांत तिळमात्र संदेह नाहीं. या बाबतींत ज्यांनीं आजपर्यंत परिश्रम केले त्यांच्या श्रमाचें चीज झालेलें पाहून त्यांना साभिमान आनंद वाटल्यास नवल नाहीं. इकडे आजपर्यंत प्रचलीत असलेल्या शिक्षण पद्धतीला या पुढें नवीन व परिणामीं हितकर असें वळण लागेल ही गोष्ट निर्विवाद आहे. या कामांत हिंदुस्थान सरकारची पूर्ण सहानुभूति आहे. ही गोष्ट [illegible] लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सर हायकोर्ट बटलर यांनीं म्हटल्या दहा वर्षांपूर्वीं अशा तऱ्हेचें [illegible] रकाराकडून कौंसिल पुढें मांड[illegible] ही गोष्ट अगदीं असंभवनीय वाटली असती. आणि तीच घडून येत आहे याचें श्रेय हार्डींजसारखे दयाळू व [illegible] इसराय आह्मांला लाभले असें म्हटल्यास अति[illegible] देईल असें आह्मांस वाटत नाहीं.

हि[illegible] ना. प्रमाणे विल [illegible] व्यांत [illegible] कोर्टातील गोष्ट अ[illegible] ना. लॉर्ड प्रजा हितेच्छु [illegible] या गोष्टीला [illegible] शयोक्तीचा दोष [illegible]

युनिव्हर्सिटी म्हणजे शिक्षणाच्या सर्व बाबतींचें केंद्रस्थान असलें पाहिजे ही समजूत सुधारलेल्या राष्ट्रांतून सर्वत्र दृढ होऊन बसलेली आहे. परंतु या दृष्टीनें विचार केल्यास हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिट्यांना तें नांव ही शोभेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. परीक्षा घेण्यापलीकडे कोणतेच काम यांच्या हतून होण्याचें साधन नाहीं. उपरी निर्दिष्ट केलेल्या युनिव्हर्सिटीचें कार्यक्षेत्र ज्यास्त विस्तृत राहील. कारण कीं शिकविण्याचें काम ही या युनिव्हर्सिटीच्या हातांत राहील व शिवाय तिच्यांत समाविष्ट होणारे विद्यार्थीही तिच्याच देखरेखेखालीं रहातील. आणि असें झालें म्हणजे इंग्लंड सारख्या देशांतून जसें तिला मातृस्थानीं मानण्यांत येतें तसें येथें ही होईल अशी आशा करणें व्यर्थ होणार नाहीं. हल्लीं कॉलेजांतून दिलें जाणारें शिक्षण फक्त बुद्धीला पोषक असेंच असतें. त्यांत धार्मिक शिक्षणाचा समावेश केलेला नसतो. याला मिशनरी कॉलेजें अपवाद आहेत परंतु त्यांच्या योगानें सामान्य नियमाला धक्का पोंचतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण अनेक धर्मांच्या विद्यार्थ्यांना सरसकट ख्रिस्ती धर्माचा एक तास किंवा पाउण तास उपदेश केल्यानें धार्मिक शिक्षणाचा उणीव भरून निघाली असें कोणीही समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. या नवीन युनिव्हर्सिटींत ही उणीव भरून काढली आहे. कोणत्याही धर्माच्या विद्यार्थ्यांना तिच्यात प्रवेश करण्याची मुभा आहे. परंतु ज्यांचा हिंदुधर्म असेल त्यांना मात्र धार्मिक शिक्षण अवश्य दिलें जाईल. हिंदुधर्मांतील लोकाचे पोटभेद कितीही असले तरी त्या धर्माचीं सामान्य तत्वें सर्वांना सारखींच मान्य असल्यामुळें हिंदुधर्मीत सर्व विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण देण्यास कोणत्याही तऱ्हेची अडचण येणार नाहीं. या युनिव्हर्सिटीसंबंधानें लक्षात घेण्यासारखी तिसरी गोष्ट ही आहे कीं हिची सब व्यवस्था हिंदुलोकांच्या हातांत राहून सरकारी अधिकाऱ्यांचा या व्यवस्थेशीं फारच थोडा संबंध राहील.

या युनिव्हर्सिटीची घटना थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. हिंदुस्थानचे गव्हर्नरजनरल हे हिचे रेक्टर व संयुक्त प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर हे व्हिजिटर राहतील. या युनिव्हर्सिटीला ज्यांनीं देणग्या दिल्या आहेत. ते व जे हिचे पुरस्कर्ते आहेत. (पेट्रन्स) हे सर्व व्यवस्थापक मंडळाचे सभासद असतील. या मंडळाला विलांत 'कोर्ट' अशी संज्ञा दिली आहे. हें व्यवस्थापकमंडळ आपल्या कार्यकारी मंडळाच्या द्वारें सर्व व्यवस्थेचें काम करील. कार्यकारी मंडळाचे सभासद ज्यास्तींत ज्यास्त तीस असून त्यांतले पांच सेनेटचे सभासद असले पाहिजेत. शिक्षणाच्या सर्व बाबींची व्यवस्था सेनेटच्या हातात राहील. सेनेट आपले काम आपल्या कार्यकारी मंडळाच्या द्वारें (सिंडिकेटच्या द्वारें) करील. सेनेटचे सभासद कमींत कमी पन्नास असतील व त्यांतील फक्त पांचच सरकारा मार्फत निवडले जातील. चान्सलर, प्रोचान्सलर, व्हाइस चान्सलर प्रोव्हाइस चान्सलर, युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर्स व या युनिव्हर्सिटीत सामील झालेल्या कॉलेजांचे प्रिन्सिपाल हे आपआपल्या अधिकाराच्या जोरावर (एक्स आफिशिओ) सेनेटचे सभासद रहातील. बाकीचे सभासदांची निवड मुख्यतः पुढें दिल्या प्रमाणें आहे. पांच 'कोर्टा' नें निवडून दिलेले पांच युनिव्हर्सिटीच्या पटांत ग्राज्युएट म्हणून नमूद केले गेलेल्या गृहस्थांनीं आणि पांच सेनेटनें निवडावयाचे ते असे कीं ज्यांची हिंदु धर्म [illegible] संस्कृत भाषा या संबंधानें चांगली [illegible] आहे. सिंडिकेटमध्यें व्हाइस चान्सलर [illegible] प्रोव्हाइस चान्सलर हे असुन शिवाय पंधरा सभासद रहातील. पैकीं कमींत कमी दहा तरी युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर्स किंवा युनिव्हर्सिटींत सामील झालेल्या कॉलेजांचे प्रिन्सिपाल्स किंवा प्रोफेसर्स असले पाहिजेत. चान्सलर प्रोचान्सलर व्हाइस चान्सलर व प्रोव्हाइस चान्सलर नेमण्याचा अधिकार "कोर्टा" कडे राहील. प्रोफेसर्स नेमण्याचा अधिकार युनिव्हर्सिटीकडेच राहील.

या युनिव्हर्सिटीच्या अंतर्गत व्यवस्थेचें वर जें सामान्य वर्णन झालें आहे त्यावरून ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी आहे कीं अधिकार व सरकारी नियंत्रण या बाबतींत या युनिव्हर्सिटीचें हिंदुस्थानांतील इतर युनिव्हर्सिट्यांवर बरेंच वर्चस्व आहे. सेनेटचे सभासद निवडणें व्हाइस चान्सलर नेमणे प्रोफेसरांच्या नेमणूका करणें वगैरे बाबतींत या युनिव्हर्सिटीला अधिकार ज्यास्त दिले गेले आहेत. इतकें केलें असतांना सुद्धां पुष्कळ लोकांला या युनिव्हर्सिटीला हातराखूनच अधिकार दिले गेले आहेत. असें वाटतें याचें सर हारकोर्ट बटलर यांस फार आश्चर्य वाटतें परंतु तसें वाटण्याचें कारण नाहीं. "रेक्टर" व व्हिजिटर यांना युनिव्हर्सिटीच्या कामांत हात घालण्याचे जे अधिकार दिले गेले आहेत त्यांचा उपयोग योग्य वेळींच केला गेला तर फारशी अडचण नाहीं परंतु तसें न झालें तर मात्र युनिव्हर्सिटीला दिलेले अधिकार असून नसून सारखेच असा प्रसंग येण्याचा संभव आहे. व अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे स्वतंत्रतेच्या बाबतींत पुष्कळांनीं निराशेचे उद्गार काढल्यास त्यांस केवळ सर्वांशीं दोष देणें बरोबर होईल असें नाहीं. आतां 'रेक्टर' व 'व्हिजिटर' हे आपले अधिकार योग्य वेळींच बजावतील असें आश्वासन सर हारकोर्ट बटलर यांनीं दिलें आहे. परंतु आश्वासन देणारे आणि अधिकार बजावणार हे एकच नसल्यामुळें आश्वासन दिल्या प्रमाणें नेहमींच अधिकारांची बजावणी योग्य वेळींच केली जाईल असे खात्री लायख सांगतां येणें कठीण आहे, वेळो वेळीं जे कोणी या हुद्यांच्या जागांवर असतील ते युनिव्हर्सिटीसंबंधानें अनुकूल मतांचे व तिचे हितचिंतक व स्वभावतः उदार अंतःकरणाचे असतील तरच युनिव्हर्सिटीच्या कामा कामांत कांहीं ही व्यत्यय न येतां काम बिनबोभाट व सुयंत्रित चालेल ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ते कसेंही असलें तरी या युनिव्हर्सिटीचें कार्यक्षत्र ज्यास्त विस्तृत

...की आपण ...ण्याची जबाबदारी ... हाळविण्याचा ज्यांना ज्यांना ... आहे त्या सर्वांवर आहे, व ही जबाबदारी ओळखून वागण्याची सद्बुद्धि परमेश्वर त्यांना देवो व ही युनिव्हर्सिटी चिरायु होवो हीच त्या जगन्नियंत्याजवळ आमची नम्रतापूर्वक प्रार्थना आहे.

या प्रांताकरितां निराळी युनिव्हर्सिटी स्थापण्याचे बरेच दिवस घाटत आहे. व याच सुमारास वरील युनिव्हर्सिटीचें बिल पुढें आलें हा एक विचित्र योगायोग आहे. या बिलांत विश्वासाचें व सहानुभूतीचें जें धोरण दिसून येत आहे तशाच तऱ्हेचें धोरण या प्रांतांतील युनिव्हर्सिटीच्या अधिकार वांटणींत ठेवल्यास शिक्षणाचें पाऊल बरेंच पुढें पडून इतर प्रांतांच्या बरोबरीला कालांतरानें कां होईना जाऊन बसण्यास उत्तम संधि दिल्याचें श्रेय सरकारच्या पदरीं पडणार आहे. निदान हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांप्रमाणें फक्त परीक्षा घेण्याचें काम करणारी आणखी एक युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यासारखें न होण्याची खबरदारी घेणें अत्यंत महत्वाचें आहे. परीक्षा घेण्यापेक्षां युनिव्हर्सिटीचें कार्यक्षेत्र ज्यास्त विस्तृत पाहिजे ही गोष्ट खुद्द हिंदुस्थान सरकाराला ही आतां मान्य झाल्याचें प्रत्यक्ष दिसून येत आहे. तेव्हां या बाबतींत व अधिकार विभागणींत विश्वासाचें व औदार्याचें धोरण ठेवण्याच्या बाबतींत आमचें प्रांतिक सरकार वरिष्ठ सरकाराचेंच अनुकरण करील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

---

## टिळकांचें गीतारहस्य- १

जेथें जेथें ह्मणून मराठी भाषेचा प्रचार आहे तेथें तेथें विद्वान्, अविद्वान् वृद्ध तरुण, रसिक अरसिक वाचकवर्गांत गेल्या आठवड्यांत सर्वांचा बोलण्याचा विषय एकच होता. कचेऱ्यांतून, शिक्षणसंस्थांतून, विद्वानांच्या व अविद्वानांच्या टेबलांवरून एकच ग्रंथ उघडून ठेवलेला दिसत होता. कोणाचीं शंभर पृष्ठें वाचून झालीं आहेत, तर कोणाच्या वाचनाची मजल अर्ध्या ग्रंथाइतकी झाली आहे, कोणी रात्रीचा दिवस करून मुखपृष्ठापासून तर मलपृष्ठापर्यंत घाई घाईनें वाचन संपवून वाचलेल्या विषयाचें शांतपणानें विचार करण्यांत गुंतले आहेत, तर कोणी आपणांस सदर ग्रंथ वाचण्याचा महल्लाभ केव्हां घडेल ह्मणून मोठ्या उत्सुकतेनें दिवस मोजीत बसला आहे; कोणी सदर ग्रंथाच्या बाह्यांगाची तारीफ करीत आहे; तर कोणी त्याच्या कर्त्याच्या विशाल कल्पनेची, कुशाग्र बुद्धीची, विस्तृत वाचनाची, अचाट स्मरणशक्तीची, वादपटुत्वाची, विशदत्वाची, भाषाप्रभुत्वाची किंवा सरळ व रहस्योद्ग्राही विचारसौष्ठवाची प्रशंसा करीत आहे; असा अपूर्व योग मराठी भाषेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत क्वचित्च आला असेल. अर्थात् मराठी भाषेच्या इतिहासांतल्या या अलौकिक प्रसंगाचा अनादर करून इतर विषयांकडे धांव घेणें हें मराठी वर्तमानपत्राच्या संपादकास अल्पसा तरी परिचय तो ग्रंथ हातीं न पडण्याइतकें ज्यांचें दुर्भाग्य असेल अशा वाचकांस करून देण्यासाठीं प्रस्तुतची लेखमाला लिहिण्याचें योजिलें आहे.

वर उल्लिखित केलेला ग्रंथ ह्मणजे रा० बाळगंगाधर टिळक यांचा गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र हा होय या ग्रंथाची कल्पना अपूर्व, त्याची रचना अपूर्व, तसा त्याचा इतिहासही अपूर्व आहे. सन १८७२ सालीं रा० टिळक यांचे वडील आजारी असतां त्यांना वडिलांचे बिछान्याजवळ बसून गीतेवरील प्राकृत भाष्य वाचून दाखविण्याचा योग आला होता. त्या वाचनानें टिळकांना गीताग्रंथाचें महत्व कळावयास लागून त्यांचें लक्ष तिकडे वेधलें. पुढें त्यांचें बरेंचसें संस्कृत व इंग्रजी अध्ययन झाल्यावर त्यांनीं गीतेवरील भाष्यें व टीका आणि त्यावरील पाश्चात्य पंडितांचे विचार हे वाचून त्यांचीं मनांत आपल्या स्वतःच्या विचाराशीं तुलना करतां करतां त्यांना श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाचें रहस्य काय, श्रीकृष्णानीं अर्जुनाला समरभूमीवर जो हा उपदेश केला, त्याचा रोख मुख्य कोणत्या गोष्टीवर होता, या एका गोष्टी संबंधानें अर्थात् भगवद्गीता सांगण्याच्या उद्देशासंबंधानें- आजपर्यंत झालेल्या भाष्यकारांच्या व टीकाकारांच्या मतांत आणि स्वतःच्या मतांत फरक दिसूं लागला. कित्येक वर्षें चिंतन केल्यावर हा मतभेद दृढ होऊन पुणें, नागपूर सारख्या ठिकाणीं व्याख्यानांच्या ओघांत या मतभेदाला थोडीशी वाचा फुटली; तथापि मध्यंतरीं रा. टिळक यांचें लक्ष राजकीय गोष्टींच्या चर्चेकडे व चळवळीकडे सर्वथा गुंतल्यामुळें गीतारहस्य आपल्या दृष्टीनें महाराष्ट्रवाचकांस ऐकविण्यास त्यांना फुरसतच मिळेना. शेवटीं या ग्रंथाच्या विधिलिखितांत होतें तें घडून आलें. रा. टिळक यांना राजद्रोही लेख लिहिल्याबद्दल शिक्षा होऊन मंडालेच्या एकांतवासांत सहा वर्षें घालविण्याचा प्रसंग आला, आणि तेथें याविषयावर अधिक वाचन व अधिक मनन करून रा. टिळक यांनीं आपले विचार पेनसिलीनें लिहून काढून आतां ते पुस्तकरूपानें वाचकांपुढें मांडले आहेत. ईश्वरी योजना मनुष्याच्या बुद्धीच्या आकलनशक्तीला अतीत आहे याचा जर स्पष्ट प्रत्यय पाहिजे असेल तर तो या ग्रंथाच्या इतिहासांत पाहण्यांत मिळतो. कोठें पुणें, कोठें मंडाले, कोठें मनाला सारखा उत्तेजित ठेवणारी आणि टिळकांसारख्या कर्तृत्ववान् पुरुषाच्या बुद्धीला भ्रंश पाडून भलती कडेस नेणारी राजकीय चळवळीची हौस, आणि कोठें राजकीय कैदखान्याची भयाण शांतता! इकडे टिळकांवरच्या प्रसंगामुळें लक्षावधि लोकांच्या डोळ्यांतल्या अश्रूंना खळ पडत नाहीं, आणि तिकडे बळवंतरावजी आपले मनांतले विचाराचे आवेग आवरून तपोवनांतल्या ऋषीप्रमाणें मनःसंयमपूर्वक योग, कर्म, उपासना, तप, सांख्य, इ० गीतांतर्गत निरनिराळ्या पदांचे अर्थांची मीमांसा करीत तितकाच मराठी [illegible] अभ्युदयाला व रा. टिळक य[illegible] लौकिकाला क[illegible] वाटलें होतें! [illegible] टिळकांच्या हातू[illegible] संबंधानें झालेल्या महार[illegible] हातून निराळ्या प्रकारें भरून काढावयाची होती, व ह्मणूनच हा अपूर्व ग्रंथ आणि तोही प्रथम मराठींत लिहिण्याची त्यांना बुद्धि झाली, असें ह्मटलें पाहिजे. रा. टिळक यांच्या गीतारहस्याचीं बारीक टाईपानें छापलेलीं ८९४ पृष्ठें असून बांधणी उत्तम, मजबूत आहे. टिळकांच्या स्वदेशी माल वापरण्याच्या व्रताला साजेल असा स्वदेशी कागद पुस्तकाला वापरला आहे मात्र या व्रताला पाळेबांद लावण्यासाठींच की काय पण बांधणीला विलायतीसारखें कातडें लाविलें आहे. ही चूक टिळकांची किंवा बाईंडरची हें आह्मी सांगू शकत नाहीं. पण ती दोन दृष्टींनीं चूक आहे. एक तर श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ पुष्कळ हिंदु धर्मी वाचकांच्या दृष्टीनें अत्यंत पवित्र ग्रंथ असल्यामुळें अशा पवित्र ग्रंथाला चर्माचा स्पर्श होऊं देणें हें इष्ट नव्हतें. आणि दुसरें निदान परदेशीं कमावलेलें चर्म तरी वापरावयाचें नव्हतें. या पुस्तकाचे दोन खंड करून ते कापडें बांधणीनें बांधले असते ह्मणजे या दोन्ही आक्षेपांतून सुटका झाली असती. परंतु दुर्दैवानें तसें घडलें नाहीं. असो.

पुस्तकाच्या आरंभीं रा. टिळकांनीं संस्कृतांत श्लोक रचना करून आपला ग्रंथ समर्पण प्रथमिमं श्रीशाय जनतात्मने अनेन प्रीयतां देवो भगवान् पुरुषः परः असें मंगल केलें आहे. यांतला 'जनतात्मने' हा शब्द 'जगदात्मने' याबद्दल बुद्धिपूर्वक योजिलेला दिसतो. जनता हें रा. टिळक यांचें दैवत आहे हें त्यांच्या आजपर्यंतच्या चरित्रावरून सर्वांना ठाऊक झालेंच आहे. हिलाच त्यानीं आपल्या निरनिराळ्या लेखांतून व व्याख्यानांतून 'लोकगंगा' असें नांव दिलेलें आहे. प्रस्तुत ग्रंथ हाही केवळ विद्वानांसाठीं नसून एकंदर जनतेला समजावा ह्मणून वेदांतासारख्या शास्त्राचीं गहनतत्वें रा. टिळक यांनीं अतिशय सोप्या पण ओजस्वी भाषेनें बालबोध पद्धतीनें समजावून सांगितलीं असल्यामुळें जनतेची त्यांनीं केलेली आराधना लक्षांत घेतां बुद्धिपूर्वक केलेली ही शब्दयोजना कुशलतेची आहे हें कबूल करावें लागतें.

साडे आठशें पृष्ठांचें हें पुस्तक लिहिण्याचा रा. टिळक यांचा उद्देश या साऱ्या प्रचंड ग्रंथांचे सार-एका वाक्यांत सांगावयाचें झालें तर असें सांगतां येईल कीं कुलक्षयादि घोर पातकांच्या आचरणानें मोक्षप्राप्तिकर आत्मकल्याणाचा नाश होणार, तेव्हां तें करावें कीं नाहीं अशा संदेहानें कर्तव्यविमूढ होऊन बसलेल्या अर्जुनाला भगवंतांनीं केलेला उपदेश शुद्ध वेदांताच्या आधारें कर्माकर्माचें व त्या बरोबर मोक्षोपायाचें विवेचन करणारा असला तरी येवढेंच रा. टिळक यांना यात सिद्ध केलें आहे. पण तें सिद्ध करतांना त्यांनीं जागोजाग श्रुति, स्मृति, पुराणें, व पाश्चात्य पंडित व तत्त्वज्ञ यांच्या मतांचा उल्लेख करून व-अनेक ठिकाणीं पाश्चात्य तत्त्वज्ञानाशीं गीतोक्त प्रमेयाची तुलना केली आहे व विरुद्ध मताचें यथार्थ खंडन ही केलें असल्यामुळें गीतारहस्य हा ग्रंथ गीतेचें केवळ रहस्य सांगणारा एकदेशी ग्रंथ न होतां पाश्चात्य व प्राच्य विचार आणि तत्त्वज्ञान याचा सपेक्ष विचार करणारा तुलनात्मक तत्त्वज्ञानावरील व नीतिशास्त्रावरील प्रमुख ग्रंथ ह्मणून मराठी वाङ्मयांत अग्रस्थान पटकावणारा झाला आहे. असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

या ग्रंथाचीं विषय प्रवेश व उपसंहार मिळून पंधरा प्रकरणें असून शेवटच्या परिशिष्टप्रकरणांत गीतेचा प्रक्षिप्तपणा, गीता व महाभारत यांचें कर्तृत्व, गीता व उपनिषदें यांची तुलना, भागवत धर्माचा उदय, गीतेचा काल, तिचा बौद्धग्रंथाशीं संबंध, गीता व ख्रिस्ती बायबल यांची तुलना वगैरे अवांतर विषयांचें समर्पक विवेचन केलें आहे, व शेवटीं ख्रिस्ती लोक गीते संबंधानें जे आक्षेप घेतात त्यांना उत्तर देऊन टीकाकारांच्या तंगड्या त्यांच्याच गळ्यांत घालण्याच्या उद्देशानें असें दाखविलें आहे कीं ख्रिस्ती धर्मांतलीं तत्त्वें बौद्धधर्मापासून ह्मणजे पर्यायानें वैदिक धर्मापासून अर्थात् गीतेपासूनच घेतलीं असण्याचा फार संभव आहे.

एका दृष्टीनें हा सारा ग्रंथ स्वतंत्र विचारांची संस्थापना करणारा आहे, व दुसऱ्या दृष्टीनें तो अतिशय चर्चात्मक आहे. कोणत्याही दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें तरी हा ग्रंथ बेकननें केलेल्या ग्रंथांच्या वर्गवारी पैकीं 'अक्षर' ह्मणजे चिरंजीव ग्रंथांच्या वर्गांतला आहे. इतर व्याप संभाळून तत्त्वज्ञानासारख्या विषयावर सूक्ष्म विचार करणारे व मोठाले ग्रंथ लिहिणारे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका या देशांतल्या थोर पुरुषांप्रमाणें आमच्या महाराष्ट्रांत ही कांहीं लोक आहेत, असें अभिमानानें महाराष्ट्रास आतां सांगतां येईल, व मराठींत एम. ए. परीक्षेला नेमण्यासारखें पुस्तक नाहीं अशी जी मुंबई युनिव्हर्सिटीची कुरकुर होती तीही आतां मिटेल अशा अप्रतिम योग्यतेच्या या ग्रंथाचें स्थूलस्वरूप आह्मी या लेखांत वर्णिलें आहे. या पुढील लेखांत या ग्रंथाच्या अंतःस्वरूपाचा परिचय आमच्या वाचकांस आह्मी करून देणार आहों, इतकें सांगून हा प्रास्ताविक लेख पुरा करतों.

---

## तुकारामाचें संस्कृतज्ञान.

पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेंत अलीकडे कित्येक वर्षांपासून तुकारामासंबंधानें दरसाल एकतरी व्याख्यान होत असतें. या साधूच्या चरित्राचा व उपदेशाचा महाराष्ट्रसमाजावर जो परिणाम घडला आहे तो लक्षात घेतां या पुरुषाच्या चरित्राचें खरें स्वरूप महा-

राष्ट्राला जेव्हां दिसूं लागेल तो सुदिन ह्मटला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां यंदाच्या वसंतव्याख्यानमालेंत हरिभक्ति परायण पांगारकर बुवांचें तुकारामाचें अध्ययन याविषयावर जें व्याख्यान झालें तें फार अभिनंदनीय ह्मटलें पाहिजे. तुकारामानें आपल्या पूर्ववयांत संस्कृताचें अध्ययन करून भागवत, गीता, वगैरे ग्रंथ मुळ ग्रंथांवरून लक्षपूर्वक वाचले असले पाहिजेत. कारण त्यांच्या अभंगांत या ग्रंथांतल्या अनेक श्लोकांशीं समानार्थक अनेक उक्ति आहेत, असें रा० पांगारकर यांचें ह्मणणें आहे. व सुबोधपत्रिकेसारखीं कांहीं पत्रें या बद्दल त्यांचा उपहास करीत आहेत. आमच्या मतें खरी गोष्ट अशी आहे कीं रा. पांगारकर यांनीं दिलेली माहिती चुकीची नाहीं, तर्कज्ञान मात्र दोषयुक्त असल्यामुळें त्यांनीं काढलेला सिद्धांत आक्षेपार्ह आहे. ह्मणजे तुकारामाच्या अभंगांत गीता किंवा भागवत यांच्यांतल्या श्लोकांशीं तंतोतंत मिळणाऱ्या अनेक उक्ति आहेत ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण यावरून तुकारामानें संस्कृताचें अध्ययन केलें होतें असें ह्मणतां येत नाहीं. कारण त्याकाळीं या ग्रंथांतलें ज्ञान कीर्तन व पुराण यांच्या श्रवणद्वारां अगदीं सहजगत्या प्राप्त होत असे. अद्याप ही आपल्या कित्येक ज्ञात्या बायांना वारंवार कथापुराणें ऐकून वेदांताचीं गूढ तत्वें पाठ केल्याप्रमाणें विस्तारानें सांगतां येतात. कित्येकांच्या मनावर ही त्यांचा संस्कार उत्तम प्रकारें झालेला असतो व कित्येक भाविक स्त्रियांना गीता तोंडपाठ ही असते. पण त्यावरून त्यांनीं संस्कृताचें अध्ययन केलें असलें पाहिजे असें ह्मणणें धाडसाचें होईल. भाषाज्ञान व मनावर संस्कार होणें या गोष्टी स्वतंत्र आहेत. व त्या स्वतंत्रपणें राहूं शकतात. तुकारामाला संस्कृतज्ञान होतें या विधानाला अन्य कांहीं पुरावा मिळाल्याशिवाय रा० पांगारकरांचें ह्मणणें अनुमवाला व युक्तिवादाला पटण्यासारखें नाहीं.

## प्रस्तुत युद्धाचें एक स्वरूप.

प्रस्तुत युरोपखंडांत चालू असलेल्या युद्धाचा विचार लोक निरनिराळ्या दृष्टीनें करीत आहेत. कोणी ह्मणतात कीं हें युद्ध ह्म.जे लोकसत्ता व व्यक्तिसत्ता या दोहोंत व्यक्तिसत्ता अधिक घातक असते याचें मूर्तिमंत उदाहरण आहे. कोणी ह्मणतात कीं राक्षसी महत्वाकांक्षेचे दुष्परिणाम दाखविणारें तें मूर्तिमंत उदाहरण आहे. मिसेस ॲनी बिझांटबाई या युद्धाकडे अध्यात्मिक दृष्टीनें पाहून ह्मणतात कीं जर्मनींत जडवादाचा जो अतिरेक झाला व भौतिकशास्त्रांना भलतें वळण लागलें त्यामुळें जीं भौतिकशास्त्रें मनुष्याच्या सुखसंवर्धनास कारण व्हावयाचीं तींच त्याच्या घातास कारण होत आहेत. भौतिक शास्त्रांचा हिंदुस्थानांत प्रचार जराव्यानें व्हावयास पाहिजे. तो तसा होत नाहीं. ह्मणून आमचा देश राष्ट्रांच्या शर्यतींत मागें पडला आहे असें ह्मणणारांनीं पुढील गोष्ट ध्यानांत ठेवावी. मि० सिनेट यांनीं एका जीवन्मुक्त ऋषीस आग्रहाची विनंति केली कीं ‘ भौतिक शास्त्रांची प्रगति होण्याकरितां महाज्ञानी ऋषींनीं मानवजातीस मदत करावी. ’ त्यावर त्या ऋषीनें उत्तर केलें कीं ‘ सदसद्विवेक वाढून मनुष्याचें अंतःकरण शुद्ध झाल्याशिवाय आह्मी पाश्चात्य शास्त्रांस मदत करणार नाहीं. ’ सारांश काय तर हिंदुस्थानें केवळ अध्यात्मज्ञानाकडे आपलें सारें लक्ष लावून आपलें ऐहिक कर्तव्य, प्रत्यक्ष सृष्टींतल्या संचारांत असतांना करावयाचें कर्तव्य– त्याविषयीं पराङ्मुख होऊन आपलें नुकसान करून घेतलें, तसें जर्मनी उलट टोंकाला जाऊन ह्मणजे पूर्ण जडवादी होऊन त्यानें धर्माकडे पाठ दिली त्याचा हा परिणाम आहे असें मिसेस बिझांटबाईचें ह्मणणें आहे. ह्मणजे प्रस्तुतची लढाई ही राष्ट्रराष्ट्रामधली नसून तत्वातत्वांमधली आहे. रामरावण यांच्यामधलें युद्ध किंवा कौरवपांडव यांच्यामधलें भारतीय युद्ध यांच्या संबंधानें जशीं रूपकें हल्लीं विद्वानांच्या लेखांतून आढळतात, तसें प्रस्तुत युद्धासंबंधाचें हें रूपक ह्मणून जरी कित्यकांनीं त्याला नाक मुरडलें तरी त्याच्या अंतर्गत जें सत्य आहे तें दृष्टीआड करून चालावयाचें नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे.

## शुभवार्ता.

कलकत्त्याच्या केमिकल आणि फार्मास्युटिकल वर्क्सचे चालक मि. प्रबोधचंद्र चाटर्जी यांनीं ओवऱ्याच्या तेलापासून थायमॉल नांवाचें द्रव्य तयार केलें आहे. शास्त्रीय शोधाच्या बाबतींत बंगाली लोक झपाट्यानें प्रगति करीत आहेत ही शुभवार्ता ऐकून आह्मास आनंद होतो. बंगाली लोकांना वाचाळ ह्मणून आजपर्यंत पुष्कळ परदेशी लोकांनीं व खुद्द आमच्यांतल्यांनींही नांवें ठेविलीं, परंतु आज प्रत्येक बाबतींत हिंदुस्थानांत तेच सर्वांच्या पुढें आहेत. उत्तम वक्ता, उत्तम धर्मशास्त्रज्ञ, उत्तम यांत्रिक बंगाल्यांतच अधिक आहेत. बंगाली लोकांविषयीं व एकंदर कलकत्ता युनिव्हर्सिटीविषयीं परलोकवासी ना. गोखले यांचें ही मत एका काळीं अतिशय प्रतिकूळ होतें. पण पुढें बंगाली लोकांची प्रगति पाहून त्यांना तें बदलावें लागलें होतें. ही गोष्ट त्यांच्या चरित्रकारनें जरी दिली नाहीं, तरी प्रस्तुत लेखकाला स्वानुभवानें पूर्ण ठाऊक आहे.

## नसती उठाठेव.

अलीकडच्या काळांत कित्येक सद्धेतुप्रेरित होऊन का होईना, पण जुन्याचा नाश करून नवीन गोष्टीची प्रस्थापना तिच्या जागीं करीत आहेत हें पाहून आह्मास वाईट वाटतें मातृदेवतेचा सन्मान करण्याचा उपदेश हिंदुस्थानांत तरी करावयास पाहिजे असें नाहीं. ‘ मातृदेवोभव , पितृदेवो भव ’ असा उपदेश तैत्तिरीयोपनिषदांत प्राचीन ऋषींनीं करून ठेविला आहे, व पुंडलीकासारख्यांचीं चरित्रें लोकांच्या दृष्टी आड झालेलीं नाहींत. आपल्या महाराष्ट्रीयांत भद्रपद व० ९ ला अविधवा नवमी हें नांव देऊन तो दिवस मातृदिन ह्मणून पाळला जातो. याच सणाच्या दिवसाला प्रस्तुत देशकालवर्तमानानुरूप इष्ट स्वरूप दिलें असतें ह्मणजे कार्यभाग झाला असता पण नाहीं. जुन्या पुराण्या चालीचा विध्वंस करून नव्या चाली समाजांत घुसडण्याची दुष्ट प्रवृत्ति आमच्यांतल्या कित्येक चळवळ्या लोकांना तसें करूं देईना, आणि त्यांनीं यंदा ता. ६ जून रवि[illegible] हाच दिवस मातृदिन समजून साजरा [illegible]ला. या दिवसाची निवड कोणत्या तत्वावर करण्यांत आली तें परमेश्वरास माहित! मातृदिन साजरा करण्याच्या निमित्तानें जुन्या चालीरीती नष्ट करण्याचें वळण आह्मी भावी पिढीला लावून देणार असलों तर असल्या संस्था न निघतील तितक्या बऱ्या. आह्मी मातृदिनाच्या विरुद्ध नाहीं, पण जुन्या संस्थांचा नायनाट निष्कारण करूं पाहणाऱ्यांच्या व नुसती उठाठेव करण्याच्या विरुद्ध आहों हें येथें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे.

## मुदत वाढली.

आह्मांस कळविण्यास अत्यंत संतोष वाटतो कीं सध्याची आणीबाणीची वेळ हिंदुस्थानच्या राजकीय सूत्रधारांत फेरबदल करण्याची नाहीं, व हिंदुस्थानच्या लोकांस सध्याचे व्हाइसराय साहेब लॉर्ड हार्डिंज हे आपल्या सहानुप्रेरित राज्यधोरणामुळें अतिशय प्रिय झाले आहेत. या दोन्ही गोष्टी लक्षांत घेऊन त्यांची कारकीर्दीची मुदत मार्च १९१६ पर्यंत वाढविण्यांत आली आहे. गेल्या आठवड्यांत खुद्द लार्ड हार्डिंज साहेबांच्या सहीनें जेव्हा ही बातमी प्रसिद्ध झाली तेव्हां ती वाचून युरोपियन मंडळीला थोडेसें आश्चर्यच वाटलें. कारण, लार्ड हार्डिंज यांच्या मागून हारकोर्ट किंवा चर्चिल हे व्हाइसराय होऊन येणार आहेत अशा बातम्या ही विलायतेहून येऊन पोंचल्या होत्या. अशावेळीं हिंदुस्थानच्या रयतेच्या अर्जास अनुकूल जबाब मिळून लार्ड हार्डिंज साहेबाची मुदत वाढविण्यांत येइल असा संभव त्यांच्या दृष्टीनें फार कमी होता. लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द ते हिंदी लोकांस अप्रिय असतांही दोन वर्षांनीं वाढली; आणि लॉर्ड हार्डिंज हे हिंदुस्थानच्या लोकांना हवे असतां ही त्यांची मुदत फक्त सहाच महिने लांबली हा भेद लक्षांत घेण्यासारखा आहे. पण थोडी किंवा फार लांबणें हा प्रश्न येथें महत्वाचा नाहीं हिंदी राजे व प्रजा यांच्या विनंतीचा अनुकूळ विचार बादशहाकडून झाला हाच मुद्दा येथें महत्वाचा आहे, आणि ह्मणून हिंदी लोकांच्या अर्जाचा अनुकूळ विचार होऊन त्यास विजय प्राप्त झाल्याबद्दल साभिमान आनंद वाटणें योग्य आहे.

## युद्धाची खबर.

सध्या लढाई ऐन रंगांत आहे. आरासचे उत्तरेस एका जागीं दोन हजार जर्मन शिपायांचीं प्रेतें आढळलीं यावरून तेथें किती भयंकर लढाई झाली असली पाहिजे, याची कल्पना करतां येईल. ग्यालीशियामध्येंतर याच्यापेक्षां अधिक भयंकर जर्मन हानि झाली आहे. तेथें गेल्या महिन्यांत सुमारें दीड लाख जर्मन फौज गारद झाल्याचें ऐकून जर्मन लोकांना असह्य धक्का बसला आहे व ते आतां निरनिराळ्या लबांतून तद्विषयींच्या वाटाघाटी उघडपणें करूं लागले आहेत असें एका इंग्रजीपत्राच्या बातमीदारानें प्रसिद्ध केलें आहे. आतां कांहीं कांहीं वेळां तरी आपण हार गेलों असें जर्मन लोक कबूल करूं लागले आहेत. नीस्टर नदीच्या तीरावर जर्मनीची इतकी हानि झाली कीं कांहीं विचारूं नये. रशियानें जर्मनांस तेथून हाकून लाविलें, तेव्हां जर्मनांना पळतां पळतां भुई थोडी झाली. त्यांच्या १७ तोफा, व ४९ किकफायरर रशियाच्या हातीं लागल्या. इतकेंच नाहीं तर १८८ आफिसर व ६९०० आस्ट्रियन व जर्मन शिपाई कैद केले.

## युद्धाचा हिंदुस्थानावर परिणाम.

या युद्धाचा हिंदुस्थानच्या महागाईवर काय परिणाम झाला आहे तो पुढील आंकड्यांवरून दिसून येत आहे. साखर जवळ जवळ दुप्पट महाग झाली. मीठ पावणेदोन पटीनें महाग झालें. धान्य शेंकडा ७ पासून १२ या मानानें महाग झालें. कापूस, रेशीम, जूट व कातडीं यांचे [illegible] अनुक्रमें २१,१९,४९ व ३ रुपये [illegible] या मानानें उतरले. स्टेशनरीचा [illegible] कागद शेकडा ३० [illegible] ईसः— ४०, रबर शेकडा [illegible] गणपतराव झाले व कांहीं जिनस मुळींच [illegible]. झाले आहेत.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** गेल्या सप्तकांत मेघांनीं अनेक वेळां अवडंबर माजवून अखेर कालच्या रविवारीं प्रातःकाळीं गर्गाचार्यांच्या मुहुर्तावर ज्याकडे कृषिवर्गाची चातकाप्रमाणें दृष्टि लागली होती व ज्या करितां शेतें उन्हानें तप्त होऊन आ करून बसलीं होतीं तें वृष्टिसिंचन केलें आणि हवेंत मत्रासपणा आणिला. शहरांत रोगराई विशेष नाहीं.

चौकस स्नेही कळवितात कीं बाघोली येथील नाक्याचा मक्तेवाला महार नक्याचा कर वाटेल तसा वसूल करितो, पावती देत नाहीं व भरतीची गाडी ठरविण्यापूर्वी सामान सुमानाची विचका विचकी फार करितो. तेव्हां कराच्या दरठरोतीचा छापील तक्ता नियमा प्रमाणे नाक्यावर टांगण्यांत यावा व लोकांचा त्रास कमी करण्याविषयीं सक्तीचा हुकूम सोडण्यांत यावा अशी नामी योग्य सूचना त्यांनीं केली आहे.

**जाजम झटकणें!ः—** मयत देवीराम कोंडजी नाझर यांच्या वेळच्या पैशाच्या उलाढाली संबंधानें स्पेशल ड्यूटीवर आलेले पंडित प्रेमनारायण, डिस्ट्रिक्ट जज, यांनीं येथील दिवाणी बजूचे जाजम झटकण्यास सुरवात केली आहे. यांत किती जणांच्या अंगावर धुराळा उडतो तें पहावें!

नाट्यकला प्रवर्तक मंडळीचे निवडक नाटक प्रयोग येथें चालू आहेत. परवां रात्रीं संत सखुबाईचा प्रयोग झाला. नाटकाला रंग येण्याला पुष्कळ जम अद्याप बसावयाचा आहे.

## चीन आणि जपान

या दोन देशांमधला वाद तूर्त मिटला आहे, पण जपाननें केलेल्या वर्तणुकीचें चीनच्या लोकांना विस्मरण होणें कठीण दिसते. चिनी लोक जपानी लोकांशी अधिक द्वेषानें व तुटून वागूं पाहत आहेत. जापानी मालावर शांघाय व यांगसी येथील लोकांनी मुकाट्यानें बहिष्कार घातला आहे. बहिष्काराची चळवळ व्यक्त स्वरूपांत नसलीतरी ती चिनी माणसांच्या अंतर्यामीं खास आहे. चिनी सैन्याच्या सुधारणेसाठीं एक राष्ट्रद्वार भांडार, हीं स्थापन झाला आहे; आणि हा सगळा प्रकार इतका मुकाट्यानें चालला आहे कीं जपानी सरकारला त्याबद्दल चिनी सरकारला कांहीं एक विचारतां येत नाहीं. कारण, जाहीर रीतीनें जपानच्या विरुद्ध असें कांहीं बोलण्यांत किंवा करण्यांत येत नाहीं. या एकंदर प्रकारावरून चिनीराष्ट्राच्या पोटांत खळबळ चालली आहे. ज्वालामुखीच्या अंतर्यामीं स्फोटाची तयारी चालली आहे, पण हा स्फोट केव्हां होईल तें मात्र सांगतां येत नाही, असा प्रकार चाललेला दिसतो.

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. परशराम वा॥ आसराजी २ हरी वा॥ आसराजी जात माळी रा. कान्हेरी पो. ता. बाळापूर जि० आकोला. यांस:—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची मुलगी नामे शेवंती ही माझी लग्नाची बायको आहे. मी माझे घर गांव पळशी येथें रहात होतों. तेथें तुह्मी येऊन मला घेऊन आला त्यास आज सरासरी दोन तीन महिने झाले. तेथे तुह्मी कबूल केले कीं, मी तुझा घर देतो अन्न खर्च सर्व देतो असें कबूल करून तुह्मी मात्र आपले घरीं आणलें. व येथें आल्यावर तुह्मी माझे बायकोला पाठवित नाहीं. तिला काहीं एक मी त्रास न देतां तुह्मी मला विनाकारण फारकती मागता तरी मी फारकती कोणतेच तऱ्हेनें देणार नाहीं मी वागविण्यास तयार आहे. मी नेण्याकरितां एक दोन वेळ आलो असतां आपण माझेशीं विनाकारण तंटा करूं पाहतां करितां मला तुमचे येथें येण्याची भिती वाटते. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आणून घालावें. तसें न केल्यास तुमचेवर कायद्याप्रमाणें तजविज केली जाईल मग त्यास लागेल तो खर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. ता. १०।६।१९ इ.

सही

मारुती वा। पामाजी शकोकार माळी रा० कान्हेरी पो० ता० बाळापूर जि० आंगठा

नो. नं. २९०

---

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
आयोडाइज्ड.

# सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥— उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक—** डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २


नो. नं. २३

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंफरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेऊन वापरा. मोठी शि रु. १॥ लहान शि. १२आणे

वी. एच. जव्हेरियन कंपनी,
खलासीचकला, मुंबई.

नो नं २०

---

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी,

ठि:—पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदार भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी! एकच भाव!!

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आयुर्वर्धक कार्डस, चिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्वा, सरबतें व मुरंबे, पक्क्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

---

# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDS 4 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 36 38,694 |
| 189 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1893 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | ,07 014 | 2,10,15,947 |
| 1900 | 535,55639 | 3,22,79,991 |
| 1913 | 99,4469 | 4,-1,61,889 |

## RECORD BONUS.

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

" At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy iholders with a absolute security and possessing all the important factors essentia n a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N. N. 25

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला---सोमवार तारीख २८ माहे जून सन १९१५ ई० [ अंक २५


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहि वाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### अस्सल अंगूरी.

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८


### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. कि रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

# चांदीचीं भांडीं.

## विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० १ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षीतील **वीस** प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु १ व्ही. पी. रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
**पत्ता—चेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं ७

### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १।। आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू - कानाचा विकार १ दिवसांत गुण १ दिवसांत फायदा होतो किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रातिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रूपया दिलबहार— सुपारी- १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.
नो० नं० ९

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें** } मॅनेजर

### नोटीस

नोटीस बेशमी जनाबाई भ्रतार मारोती जात दैवज्ञ पांचाळ सोनार मुक्काम आकोला ठिकाणा नबाबपुरा

ईसः—

नोटीस देणार दामोधर गणपतराव दैवज्ञ पंचाळ सोनार मुक्काम उमरावती नोटीस देण्यात येते कीं तुमची मुलगी नामे कोंडी ही आमचे धाकटे बंधु केशव यांस दिली असून साक्षगंध ह्मणजे पंचा समक्ष साखरपुडा होऊन आज सरासरी तीन वर्षे पुरीं होऊन चवथें वर्ष सुरु आहे. त्यांत आह्मी गतवर्षीं माघमासीं लग्न तिथीचा निश्चय करण्याकरितां आलो होतों त्यावेळेस आपण सांगितलें कीं वैशाखमासी जरूर लग्न करूं. तुह्मी आपले सामान करण्याचे काम सुरू ठेवावें. त्याप्रमाणें आह्मी सामान तयार करून पुन्हा सुरु वैशाखांत तिथी निश्चय करण्याकरितां आलो. त्यावेळीं सांगितलें कीं माझे कडून पैशाचे तंगीमुळें होत नाहीं ह्मणून सबब दाखविली. पुन्हा यंदा तीन वेळा आलो तरी आपण आज तारखेपावेतों भरंवसा देऊन सामान वगैरे तयार करून अखेर तिथीपर्यंत चाळवीत आगले असून आतां हल्लीं जेष्ट शुद्ध तृतीयेस सांगितलें कीं आह्मी तुह्मांस मुलगी देत नाहीं. असा जबाब दिला. त्यावरून आह्मी तुह्मास नोटिशीनें कळवितो कीं आमचा लागलेला खर्च येणें प्र० साखरपुड्यास लागलेले रुपये ५० पन्नास पाहिले गतवर्षाचे सामान करून वाया गेले त्याबद्दल नुकसान आले रुपये १०० शंभर व हल्लींच्या सालांत येण्याजाण्यात लागलेला खर्च रुपये २५ पंचवीस एकूण रुपये पावणे दोनशे खर्च झाले. ते नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत आणून द्यावे न दिल्यास आह्मी आपणावर दिवाणी दावा घालून कायद्या प्रमाणें पैसे घेऊं व मुली बद्दलचा हक्क सोडणार नाहीं. व आपण ही मुलगी काय कारणानें देत नाहीं. या

बद्दल जबाब मिळावा. ही नोटीस दिली कळावें ता० २२।६।१९ इ.

सही
दामु गणपतराव दैवज्ञ पंचाळ
सोनार राहणार उमरावती
नो. नं. २९२ द० खु०

## नोटीस

केशवराव जानराव देशमुख दस्तकी प्रगणे बाळापूर तो. खामगांव जि० बुलढाणा.

| मौजे | गांवचें नांव | ता. | जि. |
|---|---|---|---|
| ,, | आत्रंज | खामगांव | बुलढाणा. |
| ,, | लोखंड | ,, | ,, |
| ,, | आटाळी | ,, | ,, |
| ,, | रोहण | ,, | ,, |
| ,, | जवळ | ,, | ,, |
| ,, | जळंब | ,, | ,, |
| ,, | जानोरी | ,, | ,, |
| ,, | आडमूक | ,, | ,, |
| ,, | मोरगांव | ,, | ,, |
| मौजे | गांवाचें नांव | ता. | जि. |
| ,, | कंझार | खामगांव | बुलढाणा. |
| ,, | घारुड | ,, | ,, |
| ,, | नांयदेवी | ,, | ,, |
| ,, | हिवरखेड | ,, | ,, |
| ,, | माटरगांव | ,, | ,, |
| ,, | सेगांव | ,, | ,, |
| ,, | हिंगणे | ,, | ,, |
| | एकफळ | ,, | ,, |

गांचे देशमुखी रुसूमांत संबंध असहकदार लोकांस कळविण्यांत की आपले प्रगण्याकरितां ह्या पासून दस्तकीचे जागीं माझी नेमणूक झाली आहे. पूर्वीचा दस्तकी रा० त्र्यंबकराव यांचेकडून प्रत्येक गांवचे रुसूमांत कोणकोणाचे हक्क संबंध कसे आहेत याबद्दल कांहींएक कागदपत्र मला मिळाले नाहींत ह्यामुळें कोणकोणाचे कसे हक्क आहेत याची मजला पुर्ण माहिती नाहीं. हल्लीं देशमुखी ख्वाजम्याचा पैसा सरकारांतून मिळाला आहे. तरी प्रत्येक हकदारानें आप आपले गांवाचे रुसूमांत किती आण्याचे हक्क आहेत हे पंधरा दिवसाचे आंत लेखी कळविण्याची कृपा करावी तसें न झाल्यास व पैसा दुसरे हकदारानें नेल्यास जोखीम ज्याची त्यांस सोसावी लागेल कळावे.

सही.
केशवराव जानराव देशमुख.
नो० नं० २९३

## नोटीस

नोटीस बेशमी महादु वा॥ टुकड पाढोर रा० माना ता० मुर्तिजापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं, मौजे लंगापूर ता० मुर्तिजापूर येथील सर्व्हे नंबर ७ व मौजे सिकंदरपूर ता० मुर्तिजापूर येथील सर्व्हे नं. ४ हे दोन्ही नंबर आम्ही बळीरामचा वारस याजपासून सन १९१४ सालचे फेब्रुवारी महिन्यांत खरेदी घेतले. त्या सालापासून आम्ही पूर्ण मालक झालों. तीं शेतें पत्र्यानें बळीराम पासून तुम्ही दरसाल रुपये २७९ प्रमाणें वेले ह्मणून सांगितले. खरेदीखतावरून सन १९१४ ते सन १९१६ सालचे रुपये २७९ स्वामित्वाचे आमचा घेण्याचा हक्क झाला. व तुह्मास हीं रुपये मागितले व खरेदीखत हीं दाखविले नंतर रुपये देतो ह्मणून तुम्ही कबूल केंले ते रुपये तुह्मास पुष्कळवेळां मागितले. परंतु देतो देतो ह्मणून चाळवण्या लावल्या. करितां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, नोटीस पावतांच व्याजा साहित रुपये आणून द्यावेत. न दिल्यास कोर्टांत फिर्याद करून हुकुमनामा मिळवूं. हें पक्कें समजावें. कळावें. ता० इसवी द० तुकाराम भगवंत,

सही
किसन हंबिरजी द० खु०
नो० नं० २९४

## नोटीस

रा० रा० माहदसा आनासा टीकाईत लाड व धनासा बाबूसा लाड राहणार देऊळगांव माकरशा तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं गेल्या महिन्याचे २० तारखेस तुह्मी मालेगांवाहून तामसीस धनासाचे लग्ना करितां जात असतां मजजवळून २०० दोनशे रुपये घेऊन गेलां. लग्नांत काम पडल्यास खर्चू नाहींतर वापस जातानां रुपये परत देऊं असे सांगितले पण त्याप्रमाणें जातानां रुपये दीले नाहींत. व गांवीं जातांच पाठवितो ह्मणून कळविल्याप्रमाणें पाठविलेही नाहींत. पत्रें पाठविलीं पण त्यांचा जबाब सुद्धां देत नाहीं यावरून तुमचे मनांतील हेतु चांगला दिसत नाहीं करितां नोटीस देणें भाग पडले तरी ही पावतांच रुपये मनी आर्डरीनें पाठवावे नाहींतर रीतीप्रमाणें दावा करून खर्चासुद्धां रक्कम घेतली जाईल. कळावे तारीख १८ जून १९१९ ई०

सही.
कुंडलसा देवमणसा लाड रहाणार
मालेगांव जहागीर (ता. वाशीम)
नो० नं० २९५

## नोटीस

नोटीस बेशमी नामदेव वल्लद साधू चांभार रा० आरवी ता० जामखेड पो० जामखेड जि० अहमदनगर

यांसः—

खालीं निशानी करणार नोटीस देते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्नास सुमारें १२ वर्षे झालीं. ३ वर्षे मी तुमच्या घरीं राहिले. लग्न झाल्यावर अज्ञानावस्थेत माझी ९ वर्षे गेलीं. पुढें सज्ञान झाल्यावर तुह्मी संसारास अयोग्य आहांत अशी माझी खात्री असल्यामुळे मी माझे भावाचे घरीं तुमचा नांदविण्याचा विचार न दिसल्यामुळें रहाण्यास आले. या गोष्टीला ४ वर्षे झालीं. पंचा समक्ष तुमचे कडे मी आले असतां तुह्मी मला वागविण्याचे नाकारले येथें मी चार वर्षे लोकांचे कर्ज काढून उदरनिर्वाह करित आहे. तें कर्ज दरसाल ५० रु० प्रमाणे दोनशावर गेलें आहे. आतां मला पुढें कर्ज मिळूं शकत नाहीं. व तुह्मी फारकती देत नाहीं करितां तुह्मास कळविते कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत दोनशे रुपये सावकाराचे देऊन मला घेऊन जावे. नाहींपेक्षां हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. कळावे ता० २०-६-१९१९ ई०

सहीची निशानी आंगठा लक्ष्मी
मर्द नामदेव चांभार राहणार
बार्शीटाकळी हिचा खुद.
नो० नं० २९६

## नोटीस

बजरंगलाल दत्तूतराम आगरवाले रा० पारस व मोतीलाल बनसीलाल आगरवाले रा० गायगांव ता० बाळापूर.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मा उभयतांस कुलमुखत्यारपत्र माझे दुकानसंबंधीं कामाबद्दल फीर्याद वगैरे करण्यास दिलें असून आतां माझा व्यापार चालत नाहीं सबब फिर्यादी वगैरे करण्याचे काम नाहीं याजकरितां मीं आज तारखेपासून तुमचे दोघांचे नांवानें जें मुखत्यारपत्र दिलें आहे तें रद्द केले आहे. आतां जर तुह्मीं माझे तर्फेनें कोणांस मजेनांवची सही करून कागद पत्र करून दिल्यास त्याजवर आपण सही केल्यास त्याची जोखीम तुमचेवर राहील. मी तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. याजकरितां उभयतांस नोटीस दिली असून जगजाहिर होण्यास्तव छापखान्यांतून नोटीस दिली आहे व आज तारखेपासून कुलमुखत्यारपत्र रद्द केले आहे. तारीख २१।६।१९

सही.
गोदावरीबाई जवजे कनयालाल
दस्तुर खुद.
नो० नं० २९७

## नोटीस

१ तुळशीराम वा॥ ह्मताजी पांच पवार रा० कोणी गवळी ता० मेहकर जि० बुलडाणें व २ खंडुजी वा॥ दानाजी नवघरे रा० मौजे नेतन्स ता० वाशीम जि० आकोला

यांसी:—

राजाई मर्द भवानी शेवाळे रा० मौजे आंधवड प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणे नोटिस देते कीं, मी तुह्मास ता० ..८।६।१२ रोजीं कुलमुखत्यारपत्र राजिष्टर करून दिलें आहे. आज पावेतों तुम्ही माझे कांहीं काम केलें नाहीं. करितां तुमचे मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केले आहे. माझे तर्फे तुह्मी कोणतेही काम करु नये केल्यास मी जबाबदार नाहीं कळावें. ता. १९।६।१९

सही.
नि० राजाई मर्द भवानी ईची.
नो० नं० २९८

## वर्गणीदारांस आगत्याची सूचना.

वर्गणीदारांकडे वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पी. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाची तंगी असणें स्वाभाविक आहे हें आह्मीं जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आह्मा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा अव्हेर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.

म्यानेजर.

वऱ्हाडसमाचार

मित्ती जेष्ठ वा॥ १ शके १८३७

## टिळकांचें गीतारहस्य.

गेल्या अंकांत रा० टिळक यांच्या गीतारहस्य ग्रंथाचें बाहिरंग कसें आहे या विषयींचें विवेचन केलें. हें करतांना एक मोठी उणीव सांगावयाची राहिली. ती प्रथम सांगून नंतर आमच्या वाचकांचा त्या ग्रंथाच्या अंतरंगाशीं परिचय करून देऊं.

जगांतल्या कोणत्या देशांत प्रथम ग्रंथ रचना झाली हें सांगणें कठीण आहे. कोणी ह्मणतात कीं चीनमध्यें पहिला ग्रंथकार झाला. कोणी ह्मणतात कीं तो आर्य होता. ज्यानें ऋषींच्या मुखांतून तत्कालिक स्फूर्तीनें निघालेल्या ऋचांचा संग्रह ऋग्वेदाच्या रूपानें केला तो भारतवर्षांतला प्रथम ग्रंथकार ह्मणण्यास हरकत नाहीं. पण यावेळची ग्रंथरचना मुखोत्पन्न असे. लिहिण्याची कला ठाऊक झाल्यानंतर तिचा उपयोग करून ग्रंथाला मूर्तस्वरूप देणार पहिला ग्रंथकार कोण याचें स्मरण इतिहासाला राहिलेलें दिसत नाहीं. कोणी ही असला तरी येवढी गोष्ट खरी कीं त्यानें ग्रंथांत प्रतिपादलेल्या विषयांची अध्यायवार अनुक्रमणिका देण्याचा परिपाठ जसा घालून दिला व जो परिपाठ रामायण, महाभारतासारख्या ग्रंथापासून तों अगदीं अलीकडच्या ह्मणजे नृसिंह सरस्वतीच्या काळापर्यंत अविच्छिन्न पाळला जात आहे, तसा पाठ अक्षरांच्या अनुक्रमानें विषयांची सूची देण्यासंबंधानें घालून दिला नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. हा पाठ वाचकांच्या फार सोयीचा आहे, व तो घालून देण्याचें श्रेय इंग्रज लेखकांकडेसच जातें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि आह्मी हिंदी गृहस्थ कितीही सुशिक्षित व परकीयांचें अनुकरण करण्यांत प्रवीण झालों असलों तरी चांगल्या कामांत दुसऱ्याचें अनुकरण करण्यांत मात्र मागें

आहों. या बाबतींतली आमची पुराणानुकरण प्रवृत्ति आह्मांला अद्याप सोडीत नाहीं. साधारण महत्त्वाचें कोणतेंही इंग्रजी पुस्तक घ्या त्याच्या शेवटीं अक्षरांच्या अनुक्रमानें विषयसूचि ही असावयाची. मोठाल्या महत्त्वाच्या विषयावरील ग्रंथाला ती नसणें हें सवाष्ण स्त्रीच्या कंपाळी कुंकुमतिलक नसणें या हिंदुसमाजांतल्या अशुभ समजुती सारखीच सूची वाचून ग्रंथ छापणें ही कल्पना इंग्रज प्रकाशकांना व वाचकांना अशुभ वाटते. पण आमच्या इकडे पहा रा० टिळकांच्या गीतारहस्यायेवढ्या ९०० पृष्ठाच्या ग्रंथाला ही सूचीचा विटाळ न होऊं देण्याची विशेष खबरदारी घेतलेली दिसते! मराठी भाषेंत ज्योतिषाचा इतिहास, अनेक वैद्यक ग्रंथ, सरदेसायांचे व राजवाडे, खरे, पारसनीस यांचे ऐतिहासिक ग्रंथ, आपटे यांचें बौद्धपर्व वगैरे चिरकालीन महत्त्वाचे ग्रंथ घ्या, पण यांतल्या एकालाही अक्षराच्या अनुक्रमानें तयार केलेली विषयसूचि जोडलेली आढळणार नाहीं. अशा सूचीचा उपयोग वाचकांना विशेषतः त्याविषयावर लिहिणारांना किती होतो याची कल्पना ग्रंथकारांना नसते असें नाहीं. ते स्वतः ग्रंथ लिहीत असतां त्यांनीं इंग्रजी ग्रंथांच्या सूचीचाच पुष्कळवेळां उत्तम उपयोग करून घेतलेला असतो. परंतु त्यांच्या स्वतःच्या ग्रंथाला मात्र सूचिपत्र जोडण्याचे वेळीं त्यांना या गोष्टीचें स्मरण राहत नाहीं. रा. टिळक यांच्या ग्रंथाला अशी सूचि अवश्य पाहिजे होती. समजा, रा. टिळकांनीं कोणकोणत्या बाबतींत स्पेन्सर, ग्रीन प्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या मतांची आपल्या पौर्वात्य तत्त्वज्ञानमताशीं तुलना करून मतैक्य किंवा मतभेद दाखविला आहे हें एखाद्यास पाहावयाचें झालें तर रा. टिळकांचा हा मोठा ग्रंथ समग्र उलथापालथा करण्यांत आठ दिवस घालवावे तेव्हां त्याला पाहिजे ती माहिती मिळणार. तों पर्यंत त्यानें आपली लेखणी कानावर ठेविली पाहिजे! सारांश काय कीं येवढ्या मोठ्या व महत्त्वाच्या ग्रंथाला सूचि नसणें ह्मणजे सर्व सौंदर्य व सौभाग्य यांनीं संपन्न असलेल्या स्त्रीच्या मुद्रेंत नासिकेचा अभाव असण्याइतकें उद्वेगजनक आहे. ही उणीव लवकरच निघणाऱ्या दुसऱ्या आवृत्तींत तरी रा. टिळक भरून काढतील अशी आह्मी आशा करतों. इतकें सांगून आतां सदर ग्रंथाच्या अंतरंगपरिचयाकडे वळूं या ग्रंथाचा मुख्य प्रतिपाद्य विषय ह्मणजे गीतेचें प्रवृत्तिपर रहस्य आहे, निवृत्तिपर नाहीं, हें सिद्ध करणें व हें प्रवृत्तिपर रहस्य कोणतें तें सांगणें हा अर्थ. या बाबतींत रा. टिळक यांचा व मीमांसक, नैय्यायिक, वेदांती, द्वैती, अद्वैती, विशिष्टाद्वैती वगैरे सर्व प्रकारच्या गीतेवरील टिकाकारांचा टिळकाशीं मतभेद आहे; या टिकाकारांच्या एकतर्फी निवृत्तिपर टीकेवरूनच हिंदुधर्मशास्त्रग्रंथांत प्रवृत्तिपर नीतिग्रंथ नाहींत अशी पाश्चात्यांची गैरसमजूत झालेली आहे, पण तीही चुकीची आहे. केवळ कर्तव्य ह्मणून परमेश्वरार्पणबुद्धीनें सर्व सांसारिक कर्तव्यें करीत राहून तद्द्वारा परमेश्वराची तुष्टि करतां येते हा जो ज्ञानयुक्त प्रवृत्ति मार्ग किंवा कर्मयोग तो आमरणांत चालू ठेवण्याविषयींचा उपदेश हा गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे हें सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न रा. टिळक यांनीं केला आहे, व तो करीत असतांना पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानांवर इतका प्रकाश त्यांनीं पाडला आहे कीं रा. टिळकांचा हा ग्रंथ ह्मणजे पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचें दर्पण ह्मणून मानलें तरी हरकत नाहीं. वस्तुतः गीता ही केवळ प्रवृत्तिपर कर्ममार्ग दाखविणारी आहे हें रा० टिळकांचें मत कांहीं नवीन नाहीं. टिळकांच्या अगोदर होऊन गेलेले व पाश्चात्य शिक्षणाच्या संस्कारानें नवीन दिव्य दृष्टि पावलेले रा० रानडे, भांडारकर, मोडक, प्रभृति विद्वानांनीं टिळकांच्या अगोदर अनेक वर्षें आपापल्या भाषणांतून या वादाचा उपन्यास करून ठेविलेला आहे. त्यांच्याच मताचा अनुवाद रा० टिळक यांच्या ग्रंथांत आहे. पण मतांत नाविन्य नसलें तरी त्या मताच्या सिद्धयर्थ जुळविलेल्या साहित्याच्या व्यवस्थितींत आणि प्रतिपादनांत खरोखर नवीनपणा आहे हें कोणाला ही कबूल करणें भाग आहे. श्रीशंकराचार्या सारख्या भाष्यकारांनीं गीताग्रंथावर आध्यात्मिक विवेचनाचें पांघरूण घालून गीताप्रतिपाद्य मुख्य तत्त्वास लोकांच्या दृष्टीआमून झाकून टाकिलें होतें. या पांघरुणाचा एक कोपरा वर उचलून आंत लुकलुकणाऱ्या तेजाची प्रभा किंचिदंशानें रानडे प्रभृति व्याख्यात्यांनीं बाहेर पाडण्याचें श्रेय घेतलें. पण हें आच्छादन काढून दूर फेकण्याची व गीताग्रंथाचें मूळ शुद्ध स्वरूप जगाच्या निदर्शनास आणण्याची महत्त्वाची कामगिरी टिळकांनींच केली यांत शंका नाहीं. तथापि आपल्या मताचे पूर्वगामी पुढारी ह्मणून रानडे भांडारकर प्रभृति पुरुषांचा नामनिर्देश रा० टिळकांनीं करावयास पाहिजे होता तो केला नाहीं या बद्दल त्यांना जो दोष देण्यांत येत आहे तो अगदीं गैरवाजवी आहे असें कोणास ह्मणतां येणार नाहीं. रा० टिळकांच्या मनांत रानडे प्रभृति मंडळी विषयीं राजकीय मतभेदामुळें आढी असेल, आणि ती या दोषाच्या मुळाशीं असेल ही गोष्ट संभवनीय आहे. पण ज्यांनीं गीतेसारख्या मनावर पवित्र संस्कार करणाऱ्या ग्रंथोदधींत आज पंचवीस तीस वर्षें यथेच्छ निमज्जन केलें, ते इतकें निमज्जन करून ही कोरडेचे कोरडे विचाराची अनुदारता पोटाशीं धरून बाहेर आले असें गृहीत धरण्यापेक्षां या गृहस्थांचा नामनिर्देश न करण्याचा दोष रा० टिळकांच्या विस्मृतीकडे लावणें हें टीकाकारांच्या मनौदार्यास शोभलें असतें इतकें सांगून व रा० टिळकांच्या मुख्य प्रतिपाद्य मताशीं आमचें पूर्ण ऐक्य असलें तरी कांहीं अवांतर बाबतींत थोडासा मतभेद आहे व हा मतभेद पुढील लेखांत आह्मी दाखविणार आहों येवढें आश्वासन देऊन हा द्वितीय लेखांक पुरा करतों.

## विचित्र योगायोग !

गेल्या १८ जूनला जगाच्या इतिहासांत सुप्रसिद्ध अशी वाटर्लूची लढाई होऊन बरोबर १०० वर्षें झालीं. त्यावेळीं प्रसिद्ध वीर नेपोलियन याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेनें युरोपांतल्या सर्व राष्ट्रांना आपल्या जीविताची जबरदस्त शंका उत्पन्न केली होती. यामुळें एकटा फ्रान्स एकीकडे आणि इंग्लंड, जर्मनी वगैरे राष्ट्रें दुसरीकडे असे दोन पक्ष झाले होते. वाटर्लू हें शहर बेलज्यममध्यें आहे. अर्थांत नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेला कायमची समाधी मिळाली ती बेलज्यममध्यें या गोष्टीला बरोबर १०० वर्षांनीं पुनः तींच राष्ट्रें त्याच ठिकाणीं त्याच कारणास्तव युद्धासाठीं जमावीं हा योगायोग खरोखर विचित्र ह्मटला पाहिजे. मागच्या युद्धांत व सध्याच्या युद्धांत एकच मोठा फरक आहे, आणि तो हा कीं त्यावेळचे मित्र ते आतांचे शत्रु व त्यावेळचे शत्रु ते आतांचे मित्र आहेत. त्यावेळीं इंग्लंड, व जर्मनी हे फ्रान्साविरुद्ध होते; आतां इंग्लंड व फ्रान्स जर्मनीचे विरुद्ध आहेत. नेपोलियनचे काम जर्मनीचे केसर करीत आहेत. मात्र नेपोलियनच्या अंगच्या सद्गुणांचा मात्र केसरच्या अंगीं अभाव आहे. त्यावेळची लढाई ही खरी वीरत्वाची होती; आतांची लढाई जर्मनीच्या पक्षानें केवळ अमानुषता क्रौर्य, शास्त्रीय ज्ञानाचा दुरुपयोग आणि राजनीतीला कलंक लावणारीं कृत्यें यांच्या साधनानें चालली आहे. वाटर्लूची लढाई एकट्या नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेचें फळ ह्मणून झाली. हल्लींचें युद्ध हें सामान्यतः जर्मन राष्ट्रास असंमत असतांही केवळ केसरच्या समाधानार्थ चाललें आहे. ईश्वरी सूत्र केव्हांही झालें तरी सारखेंच फिरावयाचें. राक्षसीमहत्त्वाकांक्षेचा आणि अमानुष कृत्यांचा परिणाम राक्षसी व अमानुष रीतीनेंच व्हावयाचा. तेव्हां हा ईश्वरी सूत्राचा नियम प्रस्तुतच्या युद्धाला लावल्यास त्याचा परिणाम कसा होईल तो सांगण्यास फलज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाची अवश्यकता नाहीं. त्यावेळीं जसा नेपोलियनचा अधःपात झाला, तसा प्रस्तुतकाळीं केसरचा होणार, हें खास. मग तो यंदाचे वर्षीं युद्धाचा शेवट होऊन होवो, किंवा आणखी कित्येक वर्षें असेंच युद्ध सुरू राहून होवो.

## मि. अबदुल करीम जमाल.

यंदा बादशहाच्या जन्मोत्सवप्रसंगीं ज्यांना पदव्या किंवा किताब देण्यांत आले, त्यांत रंगून येथील नवकोट नारायण मि. अबदुल करीम जमाल यांच्या वाट्याला सी. आय. इ. ही पदवी आली आहे. या गृहस्थाचें चरित्र व सांपत्तिक स्थिति कोणाही हिंदी गृहस्थाला स्पृहणीय वाटण्यासारखी आहे. हे मोठे कर्तृत्ववान् पुरुष आहेत. हे मूळचे काठेवाडांत जामनगर येथील राहणारे असून व्यापाराचे निमित्तानें ब्रह्मदेशांत जाऊन राहिले. तेथें त्यांनीं कापूस, धान्य, व तेल यांचा व्यापार करून दरसाल लाखो रुपये निवळ नफा राहील इतका उत्कर्ष संपादला. मग ब्रह्मदेशांतल्या तांबे व सोनें यांच्या खाणी चालविण्याचे काम हातीं घेऊन त्यांत ही अगणित संपत्ति व उत्तम यश संपादलें. पुढें प्रस्तुत युद्ध सुरू झाल्यानंतर जर्मन कारखानदारांना इंग्रज सरकारानें अडकावून टाकिलें. तेव्हां ते कारखाने मि. अबदुल यांनीं हातीं घेऊन चालविले. यांच्या स्वतःच्या मालकीच्या कित्येक बोटी ही आहेत. पैसे कमावण्याची विद्या जशी यांना उत्तम येत आहे, तसा संपत्तीचा योग्य सदुपयोग करण्याचें ज्ञान व इच्छा हीं ही त्यांचे ठायीं आहेत. यांच्या दातृत्वावर कित्येक उत्तम संस्था आज चालल्या आहेत. सरकारचा ही त्यांचेवर विश्वास आहे. अशांचा सन्मान केवळ सी. आय. इ. पदवीनेंच होण्यासारखा खरोखर नाहीं. तथापि भावी सन्मानाची ही केवळ पर्[illegible] मात्र आहे असें समजावयाचें आहे; ‘ नर करनी करे तो नरका नारायण हो जाय ’ हें वाक्य यांना अक्षरशः लागू पडतें.

## म्याट्रिक्युलेशन परीक्षेचे रिझल्ट.

गेल्या दोन वर्षांतलें निरनिराळ्या युनिव्हर्सिट्यांच्या म्याट्रिक परिक्षेचे रिझल्ट दहा वर्षांच्या मागच्या त्याच परीक्षेच्या रिझल्टांशीं जर कोणी ताडून पाहील तर हॅम्लेट नाटकांतल्या डेन्मार्कच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं तरी घोटाळा खास आहे या उद्गारासारखे उद्गार युनिव्हर्सिट्यांच्या कारभाराविषयीं काढावे लागतील. यंदाचा मुंबई युनिव्हर्सिटीचा रिझल्ट शेकडा ३० सुद्धां झाला नाहीं. पांचसात वर्षां मागें हें प्रमाण शें. ५० च्या जवळ जवळ होतें. यंदाच्या अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या म्याट्रिक परीक्षेचा प्रकार ही तसाच आहे. म्याट्रिक परीक्षेला जाणाऱ्या उमेदवारांची संख्या उड्या मारीत चालली आहे. हे विद्यार्थी पास होण्यासारखे ह्मणून हेडमास्तरांच्या शिफारसीनें परीक्षेस बसले असतात. मग रिझल्टच्या वेळीं त्यांचा अदमास इतका कां चुकावा? सगळ्याच शाळांचे हेडमास्तर अलीकडे अनुभवशून्य पाहून नेमण्यांत येतात काय? कां युनिव्हर्सिटीचे परीक्षकांना उमेदवारांकडून भलत्याच ज्ञानाची अपेक्षा करण्याबद्दल सूचना जाऊं लागल्या आहेत? अथवा कॉलेजांत विद्यार्थ्यांची गर्दी होऊन रिकामटेकडे आणि असंतुष्ट बी. ए. चे पीक वाढूं नये ह्मणून खबरदारी घेण्यांत येत आहे? तसें असेल तर येवढी खबरदारी घेण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. कारण बी. ए. पास झालेल्यास सरकारानें नोकरी दिलीच पाहिजे असा निर्बंध सरकारानें स्वतःस घातलेला नाहीं. मग असा प्रकार कां होतो? हा प्रश्न मुलांच्या पालकांनीं विचार करण्यासारखा आहे. त्यांनीं चळवळ करून या प्रश्नाचा तपास करण्यासाठीं कमिशन नेमण्यास युनिव्हर्सिट्यांस लाविलें पाहिजे. प्रबळ लोकमत काय करूं शकणार नाहीं? या तत्त्वावर हिंदी लोकांचा अधिक विश्वास अवश्य पाहिजे.

## घरांतल्या घरांत विरोध!

हा तर आमच्या समाजसुधारकांच्या षष्ठीला पूजिला आहे असें दिसतें. समाज सुधारकांचे अग्रणी घेतले, तर त्यांच्यांत शेंकडा ८० अशीं उदाहरणें निघतील कीं त्याच्या कुटुंबांतल्या बायका व मुलें त्यांच्या सुधारणामताला अगदीं विरुद्ध! मुंबईचें ‘इंडियन सोशल रिफॉर्मर’ हें पत्र समाजसुधारकांचें मुखपत्र आहे. त्याचे संपादक मि० नटराजन् हे एकनिष्ठ सुधारणावादी आहेत. समाजांत सुधारणेचें

कार्य प्रसृत व्हावें ह्मणून त्यांचा अटोकाट यत्न चालूं आहे. जुन्या चालीरीतींवर त्यांचा जबरदस्त कटाक्ष असतो. पण त्यांच्या जुनाट्या निवर्तलेल्या पत्नी या जुन्या मताच्या होत्या असें 'सुबोधपत्रिका, सांगते! असा प्रकार कां असावा? ज्यांनीं लेखांच्या व भाषणांच्या द्वारें समाजसुधारणेचें महत्त्व इतरे जनांच्या मनावर बिंबविण्याचें कंकण हातीं बांधावें, त्यांच्यांत स्वतःच्या सहवासांत नेहमीं राहणाऱ्या पत्नीचें मन सुसंस्कृत करून सुधारणेचें महत्त्व त्या मनावर ठसविण्याचें सामर्थ्य कां नसावें? हें एका व्यक्तीचें उदाहरण झालें, पण हाच प्रश्न सामान्यतः एकंदर सगळ्या सुधारकाग्रणी संबंधानें विचारतां येईल. आमच्या मतें याला एकच उत्तर आहे, आणि तें हें कीं सुधारणेला प्रारंभ ते स्वतःपासून करून पुढें स्वतःचें कुटुंब, नंतर शेजारी पाजारी, गांव, प्रांत या क्रमानें न जातां ते एकदम 'परोपदेशे पांडित्यम्, करूं लागतात. अशा पांडित्याचा परिणाम समाजावर अनुकूळ कसा व्हावा? सुधारकांचीं मतें व त्यांचें आचरण यांच्यातला विरोध खुद्द त्यांच्या कुटुंबांतल्या माणसांना जितका लवकर दिसतो, तितका इतरांना दिसणें शक्य नाहीं; आणि हें कारण समाजसुधारणेच्या प्रगतलि आड येत आहे अशी आमची समजूत आहे.

## युद्धाच्या बातम्या.

गेल्या आठवड्यांतल्या युद्धाच्या बातम्या हर्ष व खेद यांचे मिश्र मनोविकार उत्पन्न करणाऱ्या आहेत. एंप्रेसकडे हल्लयाला नुकतीच सुरवात झाली आहे. ग्यालिपोलींत तुर्कांनीं विशेष जोर धरलेला दिसतो. ग्यालीशिआंत जर्मनीनें अचानक फौजेची कुमक आणून रशियाला मागें हटण्यास लाविलें, निसविओ जवळ निस्टर नदी ओलांडली व श्वेतसमुद्रांत सुरुंग लावून ठेवून उत्तरेकडून राशियाला दारूगोळा आणण्याचा मार्ग बंद करून टाकला. शिवाय लेंबर्ग घेण्याचा आपला निश्चय तडीस नेला. इंग्लंडवर पुनः विमानांची धाड पाठविली. या सगळ्या गोष्टी खेद उत्पन्न करणाऱ्या आहेत. पण त्या बरोबरच सुदैवानें आनंदोत्पादक अशा ही कित्येक गोष्टी घडल्या आहेत. ग्यालिपोलींत दोस्त राष्ट्रांनीं शत्रूच्या हातांत गेलेलीं कित्येक ठिकाणें परत घेतलीं. पश्चिम रणक्षेत्रांत आल्सेसमध्यें फ्रेंचांचें पाऊल जोरानें पुढें पडत आहे. ग्याशियांतल्या भयंकर लढाईत पिच्छेहाट घ्यावी लागली तरी राशियानें आपला धिमेपणा कायम ठेविला आहे. इतकेंच नाहीं, तर बरेच जर्मन लोक कैद केले आहेत. इटलीचें पाऊल पुढें पडत आहेच. सारांश, गेला आठवडा दोस्त राष्ट्रांना वाईट गेला, तरी एकंदर सद्यःस्थिती उमेदजनक आहे. या उमेदीला विशेष पुष्टि देणारी अशी एक बातमी खुद्द जर्मन सरकारकडून प्रसिद्ध झालेली आहे. ती अशी कीं सध्याच्या युद्धांत आतांपर्यंत नुसत्या प्रशियन फौजेची १४ लक्षांवर प्राणहानि झाली आहे. प्रशिया हा जर्मन राज्यांतला एक महत्त्वाचा भाग आहे. त्या एका भागांत जर येवढी प्राणहानि झाली तर एकंदर सैन्याची हानि वीस लक्षांवर खास झाली असली पाहिजे. आपल्या डोळ्यांदेखत आपल्या प्रजेतले इतके लोक आपल्या राक्षसीमहत्त्वाकांक्षेला बळी पडत असलेले पाहून ज्या केसरचें हृदय कळवळत नाहीं तो शुद्ध पाषाणहृदयी असला पाहिजे. केसरला जरी या प्राणहानीबद्दल कांहीं वाटलें नाहीं तरी ज्यांचे इष्टमित्र, पोरिंदे व आप्तजन धारातीर्थी निष्कारण पडले त्या जर्मन लोकांचीं मनें या गोष्टीनें पिळवटलीं असलीं पाहिजेत. आणि तसें प्रत्यक्ष घडतही आहे. येवढी हानि करणारें युद्ध आह्मांला नको, तहाची वाटाघाट सुरू करा असें ह्मणणारा पक्ष जर्मनींत बळावत चालला आहे. त्यांनीं जर्मनींतल्या शहरांतून सभा भरवून लोकमत जागृत करण्यास सुरुवातही केली आहे. ठळक जर्मनपत्रांची या गोष्टीला अनुकूलता ही पुसट पुसट बाहेर पडूं लागली आहे. अमेरिकेनें पाठविलेल्या खलित्यासंबंधानें लिहितांना या पत्रांनीं असे उद्गार काढले आहेत कीं अमेरिका इंग्लंडला दारूगोळा पुरवून जर्मनीची आगळिक करीत आहे ही गोष्ट खरी असली तरी अमेरिकेशीं शत्रुत्व करून शत्रूंच्या संख्येंत भर टाकण्याची जर्मनीला इच्छा नाहीं. ज्या जर्मनीनें 'न्यायाकरितां सगळ्या जगाशीं वैर करावें लागलें तरी तें करण्याचें समर कंकण बांधण्यास आह्मी तयार आहों' असे उद्गार एका वर्षापूर्वी काढले, त्यांनींच आतां असे नेभळेपणाचे उद्गार काढावे यांतलें इंगित स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. सध्याची जर्मनीची स्थितिच तशी आहे.

## अश्रूंचें रूपांतर.

सध्या महाराष्ट्र वाङ्मयांत वारंवार चमकत असलेले व परलोकवासी झालेल्या पत्नीच्या गुणांची स्मरणी घेऊन बसलेले सुप्रसिद्ध कवि प्रो० नारायण केशव बेहेरे यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें पुनः स्वतःस विवाहपाशांत बद्ध करून घेतल्याची बातमी 'सुधारकानें प्रसिद्ध केली आहे. प्रो. बेहेरे हे वयानें अगदीं तरुण असल्यामुळें त्यांच्या या द्वितीयसंबंधाबद्दल एरव्हीं त्यांना कोणीं नांवें ठेविलीं नसती. पण त्यांनीं आपल्या प्रथम पत्नीच्या निधनानंतर 'स्मरणीच्या' द्वारें जे अत्यंत करुणें अश्रु ढाळले, ते वाळले नाहींत तोंच त्यांचें या तऱ्हेनें रूपांतर झालेलें पाहून प्रोफेसर साहेब उत्तम कवि आहेत तसे उत्तम नट ही असावेत असा लोकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. प्रोफेसर साहेबांना या द्वितीयसंबंधापासून होत असलेल्या मुखाच्या आड न येतां या द्वितीय मिसेस बेहेऱ्यांच्या कविता मराठी मासिकांतून केव्हां फडकूं लागतात तिकडे लक्ष लावून आह्मी बसतों.

प्रो० बेहेरे यांच्या या द्वितीयसंबंधाविषयीं लिहितांना आह्मांला वीस वर्षापूर्वीच्या अशाच एका प्रसंगीं एका विनोदी मित्रानें केलेल्या सूचनेचें स्मरण होतें. रा० ब. चिंतामणराव विनायक वैद्य यांनीं त्यावेळीं आपल्या परलोकवासी झालेल्या प्रियपत्नीबद्दल 'अवलोन्नतिलेख मालेच्या' पहिल्या अंकांत असेच अत्यंत प्रेमार्द्र व करुणपर उद्गार काढले होते व तो अंक वाचकांच्या हातांत पडतो न पडतो तों आमच्या या वऱ्हाडप्रांतांतल्या एका कुलीन उपवर मुलीला मिसेस वैद्य होण्याचें भाग्य प्राप्त झालें. त्याप्रसंगास उद्देशून आमचा मित्र ह्मणाला, 'कायहो संपादक, दुःखाश्रूंच्या अंगीं आपल्या प्रवाहाबरोबर डोक्यांतली स्मरणशक्ति धुऊन नेण्याची शक्ति असते असें कोठें शरीरविज्ञानशास्त्रांत तुमच्या वाचण्यांत आलें आहे काय? नसल्यास शरीरशास्त्रवेत्त्यांना शोध करण्यास हें उत्तम क्षेत्र आहे असें तुह्मांस वाटत नाहीं काय?, रा० ब० वैद्य किंवा प्रो० बेहेरे यांच्या सारख्यांना द्वितीयसंबंधास उभे राहण्याचे वेळीं आपण नुकतेच काय उद्गार काढले याबद्दलचें विस्मरण एरव्हीं होणें आह्मांस शक्य दिसत नाहीं.

## लार्ड हार्डिंज यांचें औदार्य.

आपले सन्मान्य व प्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज यांनीं जन्मादिनाचे उत्सव प्रसंगीं कलकत्ता युनिव्हर्सिटी इन्स्टिटयुट नांवाच्या एतद्देशीय शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या फंडाला स्वतःच्या नांवानें १००० व आपल्या परलोकवासी पत्नीच्या नांवानें १००० अशी दोनहजार रुपयांची रकम देणगी ह्मणून दिली. देशी विद्यार्थीसंबंधानें त्यांचे ठायीं किती कळकळ आहे व वर्णभेदाला थारा न देण्याइतकें त्याचें मन कसें उदार आहे त्याचें हें उत्तम निदर्शक आहे.

## शेराला सव्वाशेर भेटला-

कित्येक इंग्रजी लेखक आपल्या अभेद्य अशा गौरवर्णाच्या कवचाच्या रक्षाणाखालीं निर्भर राहून उठल्या सुटल्या हिंदी पुढाऱ्यासंबंधानें व संस्थासंबंधानें निरर्गळ व स्वैर लेख लिहीत असतात पण त्याबद्दल त्यांना जाब विचारण्याचें धैर्य फारच थोड्यांच्या अंगीं असतें. मागें याचीं उदाहरणें घडलीं आहेत व सध्याही घडत आहेत. दहा वर्षांपूर्वी विलायतेंतल्या एका पत्रानें रा० टिळक यांचे संबंधांत कांहीं असाच निरर्गल लेख लिहिला होता, व त्याबद्दल रा० टिळक यांनीं जेव्हां न्यायाच्या कोर्टांत त्यावर फिर्याद मांडली, तेव्हां न्यायदेवतेनें रा० टिळकांच्या बाजूचा निकाल देऊन सदर लेखकास माफी मागण्यास लाविलें होतें. तसाच गोऱ्या लेखकावर बेअब्रूची फिर्याद करण्याचा प्रसंग रा० टिळक यांच्यावर पुनः आला आहे. लंडन टाइम्साचे बातमीदार या नात्यानें सर व्हॅलेंटाइन चिरोल हे थोडे वर्षांपूर्वी इकडे आले होते व त्यांनीं इकडे त्यावेळीं असलेल्या राजद्रोहाच्या मीमांसेवरचे आपले लेख प्रथम टाइम्स पत्रांत व नंतर पुस्तक रूपानें प्रसिद्ध केले. या लेखांत सुशिक्षित ब्राह्मणांसंबंधानें सामान्यतः व टिळक यांचे संबंधानें विशेषेंकरून नालस्तीचा मजकूर लिहिला आहे असा ग्रह ते लेख वाचल्या बरोबर पुष्कळांचा झाला. पण रा० टिळक हे त्याकाळीं बंदिवासांत अडकून पडले असल्यामुळें चिरोल साहेबांना त्यांच्या लेखा बद्दल जाब विचारणारा कोणी भेटला नव्हता. आतां रा० टिळक हे मोकळे झाल्यावर त्यांनीं हें कार्य केलें आहे. त्यांनीं विलायतेंतले सुप्रसिद्ध ब्यारिस्टर सर एडवर्ड कार्सन ( किंग्ज कौंसल ) यांचे मार्फत सर व्हॅलेंटाइन चिरोल यांचेवर फिर्याद करण्याबद्दलची नोटीस काढली आहे अशी खबर आली आहे! आतां चिरोल साहेब क्षमस्व ह्मणून ब्राह्मणांचे चरण धरतात कीं हें प्रकरण कोर्टांत जाऊन तेथें त्याचा निकाल लागतो तें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागतील. सर व्हॅलेंटाइन चिरोल यांच्या ग्रंथाचा मराठी तर्जुमा करून रावबहादुरी पटकावणारे कळम बहादूर यांना ही बातमी ऐकून कापरें भरलें असेल. पण अगोदर सूत्रकाराची व मागून भाष्यकाराची संभावना करण्याचा रा० टिळक यांचा विचार दिसतो.

## वार्षिक पचमढी कानफरन्स.

या प्रांतांतील सर्व कमिशनर्स आणि निरनिराळ्या खात्यांचे मुख्याधिकारी लोकांचे मेहरबान फिन्यानशिअल कमिशनर यांच्या अध्यक्षतेखालीं दरसाल कान्फरन्स भरत असते. ते प्रायः सर्वंच जून महिनाभर बसत असते. हल्लीं कानफरन्सच्या बैठकी सुरू आहेत.

१५ दिवसा पूर्वींच्या "हितवादाच्या" एका पत्रव्यवहार करणारानें या वर्षीच्या बैठकींत दोन तीन विषयांची चर्चा व्हावी ह्मणून आग्रहानें व नम्रपणानें सुचविलें आहे. आह्मांस ते तीन्ही विषय फार महत्वाचे आणि उपयुक्त आहेत असें वाटतें. त्यांवर आमचें मत देण्याचें आज आह्मीं योजिलें आहे.

'सिव्हिल सर्व्हिस उईक' प्रमाणें हें कानफरन्स विश्रांती साठीं जमत नसून राजकारभारांत कोणत्या सुधारणा कराव्या आणि राजकारभार सुखप्रगतीस कसा अनुरूप करावा हे ठरविण्यासाठीं व पुढील सालीं कोणते धोरणावर प्रत्येक खातें चालवावें हें निश्चित करण्यासाठीं हे कानफरन्स जमत असतें हें सर्वांस माहितच आहे. यासाठीं अशावेळीं लोकहितमूलक कांहीं सूचना केल्या असतां त्या अन्यथा होणार नाहींत व त्यांचा योग्य विचार होईल. अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे. शिवाय सर बेंजामिन आणि नामदार क्रम्प साहेबांसारख्या अधिपतींची जोडी या प्रांतास हल्लीं लाभलेली असल्यामुळें आमच्या आशांस विशेष जोर आला आहे. अशा आशा उत्पन्न होण्यांत कांहीं अवगुण असेल तर त्याची पूर्ण जबाबदारी या जोडीच्या न्यायदृष्टीवर आणि रयतेबद्दल त्यांस असणाऱ्या सहानुभूतीवर आहे, इतकें लिहिलें ह्मणजे पुरें आहे असे आह्मी समजतों.

### पहिली सूचना.

**कोर्टप्रॉसिक्यूटर्सची नवीनच लाईन काढून तींत एल. एल्. बीचीच भरती होत जावी:—**

वळच्या मुंबई इलाख्यांत या सूचनेची उपयुक्तता दिसून आली आहे. हल्लीं कनिष्ठ दरजाचीं पोलीसचीं कामें केलेले लोक प्रायः कोर्ट प्रासिक्यूटर नेमले जातात. त्यांस अपराध आणि टार्ट यां मधील फरक मुळींच कळत नसतो. न करणें साहजीकही आहे. यांचा विद्याव्यासंग म्हणजे मिड्लस्कूल पर्यंतचें अध्ययन. यांचा आमोशनीचा व्यासंग म्हणजे कोणे ना कोणे तरी रीतीनें द्रव्यार्जन करणें. द्रव्य वढती रूपानें न मिळाल्यास त्याचा अभाव कसा तरी भरून काढणें. मुंबई प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांच्या कोर्टांत या सालीं पांच चार चीटिंगच्या केसेस आल्या होत्या. त्यांत खुद्द म्याजिस्ट्रेटांनीं कबूल केलें आहे कीं "गुन्हेगारांनीं मोठ्या शिताफीनें आपल्या गुन्ह्यांच्या फौजदारी स्वरूपास दिवाणी वादांचें स्वरूप दिलें आहे." हल्लीं लोक चोहोंकडे कायदा जाणणारे झाले आहेत. चढाओढीच्या तत्वामुळें आणि मागणीपेक्षां पुरवठा जास्त असल्यामुळें द्रव्यार्जनासाठीं वाटेल तशी सल्ला देणोर ही छापाख्यानें वाढत चालले आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटांना कामें अधीक असल्यामुळें क्रि. प्रो. को. कलम २०२ खालीं वाटतील ते मुकदमे पोलिसाकडे चौकशीसाठीं पाठविण्याची चटक लागत चालली आहे. यामुळें ज्यांस अब्रू नुकसानीचा कायदा, विवाहसंबंधीं अपराधांचा कायदा, व्यक्तिविषयक अपराधांचा कायदा हिंदुस्थानांत कोठून आणि कसा अवतीर्ण झाला आहे हें पूर्णपणें समजत नसेल अशा लोकांनीं चौकशी करून मॅजिस्ट्रेटकडे रिपोर्ट केलेले असतील, मग त्यांत प्रायः अनवगत अथवा अवगत चुका आणि पक्षाभिमानच आढळून येतात. पोलीसांस जो अप्रीय त्यावरच मुकदम्याचें किटाळ येण्याचा संभव विशेष असतो. पोलीसांस जो प्रिय असेल, त्यास प्रायः उन्मत्तपणाची सनदच मिळाल्यासारखे असते. तरी पण पोलीसांची वक्रदृष्टी ज्यावर झाली असेल त्यावर कोर्टांत चौकशी चालविण्याकरितां खटले प्रॅासिक्यूटर्सकडे सोपवावे लागतात. जों पर्यंत चवकशी करणारे अंमलदार कायदा नीट जाणत नसतील तोंपर्यंत निरपराधी मनुष्य सुटणें न सुटणें हें या प्रॉसिक्यूटर्सच्या ज्ञानावर अवलंबून असतें. पोलीस मुकदम्यांत प्रायः पोलीसासच यश येते हा सार्वत्रिक सिद्धांत आहे.

चीटिंग (फसवणूक) अब्रू नुकसानी, दुसऱ्यावर चाल करून जाणे इ० अपराध इंग्रजी कायद्यांतून घेतलेले आहेत. यासाठीं टार्ट ज्यूरीस्प्रूडन्स, एक्विटी हे तीन विषय ज्यांस अवगत नसतील, आणि ज्यांस गुन्हा आणि दिवाणी बाब या मधील फरक समजत नसेल असे कोर्ट प्रॅासिक्यूटर्स असतील तर रयतेस न्यायाऐवजीं अन्यायच मिळतो असे अनुभवास आले आहे.

प्रॅासिक्यूटर्सची लाईन नवी आहे. यामुळें जुन्या लोकांस तींत बढती पटकावण्याचा हक्क प्राप्त होत नाहीं. ह्या लाईनींत योग्य आणि विद्वानांची भरती केली असतां सरकारास आणि रयतेस उभयतांस ही हितावहच आहे. कायदाशास्त्रविशारद हल्लीं पुष्कळ मिळण्यासारखे आहेत. काय करावें. लायक माणसें मिळत नाहींत अशी सबब सरकारास आणतां येत नाहीं. या लायनीचा एग्झिक्यूटीव लाइनीशीं संबंध नसल्यामुळें प्रॅासिक्यूटर्सना कवाईतींत जाण्याची, नेम मारण्याची अगर दुसरी निम लष्करी कामें करण्याची जरूरी नाहीं.

या सर्व साधक बाधक गोष्टी लक्षांत आणून मुंबई सरकारनें आपल्या प्रजेच्या रक्षणार्थ एल् एल् बी पदवीधरास या लाइनींत भरती करण्याचा क्रम सुरू केला आहे. त्याच धोरणावर आणि त्याच तत्वावर या वर्षी हे कानफरन्स ही लाईन एल्. एल्. बी करितां राखून ठेवील तर न्यायदेवतेवर होणारे बरेच अत्याचार बंद होऊन ती तेजस्वी दिसूं लागेल; इतकेंच नाहींतर रयतेचें ही जीवित अधीक सुरक्षीत होईल. आणि हें श्रेय मेहरबान मासार्कींग साहेब, नामदार क्रम्प आणि सर बेंजामिन या त्रिवर्गांस मिळेल.

## दुसरी सूचना.

**एग्झिक्यूटिव सर्विस अगर प्राविन्शिअल सिविल सर्विसमध्यें भरती करतांना नमूद केलेल्या उपेदवारांची प्रथम परीक्षा घ्यावी आणि नंतर त्यांस नेमावें:—**

पूर्वी विद्वान आणि पदवीधर लोक मिळत नव्हते. अशावेळीं शाळा खात्यांतील लोकांस एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरांच्या जागेवर एकदम भरती करीत असत. तो काळ जाऊन क्लार्क ऑफ कोर्ट एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरांच्या जागा पटकावूं लागले. दरम्यान पदवीधर मिळूं लागल्यावर सर अँटनी म्याक्डोनेल साहेबांनीं पदवीधर किंवा वकीलीच्या परीक्षा पास झाले असतील त्यांसच एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमावें, असें ठरविलें. त्यांनींच N. W. P. मधून पांच एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर आणले व १८९० साला पासून तों १९०७ साला पर्यंत मीलर साहेबांनीं सर रेजीनल्ड क्रॅडॉक साहेबांचे हातीं अधिकार शकट देईपर्यंत पदवीधर आणि प्रांताधिपती यांमध्यें चांगलाच सलोखा राहिला. सरं ऍंड्र्यू फ्रेजर साहेबांच्या कारकिर्दींत देखील त्यांचीं प्रियपात्रें पुष्कळ असून ही पदवीधरावर गदा फिरली नाहीं.

१९०३ सालीं हल्लींची ज्युडीशीअल सर्व्हिस उत्पन्न झाली. ते वेळीं न्यायदेवतेच्या रथाच्या एका चाकाच्या नेमी अस्सल पोलादी झाल्या म्हणजे एल्. एल्. बी शिवाय इतरांस दिवाणी न्यायखात्यांत इतका मज्जाव झाला कीं जे जुने नान एल् एल्बी होते त्यांस शंकरानीं ज्या प्रमाणें सर्व देवतास खिळ्यानीं ठोकून टाकले तसेच इस्मे साहेब बहादुरानीं अशा नान एल्. एल्. बी पैकीं बहुतेकांस खिळून तरी टाकले किंवा दुसऱ्या चक्राच्या नेमींत ढकलले. या वेळीं दुसरें चक्र म्हणजे फौजदारी आणि अंमल बजावणी खात्याचे चक्र पदवीधर रूपीं लोहनेमींनीं बनविलेलें होतें. एवंच १९०३ सालीं न्याय देवतेच्या शकटास एके बाजूस पोलादी चाक आणि दुसरे बाजूस लोखंडी चाक लागलें.

१९०७ सालीं डेप्युटीकमिशनरीपेक्षां सेटलमेंट खात्यांत अधीक कसास लागलेले अधिकारी सर रेजिनल्ड क्रॅडॉक यांचा लाभ या प्रांतास अगदीं अनपेक्षित मिळाला. तो मिळण्याचा अवकाश त्यांनीं प्रथमतः पदवीधरांचा हक्क फेटाळण्यास सुरवात केली. लोखंडी चाकाच्या नेम्पा कधीं लांकडी तर कधीं अन्य संभाराच्या येऊं लागल्या व सर्व चक्र चार वर्षांत कोणत्या धातूचे अगर लाकडाचे आहे हें देखील कळेनासे झाले. तीन तीन वर्षांत नुसत्या मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या डेप्युटी क्लार्क आफ कोर्टांचे किंवा रेव्हिन्यु इन्स्पेक्टरांचे एक्स्ट्रा असिस्टंटकमिशनर झळकूं लागले. दरसाल एकदम प्राव्हिन्शिअल् सर्व्हिसमध्यें भरती होणारे तरूण लोक पदवीधर असत पण बहुदिन सेवा तत्वावर निवडलेल्या लोकांत पदवीधरांकडे दुर्लक्ष आणि विशिष्ट जातींचे लाड किंवा पूर्व परिचारकांस पारीतोषक याच धोरणावर निवडणूक होवूं लागली.

डेप्युटीकमिशनरांकडून आपण सांगितल्या प्रमाणें शिफारसी करवून कामिशनर लोक आपल्या उद्दिष्ट प्रियपात्रांचीं नांवें उमेदवारांत भरती करूं लागेल. क्वचित् प्रसंगीं पोलीस आणि अबकारी खात्यांतील लोकांची निवडणूक झालेली आढळते, पण हे लोक अपवादादाखल आहेत. निरानिराळ्या भागांच्या निरानिराळ्या कमिशनरांचे पंसती तत्व फारच अनियमित आणि कल्पनातीत लहरींवर ठरत असतें. कोणास चांगला सडपातळ मनुष्य आवडतो तर कोणास चांगला खेळपटु मनुष्य आवडतो. कोणास वर्गण्या जमा करून क्यांपात अतिपबाजी उडविणारा मनुष्य आवडतो तर कोणास वेलकम झेंड्या, तोरणें लावणारा मनुष्य आवडतो. पसंती तत्वानें निवडून आलेले लोक प्रायः विद्वान असल्यामुळें नेहमीं भीत असतात. इतके कीं आपण भित्रे आहोत हें लोकांस समजेल कीं काय याची देखील त्यांस भीती वाटत असते. अशांची नौकरी पार पाडण्याचीं धोरणें तीनच असतात. पहिलें "वरिष्ठांस नमन खालच्यांस लाथ" दुसरें "खाजगी फिर्यादीस काढून टाकणें, पोलीस फिर्यादीस शिक्षा करणें" आणि तिसरें "वरिष्ठ ज्यांवर असंतुष्ट असतील त्यांच्याच विरुद्ध तक्रारी करीत राहणें व वरिष्ठ ज्यांवर खुष असतील त्यांची वरिष्ठांजवळ वाहवा करीत राहणें"

अशा प्रकारच्या लोकांची भरती होत गेल्यास रयतेस न्याय न मिळणें साहजीक आहे. कायदे चांगले असतील परंतु न्याय देणारे असमंजस असतील तर कायद्यांचा काय उपयोग होणार? बहुदिन सेवा तत्वावर लायक आणि हुशार गृहस्थास त्यांच्या योग्यतेनुरूप बढती देऊं नये असें आह्मी म्हणत नाहीं. पसंती तत्वावर या लोकांची एक्स्ट्राअसिस्टंट कमिशनरीसाठीं उमेदवारास हल्लीं प्रमाणेंच नांवें दर्ज व्हावींत. परंतु नांवें दर्ज झाल्यानंतर आणि प्रत्यक्ष जागा देण्यापूर्वी या लोकांची एक्विटी, ज्यूरिस्प्रूडन्स टार्ट, कॉन्ट्रयाक्ट, हिंदु आणि महामीडन लॉ ऑफ सक्सेशन इतक्या विषयांत जरूर परीक्षा झाली पाहिजे आणि जे पास होतील तेवढ्यांसच जागा दिल्यास सरकारास, रयतेस आणि त्याचप्रमाणें ज्यांची निवड झाली असेल त्यांस ही पथ्यकरच होईल. किंवा लायक नसून आह्मी विद्वान आणि लायक आहों असें दाखविण्यांत किती एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरांची किती शक्ती रोज खर्च होत असते हें जे जे हा लेख वाचतील त्यांस सहज अनुमानितां येईल. तसेंच विद्या पूजाई असते यामुळेंच जज्य आणि मुनसफ यांना लोकांत किती मान असतो व हातांत सत्ता असूनही तहशीलदार आणि एक्स्ट्राअसिस्टंट कमिशनर यांस किती मान असतो हें ही सर्वांस माहितच आहे. पोलादी चाक दिवसेंदिवस उज्वल होत चाललें आहे. लोखंडी चाक चित्र आणि शबल होत चाललें आहे इकडेही कानफरन्सनें लक्ष द्यावें अशी रयते तर्फे आमची नम्र विनंति आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— या सप्तकांत अर्द्रा नक्षत्राचा पाऊस पुष्कळ म्हणजे नवळ नवळ पांच इंच होऊन शेतें तर झालीं आहेत. पावसाची झड सारखी काल सकाळपर्यंत होती. कालपासून उघाड पडूं लागली आहे. लवकरच पावसा करितां थांबून राहिलेले पेरण्याचें काम सुरू होईल. रोगराई विशेष नाहीं.

रा० रा० श्रीपती बळवंत घारपुरे, सबार्डिनेट जज्ज, पांस रजेवरून परत आल्यावर इलिचपूर येथें नेमण्यांत येऊन त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा० रा० त्रिंबक तात्याजी कोरके यांस त्याच कामावर नागपूर येथें नेमण्यांत आलें.

रा० रा० सयद- नाकी- उल- हसन, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, बुलढाणा, यांस मिळेल त्या तारखेपासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आहे.


## नोटीस

रा० रा० किसन मारुती तेली रा० निमगांव ता० मलकापूर

यांस:—

नोटिस दिली जाते कीं, सर्वे नंबर २४७ (कसबे) हींत तुमचा व माझा समाईक अर्धा हिस्सा आहे. यातला निम्मळ माझा ।- आण्याचा हिस्सा मी यंदा रा० विष्णू रामचंद्र मुळे रा० नांदुरा यांस माक्तेपट्यानें वाहण्यास दिला आहे. तरी सदरहु गृहस्थास आपण वाहण्यास हरकत करू नये. तसेंच नोंदणीचे वेळेस सदरहु शेता बद्दलचे कागद पत्र (खरेदीखतें) वगैरे तुमचे जवळ राहिले आहेत. तें नोटिस पावतांच परत करावे. तसें न केल्यास व वरील गृहस्थास वाहण्यास कोणतेंच प्रकारची अडचण उपस्थित केल्यास कायदेशीर इलाज करावा लागेल. व तसें करण्यास जो खर्च येईल त्यास तुह्मास जबाबदार धरलें जाईल. ता० २४।६।१९

सही

नरहाम वामन सकळकळे ६० खु० नो० नं० २१०

## श्रीशंकराचार्यांचा उत्सव.

आपल्या देशांतल्या पुण्यश्लोक महात्म्यांचें स्मारक ह्मणून त्यांचे उत्सव करण्याविषयींची आमच्या लोकांची वाढती इच्छा अभिनंदनीय आहे. श्रीशंकराचार्यांचा उत्सव हुबळी येथें आज अनेक वर्षें होत असतो. राजाराम मोहनराय यांची पुण्यतिथि ब्राह्मसमाजाकडून मोठ्या आदरानें पाळण्यांत येते. श्रीज्ञानदेव, तुकोबा, एकनाथ, नामदेव, समर्थ श्रीरामदास यांच्या पुण्यतिथि कित्येक ठिकाणीं व कित्येक ठराविक लोकांकडून होतात. त्यांना सार्वत्रिक स्वरूप अवश्य मिळालें पाहिजे, तसें त्यांचे उत्सव करण्याच्या पद्धतींत देशकाल स्थित्यनुरूप फेरबदल करणें हें ही तितकेंच अवश्य आहे असें आह्मांस वाटतें. यंदा मुंबईस साहित्यसंमेलनासाठीं जमलेल्या महाराष्ट्रभाषासेवकांनीं या बाबतींत प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें. सदर प्रसंगीं रा० गोविंद सखाराम सरदेसाई यांनीं प्रकाशित झालेल्या कागदपत्रांवरून श्रीशिवाजी महाराजांविषयीं व तत्कालीन स्थितीविषयीं पुष्कळ नवी माहिती संकलित करून पूर्वेतिहासावर उत्तम प्रकाश पाडणारा निबंध वाचला. असें जर प्रत्येक ठिकाणीं प्रत्येक उत्सवाचे प्रसंगीं होईल तर तें अत्यंत अभिनंदनीय आहे. शिवाजीउत्सवाचें निमित्त पुढें करून आपआपसांतले मत्सर भाव, उखाळ्या पाखाळ्या, आणि नीच मनोवृत्तींचे प्रदर्शन करणें व त्यापासून समाजांतली दुफळी वाढविणें याला जर उत्सव ह्मणावयाचें असेल तर असे उत्सव मुळींच नकोत. पुण्यास यंदा श्रीशंकराचार्यांचा उत्सव झाला. पण त्यापासून कोणाला काय लाभ झाला? या बाबतींत कुंभकोनम् येथें खुद्द आचार्यांच्या पीठावर सध्या विराजमान असलेल्या आचार्यांनीं या उत्सवाची जी काय रेखा घालून दिली आहे ती वळविली जाईल, तर तो आचार्यांचा खरा उत्सव ह्मणतां येईल. या कार्यरेखेंत गुरु कुलासारख्या पाठशाळा चालविणें, धर्मतत्वांचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार करणें आर्यधर्माच्या ज्ञानप्रसारार्थ त्रैमासिकें चालविणें, जागोजाग धर्मप्रचारक उपदेशार्थ पाठविणें, व संस्कृत ग्रंथांचा संग्रह करणें इ. गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे. अशी कार्यरेखा ठरविणें हें काम सोपें आहे. पण तें अमलांत आणणें फार कठीण आहे, आणि तें आपल्या शक्तीप्रमाणें घडवून आणण्या इतकी आस्था व कळकळ आमच्या अंगीं नसली तर आचार्यांसारख्यांचे उत्सव करण्यास लागणारी पात्रता अंगीं येईपर्यंत असे उत्सव न केलेले बरे नाहीं काय?

---

## नोटीस.

नोटीस बेशमी कृष्णाबाई कलवंतीण राहणार कसबे आडगांव ता० आकोट जि० आकोला

इजला:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी व माझा बंधू वामनदादा हरदास राहणार कसबे अडगांव या उभयतांचे नांवाचा रोखा रुपये ३०० चा सरासरी १॥ वर्षीपूर्वी लिहून दिला. त्या रुपयांत माझे निम्मे हशिवर रुपये १५० दिडशे आलेत त्या रुपयांत मी माझे मालकीचे शेत सर्वे नंबर ६ पैकीं १४ एकर माझे हिशाबर आ. ह्या पैकीं ७ एकर जमीत २०० रुपये स्वामित्वाने वहीतीस दिले. व त्या चप्रमाणें निजामपूर येथील मळा सर्व्हे नंबर ८ हा ४० रुपये स्वामित्वानें दिलें आहे. व नगदी रुपये १२ तुझ्या शेताचा शेत सारा मी भरला. एकूण १५२ एकशे बावन रुपये तुला पावले व्याजाचे निम्मेचे पैसे घेऊन नोटीस पावल्यापासून एक दिवसाचे आंत टिकीट लाऊन पावती द्यावी. न पावती दिल्यास माझे कडेस तुमच्या रुपयांची कोणत्याही तऱ्हेची जबाबदारी राहणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली सही ता० २४-६-१५

सही

माधवरावदादा हरदास द० खु०

नो. नं. २९९

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

### ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदीर भुलेश्वर -- मुबई.

एकच माव! ओटो मुरंगी! एकच माव!!

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो मुरंगी

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, खिलू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, मुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, घंटा, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDS 4 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 36 38,694 |
| 189c | 21,16,549 | 80 05,818 |
| 1893 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | 1,07,014 | 2,10,95,947 |
| 1900 | 535,55639 | 3,22,79 991 |
| 1913 | 99,4469 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS.

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

" At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the finarcial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy iholders with a absolute security and possessing all the important factors essentia n a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particalars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPur

N. N. 25

सतत ५० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
आयोडाइज्ड.

## सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।– पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥– उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक**– डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.